CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०२४। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक २३ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### सणांच्या काळात भारतीय रेल्वे मालामाल



**नवी दिल्ली :** यंदा सणाच्या हंगामात भारतीय रेल्वेने तिकीट विक्रीतून १२,१५९.३५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. यावर्षी १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर या काळातील ही कमाई आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेत ही माहिती दिली. या दोन महिन्यांत गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी असे अनेक सण आले. यावेळी अनेकजण सण साजरा करण्यासाठी आपापल्या घरी किंवा इतरत्र जातात. अशा परिस्थितीत भारतातील बहुतांश लोक सणासुदीच्या काळात प्रवास करण्यासाठी भारतीय रेल्वेला प्राधान्य देतात. अश्विनी वैष्णव यांनी झोननिहाय आकडेवारी जाहीर केली. यानुसार, १ सप्टेंबर ते १० नोव्हेंबरपर्यंत जवळपास १४३.७१ कोटी प्रवाशांनी प्रवास केला. बहुतांश प्रवासी मध्य रेल्वेच्या परिसरातील होते. मध्य रेल्वेतील प्रवाशांची संख्या ३१.६३ कोटी होती. त्याचवेळी पश्चिम झोनमध्ये २६.१३, पूर्व झोनमध्ये २४.६७ कोटी प्रवासी होते.

**सणांच्या काळात विशेष गाड्या**

या सणासुदीच्या हंगामात ७,६६३ अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्यात आल्या. या गाड्या गेल्या वर्षीच्या तुलनेत ७३ टक्के अधिक होत्या. २०२३ मध्ये ४,४२९ विशेष गाड्या धावल्या होत्या.

### एनआयएचे सहा राज्यांत २२ ठिकाणी छापे

**नवी दिल्ली :** सायबर घोटाळे करणाऱ्या कॉल सेंटरमध्ये काम करण्यासाठी युवकांची मानवी तस्करी करणाऱ्या सिंडिकेटच्या तपासाचा भाग म्हणून राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने गुरुवारी सहा राज्यांत २२ ठिकाणी छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. बिहार, उत्तरप्रदेश आणि दिल्लीसह इतर ठिकाणी ही छापेमारी करण्यात आली. बिहारमधील गोपालगंज येथे पोलिसांनी नोंदवलेला हा खटला एका संघटित टोळीशी संबंधित आहे आणि भारतीय तरुणांना नोकरीच्या बहाण्याने विदेशात पाठवून त्यांना सायबर फसवणुकीत गुंतलेल्या बनावट कॉल सेंटरमध्ये काम करण्यास भाग पाडते.

### दिल्लीतील प्रशांत विहार परिसरात स्फोट, एक जखमी

**नवी दिल्ली :** दिल्लीतील प्रशांत विहार परिसरातील बन्सी स्वीट्सजवळ गुरुवारी दुपारच्या सुमारास स्फोट झाला. यात एक जण जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. चेतन कुशवाह असे त्याचे नाव असून, तो ऑटोरिक्षाचा चालक आहे. हा स्फोट कोणत्या प्रकारचा होता, हे अद्याप समजू शकले नाही. श्वान पथक, न्यायवैद्यक पथक आणि इतर तज्ज्ञ पथकांसह एनएसजी कमांडो घटनास्थळी दाखल झाले. स्फोट झाल्याची माहिती स्थानिकांनी पोलिस नियंत्रण कक्षाला दिली. माहिती मिळताच पोलिस दल घटनास्थळी दाखल झाले. त्याचवेळी अग्निशमन विभागालाही माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाच्या गाड्याही घटनास्थळी दाखल झाल्या. पुढील चौकशी पोलिसांनी सुरू केली आहे.

# भाजपा नेतृत्वाचा निर्णय मान्य

## मुख्यमंत्री पदासाठी दिल्लीत खलबतं; शहांकडे मागण्यांचे प्रस्ताव

**नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

राज्यात भाजपाचे सर्वाधिक आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री कोण, याबाबतचा निर्णय भाजपाचे वरिष्ठ नेते घेतील. आम्ही त्यांच्या निर्णयाला पाठिंबा देऊ, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी गुरुवारी स्पष्ट केली. ते दिल्लीतील राकाँच्या कार्यालयात बोलत होते.

राज्यात महायुतीचे सरकार आणण्याचे आमचे लक्ष्य होते. ते आम्ही पूर्ण केले. आता महायुतीचे मंत्रिमंडळ अस्तित्वात येईल. महाराष्ट्रातील जनतेने विक्रम केला. एवढ्या मोठ्या संख्येने आमदार निवडून आले. आमची जबाबदारी वाढली आहे. आमच्यात एकवाक्यता आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार सध्या राजधानी दिल्लीत आहेत. भाजपाच्या केंद्रीय नेत्यांची भेट घेण्याआधी त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. या मेळाव्यात त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यावेळी उपस्थित होते

शिवसेनेचे नेते आणि काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही बुधवारी जाहीर केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य आहे. आमचीही तीच भूमिका असल्याचे अजित पवार म्हणाले.

**अपयशामुळे ईव्हीएमला दोष**

ईव्हीएमबाबत विरोधकांनी व्यक्त केलेल्या संशयाबद्दल ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम ठीक होते. कारण, निकाल महाविकास आघाडीच्या बाजूने लागला होता. विधानसभा निवडणुकीत निकाल वेगळा लागल्याने ते ईव्हीएमला दोष देत आहेत. मतदानाच्या दिवशी सकाळी गारठा होता. खरे मतदान सकाळी ९ नंतर सुरू झाले. ६ वाजताच्या आत जे मतदार रांगेत उभे होते; त्यांना मतदानासाठी आत घेण्यात आले.

**डिसेंबरनंतर दिल्लीत पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन**

आमचा राष्ट्रीय पक्ष होता. तो पुन्हा प्राप्त करण्यासाठी अधिक काम करण्याची गरज आहे. आम्ही लढू आणि यशस्वी होऊ, असा विश्वास अजित पवारांनी व्यक्त केला. डिसेंबरनंतर आपण दिल्लीत पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन घेऊ. पुढे कसे जायचे त्यावर त्यात मंथन करून तरुण पिढीला समोर आणणार आहोत, असेही अजित पवार यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)


# विक्रीच्या दबावामुळे शेअर बाजारात भूकंप

## निर्देशांक १२००, निफ्टीत ३६० अंकांची घसरण

**मुंबई, २८ नोव्हेंबर**

जागतिक बाजारांतील संमिश्र कल तसेच इन्फोसिस, रिलायन्स इंडस्ट्रिज, एचडीएफसी बँकेसारख्या दिग्गज समभागांवर निर्माण झालेल्या विक्रीच्या प्रचंड दबावामुळे मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १२०० अंकांनी कोसळला.

वाढत असलेला भूराजकीय तणाव आणि गुंतवणूकदारांच्या बदललेल्या भावनांसोबतच आयटी, वाहन आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रांना बसलेला मोठा फटकाही घसरणीला कारणीभूत ठरला, असे विश्लेषकांनी सांगितले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ११९० अंकांनी घसरून ७९,०४३ या पातळीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात यात १,३१५ अंकांची घसरण झाली होती. आजच्या घसरणीमुळे बाजारातील कंपन्यांचे भांडवली मूल्य १,५०,२६५.६३ कोटी रुपयांनी घसरून ४,४२,९८,०८३.४२ कोटी रुपयांवर आले. आजच्या सत्रात राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३६० अंकांनी घसरून २३,९१४ या पातळीवर बंद झाला.



**अदानी समूहाच्या ११ पैकी पाच कंपन्यांना फायदा**

शेअर बाजारातील मोठ्या घसरणीतही अदानी समूहाच्या ११ सूचीबद्ध कंपन्यांपैकी पाच कंपन्यांचे समभाग वाढले. अदानी टोटल गॅसचे समभाग सुमारे १६ टक्क्यांनी वाढले. अदानी एनर्जी सोल्युशन्स १० टक्क्यांनी, अदानी ग्रीन एनर्जी १०, अदानी एंटरप्रायजेस १.६३ टक्क्यांनी वाढले. (वृत्तसंस्था)



पुढील वर्षी उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे आयोजित कुंभमेळ्याच्या अनुषंगाने यमुना नदीच्या किनाऱ्यावर भगवान महादेवाच्या १२ ज्योतिर्लिंग मंदिरांची प्रतिकृती उभारली जात आहे. गुरुवारी या प्रतिकृतीचे चित्र समोर आले

## आज तयार होणार फेंगल चक्रीवादळ

**चेन्नई, २८ नोव्हेंबर**

दक्षिण-पश्चिम बंगालच्या उपसागरावरील कमी दबाव त्रिंकोमालीच्या पूर्व-ईशान्येस सुमारे १०० किमी अंतरावर स्थिरावला आणि १२ तासात ते चक्रीवादळ तीव्र होईल, असे प्रादेशिक हवामान केंद्र चेन्नईने गुरुवारी सांगितले.

हा पट्टा श्रीलंकेच्या किनारपट्टीच्या लागून उत्तर-वायव्येकडे सरकेल आणि पुढे १२ तासात चक्रीवदळ तीव्र होईल, असे हवामान विभागाने सांगितले. ३० नोव्हेंबरच्या सकाळी कराईकल आणि महाबलीपुरम् दरम्यान उत्तर तमिळनाडू-पुदुचेरीचा किनारे ओलांडण्यासाठी ताशी ५०- ६० ते ७० किमी वाऱ्यासह वेगाने वादळ पुढे सरकत आहे. फेंगल चक्रीवादळ चेन्नईजवळील किनारपट्टी ओलांडण्याच्या शक्यतेसह तामिळनाडू आणि पुदुचेरीमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

## जम्मू-काश्मिरात सापडले ६०० वर्षे जुने शिवलिंग

**श्रीनगर, २८ नोव्हेंबर**

जम्मू-काश्मीरमध्ये ६०० वर्ष जुने शिवलिंग सापडले आहे. घनदाट जंगलात लुप्त झालेल्या शिवमंदिराचे अवशेष पाहून संशोधक अचंबित झाले आहेत. या प्राचीन शोधामुळे परिसराला धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

जम्मू-काश्मीरच्या शोपियाँ जिल्ह्यातील हिरपोरा गावाजवळ घनदाट जंगलात प्राचीन शिवमंदिराचे अवशेष सापडले आहेत. हे अवशेष पहिल्यांदा स्थानिकांच्या निदर्शनास आले. स्थानिकांनी तत्काळ पुरातत्त्व विभागाला याची माहिती दिली. यानंतर पुरातत्त्व विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. विभागाच्या पथकाने घटनास्थळी संशोधन सुरू केले आहे.

मंदिराचे हे अवशेष ६०० वर्ष जुने असल्याचे समजते. जंगलात मंदिराच्या आकाराची वास्तू सापडली, ज्यात शिवलिंग आढळून आले. हे मंदिर ललितादित्य म्हणजेच राजा अवंतीवर्मा यांच्या कालखंडाशी संबंधित असल्याचे समजते. (वृत्तसंस्था)

## तोयबाच्या अतिरेक्याला रवांडातून आणले भारतात

● सीबीआय, एनआयएची इंटरपोलसोबत कारवाई

**नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथे घातपात घडविण्यासाठी अतिरेक्यांना शस्त्र, दारूगोळा आणि स्फोटकांचा पुरवठा करणारा लष्कर-ए-तोयबाचा अतिरेकी सलमान रेहमान खान याला रवांडा येथून गुरुवारी भारतात आणण्यात आले.



त्याच्या प्रत्यार्पणासाठी सीबीआय आणि एनआयए या राष्ट्रीय तपास संस्थांनी इंटरपोलसोबत सातत्याने समन्वय साधला होता. सलमानच्या विरोधात इंटरपोलने रेड कॉर्नर नोटीसही जारी केला होता. सलमानचा ठावठिकाणा माहीत झाल्यानंतर सीबीआयच्या जागतिक सहकार्य केंद्राने सातत्याने एनआयए आणि इंटरपोलशी संपर्क साधला होता. त्याच्यावर दहशतवादाशी संबंधित अनेक गंभीर गुन्हे भारतात दाखल आहेत. त्याला अलिकडेच रवांडात अटक करण्यात आली होती, अशी माहिती सीबीआयच्या प्रवक्त्याने एका निवेदनातून दिली. बंगळुरू शहरात दहशतवादी कारवाया करण्याच्या आरोपात एनआयएने त्याच्याविरोधात मागील वर्षी पहिल्या गुन्ह्याची नोंद केली होती. लष्कर-ए-तोयबाचे भारतभरात जाळे विणण्यासाठी तो तरुणांची भरती करायचा आणि त्यांना शस्त्र व स्फोटकांचा पुरवठाही करायचा.

## छापेमारीसाठी गेलेल्या ईडीच्या पथकावर हल्ला

### सायबर गुन्ह्याचा तपास

**नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

सायबर घोटाळ्यातील 'मनी लाँड्रिंग' प्रकरणात छापेमारीसाठी गेलेल्या अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीच्या पथकावर गुरुवारी हल्ला करण्यात आला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणी एकाला ताब्यात घेण्यात आले.

नैर्ऋत्य दिल्लीतील कापशेरा पोलिस ठाणे हद्दीतील एका फार्महाऊसवर ईडीचे पथक गेले असताना हा प्रकार झाला. या प्रकरणी ईडीने पोलिस तक्रार दाखल केली. हल्ल्यात ईडीचा अधिकारी किरकोळ जखमी झाला. प्रथमोपचारानंतर तो परत छापेमारीच्या कारवाईत सहभागी झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पीवायवायपीएल ॲपशी संबंधित प्रकरणाच्या तपासात ही छापेमारी करण्यात आली. या प्रकरणातील आरोपी अशोक शर्मा आणि त्याच्या भावाने ईडीच्या पथकावर हल्ला केल्याचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

## इस्कॉनवरील बंदीस ढाका हायकोर्टाचा नकार

**ढाका :** बांगलादेशमध्ये इस्कॉनवर बंदी घालण्याबाबत स्वतःहून आदेश देण्यास ढाका उच्च न्यायालयाने नकार दिला, असे वृत्त बांगलादेशमधील 'द डेली स्टार'ने दिले. वकील मोनीर उद्दीन यांनी बुधवारी 'इस्कॉन'वर बंदी घालावी, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली होती. इस्कॉन ही एक जातीय अशांतता भडकणारी संघटना असल्याचा दावा वकील मोनीर उद्दीन यांनी केला होता. ही संघटना पारंपरिक हिंदू समुदायांवर आपल्या श्रद्धा लादत असल्याचा तसेच बांगलादेशला अस्थिर करण्याचा आणि भारतीय माध्यमांशी सहयोग करण्याचा आरोपही केला होता.

## हेमंत सोरेन यांचा शपथविधी

### ठरले राज्याचे चौदावे मुख्यमंत्री

**रांची, २८ नोव्हेंबर**

झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी गुरुवारी झारखंडचे चौदावे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. या शपथविधी समारंभाला इंडिया आघाडीचे अनेक नेते उपस्थित होते.

येथील मोराबादी मैदानावर भव्य-दिव्य शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी सोरेन यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. या कार्यक्रमाला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.



मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यापूर्वी हेमंत सोरेन यांनी त्यांचे वडील आणि झामुमोचे अध्यक्ष शिबू सोरेन यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतला. झारखंडच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान होण्याची हेमंत सोरेन यांची ही चौथी वेळ आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत झामुमोच्या नेतृत्वाखालील आघाडीने राज्यातील ८१ पैकी ५६ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपाने २४ जागांवर विजय मिळविला होता. (वृत्तसंस्था)

# येत्या १० डिसेंबरपासून विमानाच्या तिकीट बुकींगचा श्रीगणेशा!

● २३ डिसेंबरला गोवा विमानतळावरून सोलापूरसाठी पहिले विमान येणार!

● विमानसेवेमुळे उद्योजक वाढण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

होटगी रोड, सोलापूर विमानतळावरून 'फ्लाय ९१' या विमान कंपनीकडून २३ डिसेंबरपासून विमानसेवा सुरू होणार असून, यासाठी कंपनीचे अधिकारी गुरुवारी सोलापुरात आले होते. यानंतर १० डिसेंबरपासून विमानसेवेचे ऑनलाईन बुकींग सुरू करण्यात येणार असून, यासाठी येथील काही उद्योजक, व्यापाऱ्यांशी त्यांनी विस्ताराने चर्चा केली आहे.

दरम्यान, ही विमानसेवा सुरू झाल्यावर सोलापूर शहर-जिल्ह्यातील विविध एमआयडीसीत उद्योग वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

या चर्चेमध्ये सोलापूर ते मुंबई अन् मुंबई ते सोलापूरचे नियोजित वेळापत्रक बदलण्याची सूचना काही जणांनी केली. त्यासाठी मुंबई विमानतळावर ब्लॉट मिळणे आवश्यक असून, मुंबई विमानतळावरील बिझी शेड्युलमुळे नियोजित वेळापत्रक बदलणे शक्य नाही, असे फ्लाय ९१ च्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. इतकेच नाहीतर आता येत्या १० तारखेपासून या विमानसेवेसाठी ऑनलाईन बुकींग सुरू करण्यात येणार असून, प्लाय ९१ चे काही अधिकारी यासाठी काही दिवस सोलापुरात तळ ठोकून राहणार असल्याचीही अधिकृत माहिती मिळाली. सोलापूर ते मुंबई सकाळी ९:४० वाजता सोलापूर विमानतळावरून विमान उड्डाण घेणार आहे. ११:२० वाजता



मुंबईत पोहोचणार आहे. ११:५५ वाजता मुंबई येथून निघणार अन् १ वाजून ४५ मिनिटांनी विमान सोलापुरात पोहोचणार आहे. सोलापूर ते गोवाकरिता सोलापूर येथून दुपारी सव्वा दोन वाजता उड्डाण घेणार आहे. साडेतीन वाजता गोवा विमानतळावर पोहोचणार. सकाळी ८ वाजता गोवा विमानतळावरून विमान उड्डाण घेणार आहे. सकाळी ९:१० वाजता सोलापूर विमानतळावर पोहोचणार, असे 'फ्लाय ९१' कंपनीचे नियोजित वेळापत्रक आहे. मुंबई येथून सायंकाळी सोलापूरसाठी विमान उड्डाण घेणे आवश्यक आहे. सकाळी सोलापुरातून मुंबईत गेलेले प्रवाशी संध्याकाळी पुन्हा विमानाने सोलापुरात येऊ शकतील, त्यामुळे आता काही दिवसांचीच सोलापूरकरांना वाट पाहावी लागणार आहे.

### महिनाभराचे तिकीट बुकींग केल्यास सवलत

सोलापूर ते गोवा, असा विमान प्रवास अवघ्या १ हजार ७० रुपयांत होणार असून, सोलापूर ते मुंबई यासाठी केवळ १,४६५ रुपये मोजावे लागतील. ॲडव्हान्स तिकीट बुकींग केल्यानंतरच या सवलतीच्या दराचा फायदा घेता येणार आहे. जर महिनाभराचे तिकीट ॲडव्हान्स बुकींग केल्यास प्रवाशांना अधिकचा फायदा होणार आहे. विमानातील सीटच्या उपलब्धतेनुसार तिकीट दर वाढत जाणार आहेत. यासाठी येत्या १० डिसेंबरपासून तिकीट विक्री सेवा सुरु होणार असल्याने असे कंपनीकडून सांगण्यात येत आहे. यासाठी कंपनी अधिकाऱ्यांनी स्थानिक उद्योजकांशी मोबाईलवरून संपर्क केल्याचे समजते.

### आता शहरात नवनवे उद्योग, उद्योजक येतील

या विमानसेवेची आमच्यासह शहरातील अनेक उद्योजकांची मागणी होती. गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या मागणीला आता कुठे यश आले आहे. ही विमानसेवा सुरू झाल्यानंतर शहरात विविध उद्योग वाढतील आणि शहरातील बेरोजगारीचेही निर्मुलन होईल. या विमानसेवेमुळे शहरातील उद्योजकांना मुंबईतील काम एका दिवसात करून परत त्याच दिवशी घराकडे येता येणार आहे. शहरातील महामार्ग, रेल्वे आणि आता विमानसेवा सुरू झाल्याने शहराची आता औद्योगिक क्रांतीही होईल.

**-राम रेड्डी, उद्योजक, सोलापूर**

## महाराष्ट्रातील धक्क्यानंतर कर्नाटकात भूकंप

● मुख्यमंत्र्यांची खुर्ची धोक्यात

**बंगळुरू, २८ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या धक्कादायक पराभवानंतर काँग्रेसचे शेजारच्या कर्नाटकात टेन्शन वाढले आहे. राज्यात काँग्रेस सरकार आल्यापासून सातत्याने डोकेदुखी वाढवणाऱ्या घटना समोर येत आहेत. सिद्धरामय्या यांच्यावर मुडा स्कॅमवरून गुन्हा दाखल झाला असून, त्यांची खुर्ची धोक्यात आहे. सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्रिपद गमवावे लागू शकते. दरम्यान, राज्यात मुख्यमंत्रिपदासाठी अनेक दावेदार समोर येत आहेत. यातच आता मंत्रिमंडळातील बदलाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. राज्यातील वरिष्ठ मंत्री सतीश जारकीहोली यांनी देखील याबाबतचे संकेत दिले आहेत. या सर्व घडामोडी सुरू असताना सिद्धरामय्या दिल्लीत पोहोचले असून, कर्नाटकात लवकरच मोठे बदल होण्याचे संकेत मिळत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी येणाऱ्या काळात मंत्रिमंडळात फेरबदल होतील, असे संकेत दिले आहेत. मंत्रिमंडळातील काहींना याबाबतचे संदेश दिले गेले आहेत. यामुळे कर्नाटकत लवकरच फेरबदल होतील, अशी चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री शिवकुमार दिल्लीत दाखल झाले आहेत. हा दौरा राज्यातील बदलाचे संकेत देत आहेत. सिद्धरामय्या गुरुवारी दिल्लीत पोहोचले तर, शिवकुमार आधीपासून तेथे होते. राज्यातील नेतृत्वात बदल केले जाऊ शकतात. मुख्यमंत्री पदावरून सिद्धरामय्या यांना हटवले जाऊ शकते, अशी देखील चर्चा आहे.



## नदीत कार कोसळून कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**सांगली :** पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील कृष्णा नदीत गुरुवारी पहाटे कार कोसळल्याने एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला. सांगलीतील दोन कुटुंबे कोल्हापुरातील एका लग्नात सहभागी होऊन परतत असताना दुपारी १२.३० च्या सुमारास अंकली पुलावर हा अपघात झाला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## संक्षिप्त वृत्त



### सोलापूर विद्यापीठात संविधान दिन विविध उपक्रमांनी साजरा

**सोलापूर दि.२८ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात ७५ वा संविधान दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. विद्यापीठ कॅम्पसमधून संविधान रॅली काढण्यात आली. संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचनही करण्यात आले. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. अतुल लकडे आदींच्या उपस्थितीत यावेळी संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. कुलगुरु प्रा. महानवर, डॉ. काळवणे यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली यांनी केले तर आभार डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले.



### समाजकल्याण विभागाच्यावतीने संविधान दिन साजरा

**सोलापूर दि.२८ नोव्हेंबर-**

संविधान दिनानिमित्ताने सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क चौक, सोलापूर येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन व संविधान अमृत महोत्सव वर्ष घर घर संविधान अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संविधानाबाबत शाहीर सुरेश खाडे यांनी पोवाडा गायना करून विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त सोलापूर महानगरपालिका संदीप कारंजे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे, मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे सहायक संचालक मनिषा फुले , शासकीय वस्तीगृहाचे गृहपाल व विद्यार्थी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



### महापालिकेच्या वतीने महात्मा फुले यांना अभिवादन

**सोलापूर दि.२८ नोव्हेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुपर मार्केट येथील त्यांच्या पुतळ्यास व कॉन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस उपायुक्त तौमूर मुलाणी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे,जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, महादेव येळे, भाऊसाहेब झगडे, संतोष गायकवाड, रंगनाथ नाळे, रवींद्र चिंचोळकर,रमण दीक्षित,पोपट माळी, माणिक आठवले, अशोक माळी, सिद्धू तिमिगार, अशोक खडके उपस्थित होते.



### विज्ञान प्रदर्शनात सेवासदन महाविद्यालयास पुरस्कार


**सोलापूर दि.२८ नोव्हेंबर-**

मराठी विज्ञान परिषद, सोलापूर आयोजित विज्ञान प्रदर्शनात सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी (विज्ञान) या वर्गातील राबिया शेख आणि सुहाना इनामदार यांनी सादर केलेल्या बायोडिग्रडेबल प्लास्टिक या प्रकल्पास तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. आपल्या दैनंदिन वापरातील पदार्थ वापरून अगदी कमी खर्चात अशा प्रकारचे प्लास्टिक तयार करण्याचे प्रात्यक्षिक या विद्यार्थिनींनी सादर केले होते. या विद्यार्थिनींना प्रा. सुजाता उपासे यांनी मार्गदर्शन केले होते. या यशाबद्दल पुणे सेवासदन संस्था, शाखा सोलापूरच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिव वीणा पतकी, संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा.पद्मकुमार उपाध्ये, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## संविधान प्रास्ताविकेचे होणार वाचन; शाळेच्या परिपाठ प्रार्थनेत प्रास्ताविकेचे समायोजन

### 'हर घर संविधान' उपक्रमांतर्गत पथनाट्य आणि प्रदर्शनातून होणार जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ नोव्हेंबर**




भारतीय राज्यघटने बाबत जागरूकता तसेच घटनात्मक अधिकार आणि कर्तव्याबद्दल सर्व नागरिकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी संविधान अमृत महोत्सव सन (२०२४-२५) अंतर्गत घर घर संविधान साजरा करण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेत घर घर संविधान या उपक्रमांतर्गत विविध विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे माध्यमिकचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.

दरम्यान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकृत करून २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता तसेच संविधानाची मूल्ये शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिकांच्या पर्यंत ऊर्जावीत यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळा सर्व प्रकारची शिक्षण संकुले विविध ठिकाणी घरघर संविधान साजरा करण्याबाबत शिक्षण विभागाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार मंगळवारपासून जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत महाविद्यालयात शिक्षण संकुलात शिक्षण विभागाशी संबंधित सर्व कार्यालयात घरघर संविधान उपक्रम राबवण्यात येत आहे. शाळेच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात प्रार्थनेत संविधान प्रास्ताविकेचे वाचन करणे, विद्यार्थ्यांना संविधानाची प्रति देणे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

#### संविधानाची मूल्ये रुजवण्यासाठी उपक्रम

जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालय व शिक्षण संकुलात घरघर संविधान हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या संदर्भात कोण-कोणते उपक्रम कार्यक्रम घ्यावेत. याबाबत प्रत्येक शाळांना कळविण्यात आले आहे. भारतीय राज्यघटने बाबत जागरूकता तसेच संविधानाचे मूल्ये शालेय, महाविद्यालयीन, विद्यार्थी आणि नागरिक यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी हा विषय उपक्रम राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पथनाट्य आणि प्रदर्शनातून जागर केला जाणार आहे. (दि.२६) जानेवारी पर्यंत प्राथमिक व माध्यमिक शाळा सर्व प्रकारची शिक्षण संकुलात हा विशेष उपक्रम सुरू ठेवण्यात येणार आहे.

**-सचिन जगताप,**
**शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग जिल्हापरिषद**



## लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात म. फुले पुण्यतिथी व संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत जेष्ठ समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी तसेच भारतीय संविधान दिन प्रभारी प्राचार्य प्रा. सागर महाजन यांच्या हस्ते साजरा झाला.

महाविद्यालयाचे विद्यार्थी स्नेहल पाटील, नक्षत्रा कांबळे, मैथिली कोळी, तृप्ती जाधवर आदींनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व समाजासाठी योगदान याविषयी मनोगत व्यक्त केले. तर भारतीय संविधान, भारतीय संविधानाचे महत्व, तसेच संविधान दिन साजरा करण्यामागचा उद्देश सांगितला. महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त भारतीय संविधान प्रस्तावनेचे सामुहिक वाचन करण्यात आले. दक्षता देशमुख हिने सूत्रसंचालन व तृप्ती जाधवर हिने आभार मानले. यावेळी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा माने देशमुख आदी उपस्थित होते.

## लायन्स क्लब ऑफ व्टिन सिटीच्या माजी अध्यक्षांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर व्टिन सिटीचे क्लबच्या माजी अध्यक्षांचा सत्कार सोहळा पार पडला.

यावेळी व्यासपीठावर झोन चेअरमन लायन नंदिनी जाधव, सचिव लायन सोमशेखर भोगडे सर्व प्रथम क्लबचे विद्यमान अध्यक्ष ला. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी क्लबचे माजी अध्यक्ष लायन नागेश बुगडे, माजी अध्यक्ष एम.जे.एफ.लायन, ममता बुगडे, माजी अध्यक्ष एम.जे.एफ लायन डॉ. दराहुल चंडक, माजी अध्यक्ष लायन मुकुंद जाधव, माजी अध्यक्ष लायन नंदिनी जाधव, माजी अध्यक्ष जेष्ठ लायन सोमशेखर भोगडे, माजी अध्यक्ष लायन सागर पुकाळे. यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. क्लबच्यावतीने गुलाबपुष्प देऊन अध्यक्ष लायन ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. येथील लायन्स क्लब सोलापूरचे अध्यक्ष लायन ज्ञानेश्वर कुलकर्णी सचिव लायन सोमशेखर भोगडे, खजिनदार लायन प्रभाकर जवळकर उपस्थित होते. सूत्रसंचालन लायन प्रभाकर जवळकर यांनी केले. सचिव सोम शेखर भोगडे यांनी आभार मानले.

## शहा-कोठारी प्रशालेत संविधान दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ नोव्हेंबर**



सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री न. फु. शहा कोठारी प्रशालेत संविधान दिन व शहीद दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड व प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर दुर्गे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशालेतील सहशिक्षिका शिंदे एस. एस. यांनी संविधान दिनाचे व शहीद दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतात सांगितले. प्रशालेतील विद्यार्थिनी सृष्टी कोळी या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्षांनी संविधान दिन व शहीद दिन का साजरा केला जातो याविषयी माहिती आपल्या मनोगतात सांगितले.

प्रशालेतील सर्व विद्यार्थी,शिक्षक, शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सामूहिक संविधान वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डी.बी भांजे यांनी केले.



## बसवेश्वर आयटीआयमध्ये संविधान दिनाचा अमृतमहोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भारतीय संविधान दिनाचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम कार्यालय अधीक्षक पी. एस. दराडे, व्ही. व्ही. जेधे, बी. एस. कोंडगुळे व पाहुण्यांच्या हस्ते संस्थेतील संविधान मंदिराचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांसमोर संविधानाच्या उद्धेशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना व विवेक विचार मंचच्या सहकार्याने झालेल्या कार्यक्रमास जटायु प्रकाशन संस्थेचे प्रमुख सिद्धाराम पाटील उपस्थित होते. आय टी आय व्यवस्थापन समितिचे सदस्य व ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतिले यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे प्रभारी उपप्राचार्य राजेंद्र आवडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास विवेक विचार मंचच्या जिल्हा संयोजिका अश्विनी चव्हाण, शहर संयोजक ॲड. प्रशांत कांबळे, कोषाध्यक्ष श्रीधर खेडगीकर, मारुती साळुंके, शशिकांत वाघमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळकृष्ण पुतळे यांनी केले तर स्मिता शिंदे यांनी आभार मानले.एस.आर. जगझाप यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य एस.आर.भालचिम यांच्या मार्गदर्शनाखाली गट निदेशक एस.आर.गोलेकर, एन.एस. म्हेत्रे, सी.डी. जाधव तसेच सर्व गट निदेशक व एन. एस. एस. टीमने परिश्रम घेतले.

## भाषा अनुवादाला व्यावसायिक महत्त्व प्राप्त : कुलगुरू

### सोलापूर विद्यापीठात राज्यस्तरीय अनुवाद कौशल्य कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**




आज देशासह संपूर्ण जगभरात विविध भाषा बोलली जाते. भाषा ही ज्या-त्या परिस्थितीला अनुसरून असते. एआय व मशीन लर्निंगच्या युगात देखील भाषा अनुवादाला व्यावसायिक महत्त्व अधिक असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भाषा व वांग्मय संकुलाच्यावतीने अनुवाद कौशल्य या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुलगुरू प्रा. महानवर हे बोलत होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर भाषा व वांग्मय संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कमलाकर रुगे यांनी केले.

कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले की, सोलापूर हे बहुभाषिक शहर आहे. आज सोलापुरात अनेक भाषा बोलली जाते. म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात ही आठ भाषा अभ्यासक्रमासाठी आहेत. भारतात ६४ भाषा आहेत. परदेशी भाषाचे देखील वर्ग विद्यापीठात भविष्यात सुरू करण्यात येणार आहे. विशेषतः चायनीज, रशियन, जापनीज भाषेचे वर्ग यामध्ये सुरू करण्यात येईल. भाषा अनुवादासाठी व्यावसायिक महत्त्व असून त्यामध्ये देखील अनेकांना करिअर करता येईल, असेही ते यावेळी म्हणाले.

प्राचार्य डॉ. संतोष कोटी म्हणाले की, भाषांतर ही सहज व सुलभ प्रक्रिया आहे. जन्मतः भाव भावनांचे हस्तांतरण होत असते. यातूनच मातृभाषा विकसित होते. वेगवेगळ्या भाषेत सहज संचारासाठी अनुवादाची गरज आहे. आज भाषा व संस्कृतीचे अभ्यास करणारे संशोधक तयार होत आहेत. मशीन ट्रान्सलेशनच्या युगातही भाषा अनुवादकांना देखील महत्त्व आहे. भाषा अनुवादाचे कौशल्य खूप महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

या कार्यशाळेत डॉ. गौतम कांबळे यांनी भाषा व वांग्मय संकुलाविषयी विस्तृत माहिती दिली. राज्यभरातील अध्यापक व संशोधक यात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली यांनी केले.

## संत श्री ज्ञानेश्वर माऊलींचा संजीवन समाधी सोहळा व जागतिक सहिष्णुता सप्ताहाचा समारोप

**पुणे, दि. २८ नोव्हेंबर-**

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एम आयटी, पुणे, भारत व श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संत शिरोमणी तत्वज्ञ श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७२८ व्या संजीवन समाधी सोहळा व जागतिक सहिष्णुता सप्ताहाचा समारोप 'श्री संत ज्ञानेश्वर-तुकाराम ज्ञानतीर्थ', विश्वरूप दर्शन मंच, श्रीक्षेत्र आळंदी येथे वारकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. इद्रायणीत वारकऱ्यांच्या गुलाल, बुक्का व फुलांची ओंजळ वाहून ज्ञानेश्वर माऊलीचे भावपूर्ण स्मरण केले. भजन करून नामस्मरणाचा गरज केला. यावेळी विश्वरूप दर्शन मंचावर घंटानाद करण्यात आला. विश्वशांती केंद्राच्या वतीने वारकऱ्यांना महाप्रसाद देण्यात आला.

तत्पूर्वी हभप डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांनी काल्याचे कीर्तन केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. याद्वारे शेकडो वर्षांची परंपरा जपण्यात आली. इंद्रायणीच्या घाटावर वरकऱ्यांनी या समाधी सोहळ्याच्या काल्याच्या महाप्रसादाचा लाभ घेतला. या समारंभासाठी विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी



प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, हभप तुळशीराम दा. कराड, उषा विश्वनाथ कराड, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्यकारी संचालिका डॉ. सुचित्रा कराड नागरे, प्रा. स्वाती कराड चाटे, आचार्य श्री शिवम, प्रसाद रांगणेकर, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन. पठाण, डॉ. मिलिंद पांडे, योगगुरू पाडेकर गुरूजी उपस्थित होते.

या सप्ताहात सुफी सं व इस्लाम धर्माचे अभ्यासक लतिफ पटेल, भागवतार्चा स्वामी डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे, संत साहित्याचे अभ्यासक हभप डॉ. रविदास महाराज शिरसाठ, हभप डॉ. तुकाराम महाराज गरुड ठाकुरबुवा दैठणकर व हभप बापूसाहेब मोरे देहूकर या सारख्या नामवंत कीर्तनकारांनी कीर्तनरुपी सेवा सादर केली. तसेच श्रृती पाटील, मानसी वझे, डॉ. आशिष रानडे व विश्वशांती संगीत कला अकादमीच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभंगवाणी व भक्तीसंगीताचे कार्यक्रम सादर केले.

प्रा. डॉ. कराड म्हणाले,“ या सप्ताहात प्रवचन, कीर्तन, गायन व भजन या मार्गाने नामवंतांनी माऊलीचरीण सेवा रूजू केली. पुढील वर्षभर लोकशिक्षणाचे कार्यक्रम व विश्वरूप दर्शन मंचावर होणार आहेत. यामध्ये सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी जनजागृतीद्वारे विज्ञान व अध्यात्म यांचा संगम होईल. पवित्र तीर्थ क्षेत्रांचे खऱ्या अर्थाने ज्ञान तीर्थ क्षेत्रामध्ये परिवर्तन घडविण्याचा आमचा प्रयत्न आहे. ज्ञान, कर्म आणि भक्तीतून ईश्वर दर्शन होते. त्याग आणि समर्पणाचा संतानी दिलेला संदेश व त्यांची शिकवण आत्मसात करून या मार्गाने चालण्याचा प्रयत्न करावा.”

हभप शालीकराम खंदारे यांनी सूत्रसंचालन व महेश महाराज नलावडे यांनी आभार मानले.



## सोलापूर शहर जिल्हा बालविवाहमुक्त करा

### चाईल्ड लाईनचे आनंद ढेपे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर जिल्ह्यातील बालविवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शहर व जिल्ह्यात बालविवाहमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शहर भागातील अंगणवाडीसेवा योजना अंतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी शहर पश्चिम सोलापूर बिट कुचननगर मुख्यसेविका रोहिणी मधुसुदन निर्मळे यांच्या मार्गदर्शनखाली सोलापूर जिल्हा बालविवाह मुक्त कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा महिला व बालविकास कार्यालय व कोनापूर चाळ येथील ७९ ते ८४ अंगणवाडी यांच्यावतीने कोनापूर चाळीत कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी चाईल्ड लाईनचे जिल्हा समन्वयक आनंद ढेपे, जिल्हा संरक्षण अधिकारी रेश्मा गायकवाड, अनोज कदम, अंगणवाडी सेविका मदतनीस, किशोरी, माता पालक यांची उपस्थितीत होती.

दरम्यान उपस्थितांना बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगताना बालविकास प्रकल्प अधिकारी दिपक ढेपे यांनी सोलापूर जिल्हा बालविवाहमुक्त करण्यास जनजागृतीचे आवाहन केले. सूत्रसंचालन अंगणवाडी सेविका वैशाली गायकवाड यांनी केले. तर प्रस्ताविक मुख्यसेविका रोहिणी निर्मळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार अंगणवाडी सेविका स्वप्नाली रुईकर यांनी केले. यावेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस, माता पालक किशोरी मुली उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# अदानी, संभल मुद्यावरून लोकसभेत गोंधळ

## कामकाज स्थगित

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

अदानी तसेच संभलमधील हिंसाचाराच्या मुद्यावर चर्चा करण्यात यावी, या मागणीसाठी लोकसभेत आज पुन्हा गदारोळ झाला. त्यामुळे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

आज सकाळी ११ वाजता सभागृहाचे कामकाज सुरू होताच सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला; मात्र अदानी तसेच संभलमधील हिंसाचाराच्या मुद्यावर चर्चा घेण्यात यावी, या मागणीसाठी विरोधी सदस्यांनी घोषणाबाजी केली. सदस्यांनी प्रश्नोत्तराचा तास चालू देण्याचे आणि आपल्या जागेवर जाण्याचे आवाहन बिर्ला यांनी सदस्यांना केले. विरोधी सदस्य असे मुद्दे उपस्थित करण्याचा प्रयत्न करीत आहे, ज्याच्याशी देशाला काही देणेघेणे नाही, असे बिर्ला म्हणाले. विरोधी सदस्यांची घोषणाबाजी सुरूच होती, त्यामुळे बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित केले.

कामकाज पुन्हा सुरू होताच विरोधी सदस्यांनी घोषणाबाजी केली. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि सपाचे सदस्य यात आघाडीवर होते. घोषणा देत विरोधी बाजूचे सदस्य सभागृहाच्या मधोमध आले. या गोंधळातच पिठासीन सभापती कृष्णप्रसाद तेन्नटी यांनी आवश्यक कागदपत्रे सभागृहात सादर करून घेतली.



लोकसभेत गोंधळ घालताना विरोधक

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सदस्यांच्या वर्तणुकीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत विधेयकावर चर्चा करण्यासाठी वेळ निश्चित करण्यात आला आहे, कामकाजाविषयक अन्य नियमही तयार करण्यात आले, पण विरोधी सदस्य हे नियम तोडत आहे. विरोधी सदस्यांच्या या वर्तनाचा मी तीव्र निषेध करतो, असे रिजिजू म्हणाले. आपल्या मतदारसंघाचे प्रश्न मांडण्याची, त्यावर चर्चा करण्याची संधी अधिवेशनातून नवीन सदस्यांना मिळत असते, पण गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागल्यामुळे नवीन सदस्य यापासून वंचित होतात, असे ते म्हणाले.वक्फ दुरुस्ती विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीला मुदतवाढ देण्याची मागणी सरकारने मान्य केली, तरी विरोधक गोंधळ घालतात, असे ते म्हणाले. सभागृहातील गोंधळ थांबत नसल्यामुळे अखेर कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

## राज्यसभेतही कामकाज स्थगित

अदानी समूहातील कंपन्यांच्या गैरकारभाराची संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशी करण्यात यावी, या मागणीवरून आज दुसऱ्या दिवशीही राज्यसभेत गदारोळ करण्यात आला, यामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

एकदा स्थगित झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनकड यांनी दुपारी १२ वाजता कामकाज सुरू झाल्यावर प्रश्नोत्तराचा तास पुकारताच विरोधी बाजूचे सदस्य एकाच वेळी बोलू लागले, त्यामुळे कोण काय बोलत आहे, हे समजत नव्हते. धनकड यांनी कोणाचेच वक्तव्य कामकाजात नोंदवले जाणार नाही, असे म्हटले.

सदस्यांनी शांत राहावे, प्रश्नोत्तराचा तास चालू द्यावा, असे आवाहन धनकड करीत होते. पण सदस्य त्याला प्रतिसाद देत नव्हते. हे वरिष्ठ सभागृह आहे, देशातील १४० कोटी जनतेच्या आशाआकांक्षांची पूर्तता करणे ही सदस्यांची जबाबदारी आहे, सदस्यांनी आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे, याचे स्मरण धनकड यांनी करून दिले. संसद हे सकारात्मक चर्चेचे सभागृह आहे, त्यामुळे सदस्यांनी प्रश्नोत्तराचा तास चालू द्यावा, हे अतिशय आवश्यक आहे, असे आवाहन धनकड यांनी केले. पण, विरोधी सदस्यांची घोषणाबाजी सुरूच होती. सभागृहातील गोंधळ थांबत नसल्यामुळे धनकड यांनी कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले. ■

# प्रियांका वढेरांनी घेतली लोकसभा सदस्यत्वाची शपथ

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

काँग्रेसच्या खासदार प्रियांका वढेरा आणि काँग्रेसचे रवींद्र चव्हाण यांनी आज लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.

लोकसभेचे कामकाज आज सुरू होताच सभापती ओम बिर्ला यांनी शपथेसाठी प्रियांका वढेरा यांचे नाव पुकारले. बिर्ला यांनी त्यांना लोकसभा सदस्यत्वाची शपथ दिली.

राहुल गांधी यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या केरळमधील वायनाड मतदारसंघातील पोटनिवडणुकीत वढेरा विजयी झाल्या. त्यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा ४ लाखावर मतांनी पराभव केला. राहुल गांधी उत्तरप्रदेशच्या रायबरेली तसेच केरळमधील वायनाड अशा दोन लोकसभा मतादरसंघातून विजयी झाले होते. रायबरेलीची जागा कायम ठेवत त्यांनी वायनाडच्या जागेचा राजीनामा दिला. त्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली.

शपथविधीसाठी प्रियांका वढेरा आपली आई काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी आणि भाऊ लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींसह संसदभवनात दाखल झाल्या. नंतर लोकसभेत त्या राहुल गांधी यांच्यासह आल्या.

### संसदेत जनतेचे प्रश्न मांडणार

संविधान माझ्यासाठी सर्वोपरी आहे आणि लोकसभेत प्राधान्याने मी जनतेचे मुद्दे उपस्थित करेल, असे प्रियांका वढेरा यांनी सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर संसदभवनात पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. राहुल गांधी यांच्यासोबत संविधानाला मजबूत करण्याची लढाई लढत, राहुल तसेच जनतेचे मुद्दे उपस्थित करण्याला माझी सर्वोच्च प्राथमिकता राहील, असे त्या म्हणाल्या.



प्रियांका वढेरा यांनी गुरुवारी लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर एकत्र आलेले गांधी कुटुंब

प्रियांका वढेरा संसदेत आल्यामुळे पक्षाला नवीन ऊर्जा तसेच नवीन शक्ती मिळाल्याचे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी म्हटले. (तभा वृत्तसेवा)

## रवींद्र चव्हाण यांनीही घेतली शपथ



नांदेड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत विजयी झालेले काँग्रेसचे रवींद्र वसंतराव चव्हाण यांनीही आज लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. चव्हाण यांना ओम बिर्ला यांनी शपथ दिली. वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे या मतादरसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. ■

# वक्फ दुरुस्ती विधेयकावरील जेपीसीला मुदतवाढ

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

वक्फ दुरुस्ती विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी आज मुदतवाढ देण्यात आली. यासंदर्भातील प्रस्ताव लोकसभेत आवाजी मतदानाने पारित करण्यात आला.

संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदतवाद देण्याचा प्रस्ताव मांडला. आवाजी मतदानाने हा प्रस्ताव पारित झाला. प्रस्ताव पारित झाल्याची घोषणा पिठासीन सभापती कृष्णप्रसाद तेन्नटी यांनी केली.

वक्फ दुरुस्ती विधेयकावर चर्चेची आणखी गरज आहे, त्यामुळे अंतिम अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी या संसदीय समितीतील विरोधी पक्षांच्या सदस्यांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याकडे केली होती.

वक्फ कायद्यात सुधारणा करण्याबाबतचे विधेयक सरकारने संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मांडले होते. या विधेयकाला काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्यांनी विरोध दर्शवला. या विधेयकावर आणखी चर्चेची आवश्यकता असल्यामुळे ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची मागणी विरोधी सदस्यांनी केली होती. ही मागणी मान्य करीत सरकारने जगदंबिका पाल यांच्या नेतृत्वात संयुक्त संसदीय समिती स्थापन केली. या समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी २९ नोव्हेंबर ही तारिख देण्यात आली होती. त्याला आता मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे आता हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मंजुरीसाठी येणार नाही. (तभा वृत्तसेवा)

# डोनाल्ड ट्रम्प भारताचे मित्र : पीयूष गोयल

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारताचे मित्र आहेत आणि भारत-अमेरिका मैत्री फुलत राहील तसेच वाढत राहील, असे वाणिज्य उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी गुरुवारी सांगितले.

विदेशी उत्पादनांवर सर्वाधिक शुल्क लादणाऱ्य सर्व प्रमुख देशांपैकी भारत एक आहे आणि सत्तेत आल्यास असेच कर भारतावर लागू करू, असे आश्वासन ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारादरम्यान दिले होते. राष्ट्राध्यक्षपद अधिकृतपणे स्वीकारल्यानंतर आणि नवीन सरकारने पदभार स्वीकारल्यानंतर आम्ही अमेरिकेतील मंत्र्यांसोबत काम करण्यास उत्सुक आहोत, असे पत्रकारांशी चर्चा करताना गोयल यांनी सांगितले.

अमेरिकेत ट्रम्प प्रशासनाने कार्यभार स्वीकारल्यानंतर भारताला कसे स्थान मिळते, या प्रश्नाला उत्तर देताना गोयल म्हणाले की, मला वाटते की, आम्हाला घाई करायची गरज नाही. अमेरिकी सरकार येण्याची, कार्यभार सांभाळण्याची आणि औपचारिक तसेच अधिकृत विचार व्यक्त करण्याची संधी द्यायला पाहिजे. मात्र, अनुभव लक्षात घेता, मला कोणत्याही प्रकारची समस्या दिसत नाही. (वृत्तसंस्था)

## पंतप्रधान मोदींना धमकी देणाऱ्या महिलेस अटक

**मुंबई** : एका ३४ वर्षीय मानसिकदृष्ट्या अस्थिर असलेल्या महिलेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना इजा करण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. शहर पोलिस नियंत्रण कक्षाला बुधवारी धमकीचा फोन आला. मुंबई पोलिस पथकाने महिला कॉलरचा शोध लावला आणि तिला चौकशीसाठी ताब्यात घेतले. ■

## चित्रपट वार्ता

### ‘हाऊसफुल ५’मध्ये दिसणार हे मोठे कलाकार

**मुंबई** : चित्रपटाचे चित्रीकरण भव्य लोकेशन्सवर केले जाणार आहे. त्यामुळे हाऊसफुलचा पाचवा भाग प्रेक्षकांसाठी एक भन्नाट अनुभव ठरणार आहे. या चित्रपटाच्या पाचव्या भागात बॉलिवूडच्या लोकप्रिय अभिनेत्री दिसणार आहेत अक्षय कुमारसोबत. ‘हाऊसफुल ५’च्या कलाकारांची घोषणा झाली असून त्यात अक्षय कुमार, रितेश देशमुख, अभिषेक बच्चन, फरदीन खान, जॅकलीन फर्नांडिस, सोनम बाजवा, नरगिस फाखरी, संजय दत्त, जॅकी श्रॉफ, नाना पाटेकर, चंकी पांडे, जॉनी लिव्हर, श्रेयस तळपदे, डिनो मोरिया, चित्रांगदा सिंग, रंजीत, सौंदर्या शर्मा, निकितिन धीर दिसणार आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन तरुण मनसुखानी यांनी केले आहे. ही स्टारकास्ट म्हणजे एकाच वेळी कॉमेडी आणि ग्लॅमरचा धमाका असणार आहे. ■

### नयनताराकडे आहे खाजगी जेटसह आलिशान गाड्या



**मुंबई** : नयनताराला लेडी सुपरस्टार म्हणून दक्षिणेत ओळखले जाते. सध्या ती कोट्यवधींच्या संपत्तीची मालकीण आहे. देशातील अनेक शहरांमध्ये तिची संपत्ती आहे. २०२२ मध्ये तिने खाजगी जेट खरेदी केले. केवळ वयाच्या ४० व्या वर्षी नयनताराकडे गडगंज संपत्ती आहे. अभिनेता शाहरूख खानसोबत तिने ‘जवान’ या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली होती. तिचा हैदराबादमध्ये आलिशान बंगला आहे. लग्नानंतर ती पतीसोबत चेन्नईतील चार बीएचके फ्लॅटमध्ये राहते. या फ्लॅटची किंमत सुमारे १०० कोटी रुपये आहे. नयनतारा एका चित्रपटासाठी १२ कोटी रुपयांचे मानधन घेते तर एका ब्रॅण्ड प्रमोशनसाठी ४ ते ५ कोटी रुपये घेते. तिच्या ताफ्यात अनेक महागड्या गाड्याही आहेत. ■

# उद्धव ठाकरे मध्यरात्रीनंतर कुटुंबासह देश सोडतील

## रामदास कदमांचा दावा

◆ **शिर्डी, २८ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ठाकरे गट महाविकास आघाडीपासून वेगळा होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. त्यातच आता शिवसेना नेते रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. एक दिवस असा येईल की, उद्धव ठाकरे मध्यरात्रीनंतर २ वाजता कुटुंबासह देश सोडतील, असा दावा रामदास कदम यांनी केला.

रामदास कदम यांनी शिर्डी येथे साईबाबांचे सहकुटुंब दर्शन घेतले. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले. कदम म्हणाले की, मी साईंचा भक्त आणि सेवक आहे. शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ऐतिहासिक विजय मिळाला. साईबाबांच्या



आशीवार्दानेच जनतेचा कौल महायुतीला मिळाला. एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांत घेतलेले निर्णय जनतेपर्यंत पोहोचले. ज्या पद्धतीने लोकाभिमुख निर्णय महायुती सरकारने घेतले, त्याच पद्धतीने चांगले निर्णय यापुढेही व्हावे, यासाठी मी साईबाबांना साकडे घातले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वात कोट्यवधींचा निधी येईल आणि राज्याचा अपेक्षेपेक्षा जास्त विकास होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मी तुम्हाला पुढचे भविष्य सांगतो. एक दिवस असा येईल की, उद्धव ठाकरे रात्री २ वाजता आपल्या कुटुंबासह देश सोडून जातील. माझे हे शब्द लिहून ठेवा. बाळासाहेब ठाकरे यांच्याशी त्यांनी बेईमानी केली, त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला. त्यांनी जे पाप केले, त्याचे प्रायश्चित्त उद्धव ठाकरेंना भोगावेच लागेल, असे कदम म्हणाले. (वृत्तसंस्था)




ऑडी इंडियाचे प्रमुख बलबीरसिंग ढिल्लो यांच्या हस्ते गुरुवारी मुंबईत एका समारंभात ऑडी क्यू७ फेसलिफ्ट या नव्या कारचे सादरीकरण करण्यात आले. अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशी ही कार आहे

# युती धर्माचे पालन करून एकनाथ शिंदेंनी आदर्श ठेवला

## खा. श्रीकांत शिंदेंचे प्रतिपादन

◆ **मुंबई, २८ नोव्हेंबर**

काळजीवाहू मुख्यमंत्री असलेले माझे वडील एकनाथ शिंदे यांनी युती धर्माचे पालन करून एक चांगला आदर्श ठेवला आहे. त्यांच्या स्वतःच्या महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवल्या, असे प्रतिपादन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले.



याबाबतची पोस्ट त्यांनी एक्स या समाज माध्यमावर टाकली. एकनाथ शिंदे यांचे महाराष्ट्रातील जनतेसोबत अतूट असे नाते आहे. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकासाठी रात्रंदिवस काम केले आहे, असे त्यांनी सांगितले. मला माझ्या वडिलांबाबत अभिमान आहे. त्यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. महायुतीचा नवा मुख्यमंत्री कोण? हा निर्णय त्यांनी या दोन केंद्रीय नेत्यांवर सोपविला. महायुतीचा धर्म पाळताना त्यांनी स्वतःच्या महत्त्वाकांक्षा आड येऊ दिल्या नाहीत, असे श्रीकांत शिंदे यांनी नमूद केले.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून नाही तर सर्वसामान्य सेवक म्हणून जनतेची सेवा केली. त्यांनी आपल्या शासकीय निवासस्थानाचे दरवाजे लोकांसाठी सदैव खुले ठेवले होते. सत्तेचे आकर्षण सर्वांनाच असते, पण माझे वडील यास अपवाद आहेत. त्यांच्यासाठी देश आणि जनतेची सेवा सर्वोच्च आहे. त्यांचे हे विचार नवीन पिढीला नेहमीच प्रोत्साहन देत राहील, असेही श्रीकांत शिंदे म्हणाले. (वृत्तसंस्था)

## दिल्लीत आढळला ‘मेंदूज्वरा’चा रुग्ण

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

‘एन्सेफलायटीस’ जपानी मेंदूज्वराया संसर्गाचा रुग्ण दिल्लीत आढळला असून, त्याला विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. ही माहिती अधिकृत सूत्रांनी गुरुवारी दिली.

राष्ट्रीय संसर्गजन्य नियंत्रिण विभाग मार्गदर्शक तत्त्वांनुसार रुग्णाची तपासणी करण्यात येत आहे तसेच काळजीचे कोणतेही कारण नसल्याचे सूत्रांनी सांगितले. पश्चिम दिल्लीतील एका ७२ वर्षीय व्यक्तीला छातीत दुखू लागल्याने त्याला ३ नोव्हेंबरला ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्समध्ये दाखल करण्यात आले होते, असे बुधवारी दिल्ली महानगरपालिकेने जारी केलेल्या आदेशाचा संदर्भ देत सूत्रांनी सांगितले.

रुग्णाला २० वर्षांपासून मधुमेहाचा तसेच हृयविकाराचा त्रास आहे. त्याचे शरीर कमजोर झाले. ६ नोव्हेंबरला रुग्णाची एन्सेफलायटीस ससंर्ग चाचणी करण्यात आली होती. त्यानंतर या चाचणीचा निकाल सकारात्मक आला. १५ नोव्हेंबरला त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली होती, असेही सूत्रांनी सांगितले. २०२४ मध्ये २४ राज्या आणि केंद्रशासित प्रदेशांमधून १,५४८ प्रकरणे या संसर्गाची नोंदविण्यात आली आहेत. यापैकी ९२५ प्रकरणे केवळ आसाममधून आढळून आली आहेत. (वृत्तसंस्था)

# लिव्ह इन पार्टनरची हत्या करून केले शरीराचे तुकडे

◆ **रांची, २८ नोव्हेंबर**

झारखंडच्या खुंटी जिल्ह्यातील जंगली भागात कसाई म्हणून काम करणाऱ्या तरुणाने त्याच्या लिव्ह-ईन पार्टनरचा गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तिच्या शरीराचे तुकडे केले, असे पोलिसांनी सांगितले.

नरेश भेंगरा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. २४ नोव्हेंबरला जरीगड पोलिस स्थानकाच्या हद्दीतील जोर्डाग गावाजवळ एक भटका श्वान मानवी शरीराच्या अवयवांसह दिसला. ही बाब जवळपास १५ दिवसांनी उघडकीस आली.

भेंगरा हा मागील काही वर्षांपासून तमिळनाडूतील याच जिल्ह्यातील त्याच्या मैत्रिणीसोबत लिव्हइनमध्ये राहत होता. काही काळापूर्वीच तो झारखंडला परतला होता. त्याने या मैत्रिणीला न सांगता दुसऱ्या मुलीशी विवाह केला होता. तिने त्यांच्या घरी जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, त्याने विवाह केला असल्यामुळे तिला त्याच्या घरी न नेता जरियागड पोलिस स्थानकाच्या हद्दीतील जोर्डग गावात घराजवळील जंगलात नेले आणि ८ नोव्हेंबरला तिची हत्या करून मृतदेहाचे तुकडे केले. त्याला अटक करण्यात आली असल्याचे खुंटीचे पोलिस अधीक्षक अमन कुमार यांनी सांगितले.

हा आरोपी तामिळनाडूतील एका दंकानात कसाईचे काम करीत होता, असे या प्रकरणाचा तपास करणारे पोलिस अशोक सिंह यांनी सांगितले. महिलेच्या शरीराचे ४० ते ५० तुकडे करून त्याने ते जंगलात वन्य प्राण्यांना खाण्यासाठी ठेवले असल्याची त्याने कबुली दिली. परिसरातील एक श्वान मानवी हात खात असल्याचे दिसल्यानंतर पोलिसांनी अनेक भाग जप्त केले, असे सिंग यांनी सांगितले. एका योजनेनुसार त्याने तिला ऑटोरिक्षातून खुंटी येथे नेले आणि तिला थांबण्यास सांगितले. त्यानंतर तो धारदार शस्त्र घेऊन परतला. तिच्यावर बलात्कार केल्यानंतर ओढणीच्या सहाय्याने तिचा गळा दाबून हत्या केली. त्यानंतर त्याने तिच्या मृतदेहाचे ४० ते ५० तुकडे केले आणि तो त्याच्या पत्नीसोबत राहण्यासाठी घराकडे निघाला, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### ‘छावा’च्या प्रदर्शन तारखेत पुन्हा बदल

**मुंबई** : ऐतिहासिक कालखंडावर आधारित ‘छावा’ या आगामी चित्रपटात बॉलिवूड अभिनेता विक्की कौशल छत्रपती संभाजी महाराजांची मुख्य भूमिका साकारणार आहे. चित्रपटाचा धमाकेदार टीझर आधीच प्रदर्शित झाला असून तो चाहत्यांच्या पसंतीस उतरला. दरम्यान, चित्रपटाची प्रदर्शन तारीख बदलली आहे. यापूर्वी हा चित्रपट डिसेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, डिसेंबरमध्ये एकाच वेळी अनेक चित्रपट प्रदर्शित होत आहेत. या कारणाने ‘छावा’ या चित्रपटाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. आता हा चित्रपट १४ फेब्रुवारी २०२५ रोजी चाहत्यांच्या भेटीस येत आहे. विक्की कौशलसोबत या चित्रपटात अभिनेत्री रश्मिका मंदाना छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाई भोसले यांच्या भूमिकेत दिसणार आहे. ■

### मृणाल दुसानिस करणार नव्या मालिकेतून पुनरागमन



**मुंबई** : स्टार प्रवाह वाहिनीवर नवीन मालिका ‘लग्नानंतर होईलच प्रेम’ भेटीला येते आहे. या मालिकेत मृणाल दुसानिस, ज्ञानदा रामतीर्थकर, विवेक सांगळे, विजय आंदळकर, अविनाश नारकर, ऋजुता देशमुख, कश्मिरा कुलकर्णी, अनुष्का पिंपुटकर, प्रसन्न केतकर, संयोगिता भावे, आभा वेलणकर, विशाल कुलथे, श्रेयस कदम, स्नेहल चांदवडकर आदी कलाकार असतील. १६ डिसेंबरपासून सायंकाळी ७ वाजता ही नवी कोरी मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येईल. जवळपास चार वर्षांनंतर मृणाल दुसानिस या मालिकेतून पुनरागमन करणार आहे. नंदिनी मोहिते पाटील असं तिच्या व्यक्तिरेखेचे नाव असून समाजकार्याची आवड असणारी आणि सतत इतरांच्या हितासाठी झटणारी ती आहे. मालिकेची निर्मिती शशांक गणेश सोळंकी यांच्या सेव्हेन्थ सेन्स मीडिया निर्मिती संस्थेने केली आहे. उत्कर्ष जाधव या मालिकेचे दिग्दर्शन करणार आहेत. ■

## अग्रलेख...

# कटोरा पुन्हा फेकताना...

पक्षप्रमुखांस पसंत नसतानाही माध्यमे ज्यांचा उल्लेख वारंवार उबाठा गट असाच करतात, त्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाने आता पुन्हा एकदा कटोरा फेकून देण्याची तयारी सुरू केली आहे. अशीच एक पहिली घटना जून २०१७ मध्ये घडली होती. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबतच्या युतीचा कटोरा आवेशात फेकून देत स्वबळाचा नारा दिला होता. यापुढे कोणाशी युती नाही, आपण स्वबळावर लढणार आणि मंत्रालयावर शिवसेनेचा भगवा फडकावणार, अशी प्रतिज्ञा त्यांनी मुंबईच्या गोरेगावात शिवसैनिकांच्या एका मेळाव्यात केली आणि स्वबळाचा स्वाभिमान जागृत झालेल्या प्रत्येक सैनिकाने प्रचंड जल्लोषात त्यांच्या प्रतिज्ञेचे स्वागत केले होते. संपूर्ण महाराष्ट्र आपल्याला कुटुंबप्रमुख मानतो, त्यामुळे आपले कुटुंब ही आपली जबाबदारी आहे, अशा गोड गैरसमजुतीत नवा धक्का देऊन महाराष्ट्राच्या मतदारांनी या पक्षाची वाताहत केली. शिवसेनेच्या उबाठा गटाचे विधान परिषदेतील नेते अंबादास दानवे यांनीच हा गौप्यस्फोट माध्यमांसमक्ष केला. ज्योतिष, भविष्य हा प्रकार म्हणजे शास्त्र असते की थोतांड, यावर विद्वानांच्या विश्वात कितीही वितंडवाद होत असले, तरी राजकारण मात्र भविष्याच्या भरवशावरच चालत असते. उबाठा गटासही तसेच वाटत असले पाहिजे. त्यामुळे त्या गटाने आपल्या कुंडलीतील ग्रहस्थितीला शाश्वत रूप देण्याकरिता कंबर कसली आहे, असा दानवे यांच्या त्या सूचक संकेतांचा अर्थ म्हणावा लागेल. तसे करणे ही राजकारणाची किंवा त्या पक्षाची नव्हे, तर काळाची गरज आहे, अशी भावना या पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत यांची आहे. हे राऊत म्हणजे आधुनिक काळातील संजयच आहेत. महाभारतातील संजय ज्याप्रमाणे अंध धृतराष्ट्राच्या महाली बसून कुरुक्षेत्रावरच्या रणभूमीवरील घडामोडींचा साद्यंत वृत्तांत धृतराष्ट्रास नाट्यमयरीत्या कथन करीत असे, तीच भूमिका आता संजय राऊत आपल्या वातानुकूलित दालनात बसून निभावत असतात. महाभारताच्या तेराव्या अध्यायातील एका प्रसंगाचा दाखला देऊन भगवान श्रीकृष्णाने अर्जुनास केलेल्या उपदेशाचे याचि देही पाहिल्याच्या आविर्भावात त्यांनी दिलेले उदाहरण हा त्याचाच पुरावा ठरतो. कुरुक्षेत्रावरील युद्ध शिगेला पोहोचलेले असताना योद्धा अर्जुन एका क्षणी काहीसा व्यथित होऊन, पृथ्वीतलावर हे काय चालले आहे, असा उद्विग्न प्रश्न श्रीकृष्णास विचारतो आणि यावर काहीच उपाय नाही का, या विचाराने त्रस्त होतो. तेव्हा दिलासादायक श्रीकृष्णाने दिलेले उत्तर याच राऊत यांनी ऐकले आणि एका भर सभेत शेकडो श्रोत्यांच्या साक्षीने उद्धव ठाकरे यांना सांगितले. पृथ्वीतलावरील हा सारा प्रकार थांबवून राष्ट्र, धर्म, देव यांचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्या चार खांद्यांवर आहे, त्यापैकी एक खांदा उद्धव ठाकरे यांचा आहे, असे उत्तर श्रीकृष्णाने दिल्याचा जगातील पहिलावहिला खात्रीलायक गौप्यस्फोट राऊत यांनी त्या दिवशी एका जाहीर सभेत पहिल्यांदाच केला. ठाकरे यांच्या महत्तेची महती जगाला सांगणारे राऊत यांचे आणखीही काही किस्से पुढे जगप्रसिद्ध झाले आहेत. उद्धव ठाकरे यांची सर्वोत्तम मुख्यमंत्री अशी ख्याती पसरल्याची बातमी पोहोचताच अमेरिका, रशियाचे राष्ट्राध्यक्ष आणि ब्रिटनचे राजपुत्र यांची तातडीची टेलिकॉन्फरन्स झाली व त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याविषयीचे कमालीचे औत्सुक्य उघड करून आपल्याला त्यांची ओळख अजून कशी झाली नाही, याविषयी अचंबाही व्यक्त केल्याचा दावा याच राऊतांनी केला. त्यांनी मतदारांना साद घातली आणि पुन्हा एकदा अवघा महाराष्ट्र आपल्या पितृछायेखाली घेण्याकरिता हात फैलावले, पण महाराष्ट्राच्या जनतेस अजूनही बहुधा त्यांच्यावरील त्या ईश्वरी जबाबदारीची महती पटलेली नसावी. आपण कुटुंबप्रमुख आहोत, त्यामुळे चोरला गेलेला आपला पक्ष, पळविला गेलेला पिता आणि हडप केलेली निशाणी पुन्हा मिळवून देण्याचे पुत्रकर्तव्य महाराष्ट्रातील जनता पूर्ण करेल, हा ठाकरे यांचा विश्वास वास्तवात उतरविण्याची जबाबदारी जनतेने स्वीकारलेली नाही, तेव्हा आता आपणच पुढे होऊन पुन्हा एकदा परिवर्तनाची पावले टाकली पाहिजेत, याची जाणीव ठाकरे यांच्या पक्षास झाली आहे.

दानवे यांनी दिलेल्या संकेतावरून तरी सध्या तसेच दिसते. इकडे देशभरातील विविध कार्यक्रमांत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जनतेस एकतेचा संदेश देत असताना, ठाकरे यांनी मात्र एकटेपणाच्या संदेशाची तयारी सुरू केल्याचे दानवे यांच्या संकेतावरून वाटते. 'एक(टे) है तो सेफ है' अशी त्यांची नवी धारणा झाल्याचा या संकेतांचा स्पष्ट अर्थ आहे. २५ वर्षे भाजपासोबतच्या युतीत सडल्यानंतर, त्या सडलेल्या अवस्थेतच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने सावली दिलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेच्या राजकीय कुंडलीतील ग्रहांची पुन्हा काही चलबिचल सुरू झाली आणि स्वबळाचा नारा देताना तो आवेश ओसरतो की काय, अशा शंकेने ठाकरे यांच्या पक्षाच्या राजकीय कुंडलीतील ग्रहस्थिती ताब्यावर आणण्यासाठी पुन्हा एकदा कटोरा फेकण्याची तयारी सुरू झाली, असा या संकेतांचा आणखी एक अर्थ असू शकतो. ठाकरे हे आपल्या शब्दाशी प्रामाणिक असतात, असे म्हटले जाते. सात वर्षांपूर्वीच्या जून महिन्यात शिवसैनिकांच्या मेळाव्यात त्यांनी युतीचा कटोरा फेकल्याचे जाहीर केले, तेव्हाही सर्वांची तीच खात्री होती. आता पुन्हा कोणत्याच पक्षाकडे युतीसाठी कटोरा घेऊन जायचे नाही, असा निर्धार त्या दिवशी त्यांनी केला, पण पक्षाच्या राजकीय कुंडलीतील ग्रहांची चलबिचल काही वेगळ्याच भविष्याचे संकेत देत असल्याची चाहूल लागल्याने व सत्तेच्या कोंबडीचे सोन्याचे अंडे दिवसागणिक मिळविण्यापेक्षा एकदाच कोंबडी कापून सारी सोन्याची अंडी हस्तगत करण्याच्या हव्यासाने हा विचार बहुधा बदलावयास लागला असावा. अन्यथा, युतीसोबत सत्ता उपभोगल्यानंतर सडलेल्या आपल्या पक्षास काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या तंबूत बांधण्याचा निर्णय त्यांनी घेतला नसता. राष्ट्राच्या कल्याणाची जबाबदारी भगवान श्रीकृष्णाने आपल्याही खांद्यावर टाकली आहे, हे संजय राऊत यांनी केव्हाच सांगून ठेवल्याने अशा तडजोडी कराव्या लागणे अपरिहार्य आहे, हे ओळखून त्यांनी तसे केल्यावर पुन्हा मुख्यमंत्रिपद मिळाल्याने, खरोखरीच ईश्वरी कार्यासाठी सिद्ध झाल्याचा साक्षात्कारही त्यांना झाला असावा. अन्यथा, सडलेल्या अवस्थेतही सत्ताप्राप्तीचे स्वप्न सहजपणे साकार होण्याचा योग जुळलाच नसता, हेही त्यांनी ताडले असावे. पण, राजकारणातील प्रश्नांची उत्तरे गणितातील उदाहरणांएवढी सरळधोपट नसतात. त्यामुळेच कोणाही पुढे हाती कटोरा घेऊन न जाता, जे काही करायचे ते स्वबळावर, असा निर्धार केलेल्या ठाकरे यांच्यावरील ईश्वरी जबाबदारीचे भान असलेल्या सैनिकांनी त्यांच्या नव्या निर्णयाचेही स्वागत केले असावे. त्यापुढचा इतिहास फार जुना नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबतच्या नव्या युतीसोबतच्या सत्तेमुळे सडलेल्या अवस्थेवर पुन्हा सत्तातेजाची झळाळी दिसू लागली. ज्यांच्या उद्धारासाठी कार्य करण्याकरिता कंबर कसावयाची, त्या जनता जनार्दनानेच कुटुंबप्रमुखाचा दर्जा नाकारल्याचे स्पष्ट झाल्यानंतर असुरक्षिततेच्या जाणिवांनी या गटास आता जागे केले असावे. 'एक है तो सेफ है' असे मोदी कितीही सांगत असले, तरी एकटे असू, तरच सुरक्षित असू, याची आता त्यांना जाणीव झाली असावी. एकटे असण्यातील सुरक्षिततेच्या नव्या जाणिवेमुळे महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेण्याचा विचार पुढे येत आहे, असे सूचक संकेत अंबादास दानवे यांनी माध्यमांना दिले आहेत. युतीचा कटोरा फेकून देऊन जे काही करायचे ते स्वबळावर, असा निर्धार ठाकरे यांच्या मनात रुंजी घालू लागला असावा, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. कारण देशाच्या, धर्माच्या उद्धाराची जबाबदारी भगवान श्रीकृष्णानेही ठाकरे यांच्या खांद्यावर दिली आहे, असे संजय राऊत यांनीच सभेच्या साक्षीने सांगून ठेवले आहे. गीतेच्या तेराव्या अध्यायातील हा संवाद आजवर अप्रकाशित होता. संजय राऊत यांच्या दिव्य दृष्टीमुळे तो उजेडात आला आहे. पुतिन, ट्रम्प व चार्ल्स यांनाही अचंबित करावयास लावणारा ठाकरे यांचा हा प्रवास आता नव्या वळणावर 'एक(टे) है तभी सेफ है' याच भावनेतून सुरू होणार असेल, तर नवा स्वबळाचा नारा लवकरच एखाद्या मैदानावर घुमेल हे निश्चित आहे. सध्या देश त्याची प्रतीक्षा करीत आहे.

## दृष्टिक्षेप

**विजय पांढरीपांडे**

# शिकण्याच्या संधीतून आपण शिकत का नाही?

कोरोना संपून आता दोन वर्षाधिक काळ लोटला आहे. तो संकटाचा काळ तर होताच; पण आपले डोळे उघडणारा, आपले भान जागवणारादेखील काळ होता. अनेकांनी आपले जवळचे नातेवाईक गमावले. अनेकांनी स्वतः हॉस्पिटलच्या मरण यातना भोगल्या. त्या काळात नात्याचे भावनिक मूल्य कळले. एकत्र राहण्याची गरज, नाती जपण्याची कौटुंबिक जबाबदारी, लहान-मोठ्यांचा परस्परांविषयीचा कर्तव्य भाव या साऱ्याचे भान जागवले. शाळा-कॉलेजात न जाता, नोकरीसाठी ऑफिसला न जाता घरबसल्या आपापली कामे, कर्तव्ये पार पाडण्याची सवय लागली. हळूहळू कोरोना संपला. गाडी रुळावर यायला लागली. सारे काही पूर्ववत सुरू झाले. सर्वच क्षेत्रात झालेले नुकसान भरून काढण्याची स्पर्धा, धावपळ सुरू झाली. या काळात आपण जे काही अनुभवले, त्यातून आपण जे काही शिकलो ते पुढे न्यायला हवे होते. कॅरी ऑन करायला हवे होते. दुर्दैवाने तसे घडले नाही. पुढे जाण्याऐवजी, निदान आहे तिथेच टिकून राहण्याऐवजी आपण पुन्हा मागे गेलो. मूळ पदी आलो. इथेच सारे चुकले.

हा केवळ आपला, आपल्या देशाचा प्रश्न नव्हता. ही जागतिक समस्या, आपत्ती होती. त्यामुळे फक्त आपणच चुकलो असे नाही. आश्चर्य म्हणजे सारे जग चुकले. कुणीच काही शिकले नाही त्या दारुण प्रसंगातून. अजूनही आपल्याला नात्याचे, मैत्रीचे, सहकार भावनेचे मूल्य कळले नाही. नवरा-बायकोत भांडणे होताहेत. घटस्फोट वाढले आहेत. नैराश्य वाढले आहे. कुणीच कुणा बरोबर सुखी नाही. आनंदी तर नाहीच नाही. एकमेकांविषयी तक्रारी आहेत. मुलं आई-वडिलांचे ऐकत नाहीत. त्यांना जुमानत नाहीत. ती नको तितकी मोठी झाली आहेत लहान वयातच. मुजोरी वाढली आहे. आई-वडिलांचा संताप, चिडचिड वाढली आहे. एक प्रकारचे फ्रस्ट्रेशन वाढले आहे. मुलीदेखील सिगारेट ओढताना दिसतात सर्रास. ड्रग, दारूचे व्यसन सर्वसाधारण झाले आहे. काही कुटुंबात आई-वडील-मुलं एकत्र ड्रिंक एन्जॉय करताना दिसतात! कुणालाच कशाचे काही वाटत नाही. बाहेरच्या पार्ट्यांबद्दल तर विचारायलाच नको. आयटी इंडस्ट्रीमुळे पैसे हातात खेळतो आहे. त्यामुळे मनोरंजनाचे हॉटस्पॉट वाढले आहेत. नाती गोती पार विस्कटली आहेत. आईबापांना मुले विचारीत नाहीत. छोट्या छोट्या गोष्टीतून ताणतणाव वाढताहेत. नव्या सुनेला घरात थोरामोठ्यांची अडगळ (एक्स्ट्रा बॅगेज) नको आहे. इस्टेटीच्या छोट्या-मोठ्या वाटण्यादेखील कारण ठरतात गैरसमज अन् भांडण उकरून काढण्यासाठी. त्यामुळे वृद्धांचे प्रश्न वाढले आहेत, उतार वयात, आजारपणात त्यांची विचारपूस करणारे, काळजी घेणारे कुणी नाही. ज्यांच्या जवळ स्वतःचा पैसा, पेन्शन आहे त्यांना तो आधार. पण ज्यांच्या जवळ स्वतःचे काही नाही, जे परावलंबी आहेत त्यांचे हाल कुत्राही खाणार नाही, असे दयनीय आहेत. गंभीर आजारपण आले तर परिस्थिती अधिकच बिकट. अनेकांची मुले परगावी, परदेशात. तिकडेच कायमस्वरूपी स्थायिक. त्यांचाही नाईलाज. संपर्क फक्त व्हिडीओ कॉलपुरता मर्यादित. नातवंडांशी संवाद मोजका. भाषेचा प्रश्न. बोलून बोलून किती काय बोलायचे हा प्रश्न. संवाद साधणे कठीण. तिकडे जायचे म्हटले तर शरीर साथ देत नाही. तिकडची थंडी सहन होत नाही. मेडिकलचा खर्च परवडत नाही. तिथे प्रत्येक जण आपापल्या कामात व्यस्त. तुम्हाला दिवस खायला उठतो. घरातल्या घरात कंटाळा येतो. त्यांच्या विकेंडच्या पार्ट्यांत तुम्ही मिस फिट. म्हणजे तुम्ही तिथेही अडगळच! कौटुंबिक नात्यातला लळा-जिव्हाळा, जुनी भावनिक गुंतवणूक पार लयाला गेली आता. उरलेत कोरडे उपचार. लग्न, मर्तिक यावेळीसुद्धा माणसे जमत नाहीत. निमंत्रण, अभिनंदन, शुभेच्छा, सांत्वन सारे व्हॉट्सॲपवर.. हसू-आसूसाठी ईमोजी आहेतच हाताशी! आठवतं का कुणाला, तुम्ही कधी कुणाला घट्ट मिठी मारलीय? कुणाचा हात हातात घेऊन बोलला आहे? कुणाच्या खांद्यावर माथा टेकून आसवे गाळली आहेत? मन मोकळे केले आहे? तासन्तास हसत-खिदळत गप्पा मारल्या आहेत? मनातल्या गोष्टी शेअर केल्या आहेत? आठवतं?

हे सारे स्पर्श विसरून गेलोय आपण! जिवाभावाचे मित्र-मैत्रिणी राहिल्या नाहीत फारशा... बोलायला, हितगुज करायला. एक सुन्न रितेपण आले आहे आयुष्यात. कशानेही भरून न येणारी पोकळी. त्या खोल गुहेच्या एकांतात भुतासारखे एकटे आहोत आपण! भवतीचे आसमंत दूषित, कलुषित. आपल्याही मनात सद्भाव नाहीच. आहे फक्त क्लेश, द्वेष, अहंकार, हाव, असूया, स्पर्धा, कटुता; त्यापोटी आलेले प्रचंड नैराश्य! ही केवळ आपली, आपल्या देशाची संकुचित त्रिज्येची समस्या नाही. या समस्येचा परीघ फार मोठा आहे. या परिघाने जगाला व्यापून टाकले आहे. ही आता वैश्विक समस्या झाली आहे.

आयटी, नॅनो, इन्फो, एआय या तंत्रज्ञानांची भुतं आहेतच अवतीभवती नाचायला अन् त्यांच्या तालावर आपल्याला नाचवायला आपण गुलाम झालोत या तंत्रज्ञानाचे, सोशल मीडियाचे. आपल्या नकळत या तंत्र मांत्रिकाने आपला ताबा घेतला. आपल्याला वश केले. आता आपले असे स्वतःचे गुपित राहिलेच नाही. गुगल-फेसबुकला तुमची सारी माहिती आहे, जी तुमची तुम्हालादेखील नाही. ना आपल्याला कोरोना समजला, ना कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेला सोशल मीडिया समजला. आपण फार गाफील राहिलो. अजूनही आपले डोळे उघडत नाहीत. आपल्याला सावध व्हावेसे वाटत नाही. संमोहित अवस्थेतच आपण रमलो आहोत. आपण स्वतःच्या बुद्धिमत्तेला, भावनेला, विवेकाला अक्षरशः गहाण टाकले आहे. पुढचा धोका आपल्याला दिसत असूनही त्याकडे आपण डोळेझाक करीत आहोत. मुलाच्या भविष्याची संबंधित जोडप्यांना काळजी नसते. मी, माझा स्वार्थ, माझे सुख हे जास्त महत्त्वाचे. जगात कधी नव्हे तितकी अशांतता, अस्थैर्य, अनागोंदी, म्हणजे तिसऱ्या महायुद्धाची तयारी सुरू आहे. आपण स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवले आहे. हे महायुद्ध वेगळ्या स्वरूपाचे, वेगळ्या पातळीवर लढले जातेय. ते कोरोनापेक्षाही महाभयंकर स्वरूपाचे, राक्षसी संहारक आहे. त्याच्या परिणामाची आपण कल्पनादेखील करू शकत नाही. हे सारे थांबवणे आता कुणाच्याच हातात राहिले नाही. सूत्रधार कुणी वेगळाच आहे. अदृश्य आहे. अनियंत्रित आहे. ही आपत्ती सहज, नकळत आली असे म्हणता येणार नाही. हे संकट आपणच ओढवून घेतले आहे. ही आपलीच करणी आहे. त्यातून सुटका करायची तर भरणी आपल्यालाच करावी लागेल. त्यासाठी पुन्हा एखादा बुद्ध शोधावा लागेल. आकाशातला देवबाप्पा शोधावा लागेल. तोच काहीतरी मार्ग दाखवू शकेल. आपण खोल अंधाऱ्या गर्तेत पडण्याआधी त्याला पुन्हा भूतलावर यावे लागेल. त्याची प्रार्थना करणे एवढेच आपल्या हातात आहे.

७६५९०८४५५५

## वेध

**निशिकांत मायी**

# बांगलादेशी हिंदूंना कोण देणार संरक्षण?

इस्कॉनचे चिन्मय दास यांना अटक करून जामीन नाकारला जाण्याची बांगलादेशातील घटना गंभीर आहे. बांगलादेशात कट्टर इस्लामिक लोकांकडून हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत. त्याविरोधात आवाज उठविला म्हणून दास यांना अटक करत त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवला जाणे चिंताजनक आहे. हिंदूंनी फक्त अत्याचार सहन करायचे, त्याविरोधात आवाज उठवायचा नाही, काही बोलायचे नाही हे अन्यायकारक आहे. एरवी भारतात कुठेही काही खुट्ट जरी वाजले, तरी चवताळून उठणारे स्वयंघोषित पुरोगामी आज हिंदूंवरील अनन्वित अत्याचाराबाबत काहीही बोलायला तयार नाहीत, ही बाब त्यांचे ढंग उघड करणारी आहे. बांगलादेशात जे काही घडले आहे आणि घडत आहे, ते निंदनीय आहे. घडलेल्या घटनांचा अर्थात हिंदूंवर झालेल्या अत्याचाराचा जेवढा निषेध करावा, तेवढा थोडाच आहे. बांगलादेशची निर्मिती झाली तेव्हा धर्मनिरपेक्ष असलेला हा देश हळूच इस्लामिक बनला आणि तेथील हिंदूंवर अत्याचार सुरू झाले. बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य करण्यास प्रारंभ झाला. त्यांच्या घरांवर हल्ले करणे, त्यांची संपत्ती लुटणे, महिलांची अब्रू लुटणे असे प्रकार सुरू झाले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले करून तोडफोड करणे, श्रद्धास्थानांवर आघात करणे यामुळे बांगलादेशातील हिंदू असुरक्षित होऊ लागला होता.



आता सध्या जे अत्याचार सुरू आहेत, त्याने तर हिंदू दहशतीत आहे. त्यातूनच दाससारख्या व्यक्तीने अत्याचाराविरुद्ध आवाज उठविला आणि म्हणून त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. एरवी भारताला फुकटचा सल्ला देणारा आंतरराष्ट्रीय समुदाय बांगलादेशातील घडामोडींबाबत काहीही बोलायला तयार नाही. याचा स्पष्ट अर्थ असा की, आंतरराष्ट्रीय समुदायाकडूनही सोयीची भूमिका घेतली जाते. अत्याचार सहनशक्तीच्या पलीकडे गेल्यामुळे असंख्य हिंदू भारतात येण्यास इच्छुक आहेत. घरदार सोडून ते सगळे जिवाच्या भीतीने भारतात आश्रय घेण्यास आसुसले आहेत. भारताशिवाय त्यांच्याकडे अन्य पर्यायही नाही. त्यामुळे जेवढ्या हिंदूंना भारतात यायचे आहे, त्या सगळ्यांना प्रवेश देण्याबाबत सरकारने सकारात्मक विचार करायला हवा. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने कालपरवा दास यांना झालेल्या अटकेबाबत चिंता व्यक्त केली असली, तरी याने काम भागायचे नाही. बांगलादेशला सक्त ताकीद द्यायला पाहिजे. वेळ पडलीच तर बांगलादेशला धडाही शिकवला पाहिजे. हिंदूंचा देश असलेल्या भारताने बांगलादेशातील हिंदूंच्या संरक्षणाची जबाबदारी घेतलीच पाहिजे. हिंदू बांधवांचा छळ होत असताना शरद पवारादी मंडळी कुठे वाळूत चोच खुपसून बसली आहेत, कळायला मार्ग नाही असे नाही. त्यांना हिंदूपेक्षा मुस्लिमांचीच चिंता जास्त आहे, हे त्यांच्या राजकारणावरून आधीच स्पष्ट झाले आहे. ज्या पद्धतीने बांगलादेशातील कट्टरपंथीयांनी अल्पसंख्यक हिंदूंना लक्ष्य केले आहे, ते पाहता हिंदू तिथे सुरक्षित राहतील, याची शक्यता आज तरी दिसत नाही. भारत सरकारने याबाबत चिंता व्यक्त केली असली, तरी नुसती चिंता व्यक्त करून काही उपयोग होणार नाही. बांगलादेशातील हिंसाचाराकडे केवळ त्यांचा अंतर्गत मामला आहे असे म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. बहुसंख्य हिंदू असलेला देश ही भारताची ओळख आहे. ती जपून ठेवतानाच शेजारच्या देशांमधील हिंदूंचे मनोधैर्य खच्ची होणार नाही, याची काळजी आपण घेतली पाहिजे. जगभरातल्या हिंदूंसाठी भारत हे आशास्थान आहे. त्यांची आशा मावळणार नाही, अशी ठोस कृती करणे ही काळाची गरज आहे. बांगलादेशात हिंदू बांधवांवर अमानुष अत्याचार होत असताना आपल्या देशातले मानवाधिकारवालेही कुठे दडून बसले आहेत, हे कळायला मार्ग नाही. बांगलादेशात निष्पाप हिंदूंवर अत्याचार होत असताना तमाम मानवाधिकारवाले का आवाज उठवत नाहीत, या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळणार नाही. कारण, ही सगळी मंडळी स्वार्थी आहेत. यांना मानवाधिकाराशी काहीही देणेघेणे नाही. त्यांना त्यांचा स्वार्थ साध्य करायचा आहे. कोण मरतोय, कोण जगतोय याच्याशी त्यांना देणेघेणे असते, तर ते मूग गिळून गप्प बसलेच नसते. आपल्या मणिपूरमध्ये हिंसक घटना कुणी घडवून आणल्या हे संपूर्ण जगाला माहिती आहे. असे असतानाही भारताला शहाणपणा शिकवण्यात अनेक देश आघाडीवर होते. आज मात्र ते सोयीस्कर भूमिका घेत मूकदर्शक बनले आहेत. त्यामुळे भारतातील हिंदूंनीच आता पुढाकार घेत प्रश्न सोडविला पाहिजे.

९८८११५२४३९

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# 'मै समंदर हूं, वापस आऊंगा'

विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून पाच दिवस झाले. महायुतीला छप्परफाड बहुमत मिळाले आहे. तरीही नवे सरकार नाही, नव्या मुख्यमंत्र्याचा पत्ता नाही. त्यामुळे नेमके सुरू आहे तरी काय, असा प्रश्न जनतेला पडणे स्वाभाविक आहे. पण हे नवे नाही. कुठल्याही नव्या सरकारचे बाळंतपण हे असेच होते. कुठलेही सरकार घाईगर्दीने बनत नाही. कारण सरकार नुसते बनवून भागत नाही, ते चालवावे लागते. 'महायुतीचा मुख्यमंत्री, तिन्ही नेते एकत्र बसून ठरवतील' असे महायुतीतल्या तिन्ही पक्षांचे प्रवक्ते सांगत असतानाही विरोधकांनी वावड्या उडवणे सुरू केले होते. आतापर्यंत शिंदेंना 'मिंधे', 'गद्दार', 'खोके सरकार' म्हणणाऱ्या ठाकरे सेनेला शिंदेंच्या मानसन्मानाची 'चिंता' भेडसावत असल्याचे दिसत होते. 'शिंदे भूकंप करणार, बाहेरून पाठिंबा देणार' असल्या पुड्या सुटू लागल्या. अखेर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच त्यांची हवा काढली. मुख्यमंत्री पदावरचा दावा सोडला. मोठा बाका प्रसंग होता. कुर्बानी कोण देणार? अडीच वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी त्याग केला. मुख्यमंत्री पदावर नैसर्गिक दावा असताना उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. आता पाळी शिंदे यांची होती. पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे जसे वागले तसे शिंदे यांनाही वागता आले असते. शरद पवार यावेळीही एका 'उद्धव ठाकरेंच्या' शोधात होतेच. अर्थात आकडे भाजपाच्या बाजूने होते. पण तोडफोड करून पवारांनी जुगाड जमवले असते. मात्र, एकनाथ शिंदे हे मोदी-शाह यांच्या बाजूने उभे राहिले. प्रगल्भ राजकारणी अशा प्रसंगात कसा वागतो त्याचा परिचय शिंदेंनी दिला. राजकारणात टिकायचे असेल तर कुठल्या एका जागी टिकावे लागते. शरद पवार, उद्धव ठाकरे यांना जमले नाही. 'जिधर बम उधर हम' असे राजकारण कराल तर जनता एक दिवस तुम्हाला तुमची जागा दाखवते. शिंदेंना मानले पाहिजे. त्यांनी चार दिवस उशिराने का होईना मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचा मार्ग मोकळा करून दिला. तुम्ही लिहून ठेवा. दोन दिवसांनी एकनाथ शिंदे हे देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुचवतील.

तब्बल पाच वर्षांनंतर फडणवीसांना अच्छे दिन येऊ घातले आहेत. या काळात काय काय सोसले नाही या चाणक्याने? झाडून साऱ्या विरोधकांचे टार्गेट देवेंद्र फडणवीस होते. मुख्यमंत्री होते शिंदे. मात्र निशाण्यावर फडणवीस होते. संजय राऊत यांचा रोजचा भोंगा तर होताच. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनीही फडणवीसांना सोडले नाही. अतिशय खालच्या पातळीवरून फडणवीसांवर हल्लाबोल झाला. उद्धव ठाकरे यांनी 'एक तर तू राहशील, नाहीतर मी राहीन' अशा शब्दात फडणवीसांना ललकारले होते. फडणवीसांनी आपल्याला 'रिकामे' केले हा त्यांचा राग होता. २०१९ च्या निवडणुकीत भाजपा-शिवसेना यांची युती होती. लोकांनी या युतीच्या बाजूने कौल दिला होता. पण मुख्यमंत्री होण्याच्या महत्त्वाकांक्षेतून उद्धव ठाकरे यांनी धोका दिला. शरद पवारांकडे गेले. पवार अशा बकऱ्याच्या शोधात होतेच. त्यांनी या ठाकरेंची दुखरी नस हेरली. महाविकास आघाडी नावाने पवारांनी दुकान फिट केले.



भानगडीचे हे सरकार फार टिकणार नव्हतेच. अडीच वर्षांत कोसळले. पुढे साऱ्यांच्या मार्गात फडणवीस हा अडथळा होता. फडणवीसांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होऊ द्यायचे नव्हते म्हणून शरद पवारांनी उद्धव ठाकरेंना फोडले. मात्र उद्धव ठाकरे नाकर्ते निघाले. त्यांचेच आमदार त्यांच्या विरोधात गेले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ४० आमदारांनी बंड केले. त्यात ठाकरे यांना घरी बसावे लागले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्याने ठाकरे सुडाने पेटून उठले. त्या द्वेषाग्नीत ठाकरे वाहवत गेले. हिंदुत्व सोडले. मुस्लिमांचे लांगूलचालन सुरू झाले. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने दलित आणि मुस्लिम मतांची मोट बांधली. विषारी प्रचार केला. घटना बदलण्यासाठी मोदींना ४०० जागा हव्या आहेत, असा प्रचार झाला. त्याचा भाजपाला तडाखा बसला. त्या निकालाचा चुकीचा अर्थ विरोधी नेत्यांनी घेतला. आता आपलीच हवा हवेत विरोधी नेते तरंगू लागले. 'हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही' असे सांगत शरद पवार फिरू लागले. लोकसभा निवडणुकीत महाआघाडी आणि महायुती यांना मिळालेल्या मतांमधला फरक फार नव्हता. महायुतीला एक टक्कापेक्षाही कमी मतं होती. तीन टक्केही मतदान वाढवले तर आपण बाजी पालटवू शकतो हे फडणवीसांच्या लक्षात आले. त्यांनी तसा फॉर्म्युला दिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मदतीला धावला. सोबतीला महायुतीची 'लाडकी बहीण' योजना कामी आली आणि बघता बघता चमत्कार झाला. भाजपाने कधी नव्हे एवढ्या जागा जिंकल्या. विरोधकांनाही हे करता आले असते; पण गाफील राहिले. जागावाटपात भांडत बसले. सहा महिन्यात लोकांच्या विचारात काय फरक पडणार? लोकांना आपल्यालाच मतं द्यायची आहेत, अशा गुर्मीत विरोधक होते. उद्धव तर सारखे म्हणायचे, 'माझा बाप चोरला, पक्ष चोरला, चिन्ह चोरले.' आता माझे मतदारही चोरले असे म्हणण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे. युतीत २५ वर्षे आपण सडलो असे उद्धव म्हणाले होते. आता काँग्रेससोबत पाच वर्षांतच त्यांचे शेणखत झाले; पण बोलायची सोय नाही. फडणवीसांना गंभीरपणे घेतले नाही तर काय होते त्याचा हा नमुना आहे. 'तुतारी' वाजली नाही, 'मशाल' पेटलीच नाही. फाजील आत्मविश्वास विरोधकांना नडला. कुणी भावाला तर कुणी पत्नीला तिकिटा वाटल्या. संपूर्ण राज्याचे नेतृत्व करील, पक्षाला सोबत घेऊन चालेल असा नेताच आज विरोधकांकडे उरला नाही. जे आहेत ते त्यांच्या मतदारसंघापुरते आहे. 'मी आणि माझे कुटुंब' म्हणून पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, नाना पटोले पडता पडता वाचले. प्रदेश अध्यक्षाला जिंकण्यासाठी टपाली मतांचा आधार घ्यावा लागतो यावरून काँग्रेसची स्थिती किती केविलवाणी झाली आहे, ते लक्षात येईल. पोपट केव्हाच मेला आहे; पण हे राहुलबाबाला कोण सांगणार? राहुल गांधी यांच्या नेतृत्वात गेल्या तीन निवडणुका काँग्रेस हरली. तरीही राहुल गांधींच्या नावाची पालखी काँग्रेसवाल्यांना उचलावी लागते. १० वर्षांपूर्वी काँग्रेसने सपाटून मार खाल्ला तेव्हा आत्मपरीक्षणासाठी ज्येष्ठ नेते ए. के. अँथनी यांच्या नेतृत्वात काँग्रेसने समिती नेमली होती. त्यांनी दिलेला अहवाल अजूनही बाहेर येऊ दिला गेला नाही. काँग्रेसला अच्छे दिन येणार कसे? आता तर विधानसभेत विरोधी नेता म्हणून बसण्याएवढीही ताकद विरोधकांकडे नाही. राज्यसभेत पाठवण्याएवढेही आमदार मिळणे अवघड आहे. शरद पवारांची राज्यसभेची दीड वर्षे उरली आहेत. त्यानंतर त्यांना सक्तीची निवृत्ती आहे. सावकाश पुढे सकाळचा 'भोंगा'ही बंद पडेल.

पाच वर्षांपूर्वी एका सभेत फडणवीसांनी एक शेर म्हटला होता- 'मेरा पानी उतरते देख, मेरे किनारे पर घर मत बसा लेना, मै समंदर हू, लौटकर वापस आऊंगा.' फडणवीसांनी म्हटलेल्या 'मी पुन्हा येईन' या इशाऱ्याची विरोधक चेष्टा करीत राहिले. सुप्रिया सुळे तर म्हणाल्या होत्या, 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' एकटा देवेंद्र काय करू शकत नाही ते आज महाराष्ट्र पाहात आहे. विरोधकांनी जबरदस्त फिल्डिंग लावली, जाती-पातीचा आधार घेतला तरीही या आधुनिक अभिमन्यूने चक्रव्यूह भेदला. गेल्या तीन विधानसभा निवडणुका फडणवीस यांच्या नेतृत्वात झाल्या. तिन्ही निवडणुकीत भाजपाने शंभरावर जागा जिंकल्या. राजकारण बेभरवशाचे झाले आहे. शर्ट बदलावा तसे लोक पक्ष बदलताहेत. गेल्या पाच वर्षांत खूप उलथापालथ झाली. मात्र फडणवीसांचा एकही आमदार फुटला नाही. हल्ली दुर्मिळ झालेली एखाद्या नेत्याबद्दलची ही बांधिलकी, हा विश्वास फडणवीस यांच्या रूपात सहकाऱ्यांना दिसतो. त्यातूनच फडणवीसांचा 'देवाभाऊ' झाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर त्यांना 'परम मित्र' संबोधले आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### दणदणीत म्हणतात ते हेच!

निवडणूक एकदाची पार पडली आणि वाट होती शनिवारची. धाकधूक सगळीकडेच होती. कारण इतक्यात राजकीय एक्झिट पोलची सर्वत्र पोलच खुलली होती. त्यामुळे महायुती जरी आघाडीवर होती, तरी यांचा हरयाणा तर होणार नाही ना, ही एक शंका होती. मात्र यंदा असा एक्झिट पोल कुणीच मनावर घेतला नव्हता. एकदाचा शनिवार आला. एक एक तास समोर जात होता. बघता बघता महायुती म्हणजेच भाजपा व मित्रपक्ष १००-२०० आणि त्याच्यावर जाऊन स्थिरावले. इकडे महाविकास आघाडीचा विकासच थांबून गेला. मोठ्या मुश्किलीने ते चाळिशी पार करते झाले. खुद्द नाना पटोलेंचा विजय अवघ्या २०० मतांवर येऊन पोहोचला. असे कितीतरी बघितले तर जनतेने तर त्यांना चपराक दिली म्हणायची. मनोज जरांगेला हाताशी धरून मराठा मतांची बोळवण करणारे पवार साहेब यावेळी कोणाचेच राहिले नाहीत. मतांचा पाऊस दिसलाच नाही. तिकडे शिवाजी महाराजांना आपलीच जागीर समजणारे उद्धवराव हे निवडणुकीपूर्वी खूप बोलले; अगदी राऊत यांच्यापेक्षाही जास्त. पण अवघ्या २० जागांवर लाज राखली म्हणायची साहेबांची. पुत्र हो-नाही म्हणता म्हणता जिंकून आला; तेवढीच काय जमेची ती बाजू. बाकी आता बाळाशी खेळायला भरपूर वेळ मिळेल. राज ठाकरे म्हणजे 'गरजनेवाले बरसते नहीं' असेच आहे. कोणतीही राजकीय मनीषा नाही, कोणतीही खेळी नाही. फक्त ठाकरे आहेत एवढेच. या निवडणुकीत २०० च्या वर सर्व जातीच्या घटकांनी एक होऊन मनसोक्त मतदान केले, यातूनच एकीचे बळ काय असते दिसून आले. भरमसाट, भरघोस या सोबतच दणदणीत हा शब्दही आता महायुतीजवळ आला, ही आनंदाची गोष्ट.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### सिव्हिक सेन्स शून्याकडे जातो आहे का?

सर्रास सिग्नल मोडणे, रस्त्यावर खर्रा-गुटखा- तंबाखू-मावा आदींच्या पिचकाऱ्या अगदी घरचे बेसिन आहे अशाप्रकारे मारणे, तीर्थरूपांना रस्त्याची जहागीरदारी मिळाली आहे, या आवेशात गाडी रॉंग साईडने चालवणे, हे सगळं करताना कोणालाही न जुमानता मुजोरी करणे, पब्लिक प्लेस कुठलीही असू देत, ट्रेन, बस, मेट्रो आणि अगदी चांगले रेस्टॉरेंटसुद्धा- आदी जागी मोबाईलवर मोठमोठ्याने रील आणि व्हिडीओ बघणे, आपल्या आजूबाजूला कोण आहे याची दखल न घेता शिवीगाळ करत बोलणे, रस्त्यावर कुठेही कचरा टाकणे या सगळ्या गोष्टी नागपुरात अगदी जोरावर सुरू आहेत. खंत म्हणजे याला कोणीही अपवाद नाही. रस्त्यावर थुंकणारा माणूस अगदी मर्सिडिससारखी महागडी गाडी चालवणारादेखील आढळून येतो. रॉंग साईडने गाडी चालवणारे ऑटोवाले जास्त असले, तरी सुशिक्षित लोकसुद्धा हा प्रकार करताना आढळून येतात. लहान पोरांना घेऊन जाणारे स्त्री-पुरुष जेव्हा रॉंग साईडने गाडी चालवतात तेव्हा जिवाचा थरकाप तर उडतोच; पण आपण अप्रत्यक्षरीत्या हीच शिकवण त्या शिशूला देतो आहे, ही जाणीवसुद्धा उरली नाही आहे. देश प्रगत होण्यासाठी पाया असतो तो सिव्हिक सेन्स म्हणजे नागरी भावना. घडणाऱ्या या सगळ्या गोष्टी मात्र ती भावना हरवतेय असं दर्शवतात आणि जर नागरी भावना रसातळाला जात असेल तर प्रगती खुंटेल. निदान हे ध्यानात घेऊन साधी शिस्त तरी लोकांनी पाळावी, अशी माफक अपेक्षा आहे.



**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

### हिंदू एकतेचा विजय

'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक है तो सेफ है' या घोषणांचा परिणाम म्हणजे जनतेने जागृत होऊन केलेले मतदान आणि मतदानात वाढलेली टक्केवारी! त्याचाच परिणाम म्हणजे आज राज्यात हिंदुत्वनिष्ठ सरकार स्थापन होत आहे. केवळ निवडणुकीतील स्टंट म्हणून या घोषणांकडे बघता येणार नाही, तर त्यामुळे जिहादरूपी भयानकतेची जाणीव जनतेमध्ये निर्माण झाली आहे. आज राज्यात वक्फ बोर्ड, लव्ह जिहाद, भूमी जिहाद यांचे संकट आहे. या विरोधात हिंदुत्वनिष्ठ संघटना, आध्यात्मिक संस्था आणि सामाजिक संस्थांनी केलेल्या जागृतीचा परिणाम म्हणजे निवडणुकीत मिळालेला निकाल! हा विजय म्हणजे हिंदूंच्या एकतेचा विजय असे निश्चितच म्हणता येईल. आता येणाऱ्या सरकारकडून जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मंदिरे सरकारीकरणातून मुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत, लव्ह जिहादविरोधात लवकरात लवकर कायदा बनवावा तसेच धर्मांध प्रवृत्तींना आळा घालावा, अशा अपेक्षा जनतेने व्यक्त केल्या आहेत. निवडणुकीदरम्यान दिलेली 'एक है तो सेफ है' ही घोषणा प्रत्यक्षात सुरक्षित वातावरण निर्माण करून सार्थक करावी.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# २३८ कोटींचा जिल्हा बँक घोटाळा प्रकरण; मोहिते, सोपल यांच्यावर ठपका

## सोलापूरमधील प्रकरण, कर्जवसुलीची शिफारस

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

२३८ कोटी रुपयांच्या सोलापूर जिल्हा सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी मंत्री दिलीप सोपल यांच्यासह ३२ संचालक, दोन अधिकारी आणि लेखा परीक्षक यांच्यावर तोष्णीवाल अहवालात ठपका ठेवण्यात आला आहे. घोटाळ्यामुळे बँकेला झालेले २३८.४३ कोटी रुपयांचे नुकसान वसूल करण्यात यावे, अशी शिफारस निवृत्त अतिरिक्त सहकार संस्था निबंधक डॉ.किशोर तोष्णीवाल यांनी केली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ८ नोव्हेंबर रोजी तोष्णीवाल यांनी सहकार विभागाला सादर केला आहे. विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकडे ३०.५ कोटी रुपयांचे तर सोपल यांच्यावर ३०.२७ कोटींचे कर्ज थकीत आहे. मोहिते, सोपल यांच्याव्यतिरिक्त अहवालात बबनराव शिंदे, संजय शिंदे, रणजितसिंह मोहिते, दिवंगत प्रतापसिंह मोहिते, दिलीप माने यांच्यावरही अहवालात ठपका ठेवण्यात आला आहे. घोटाळ्यात अनेक दिग्गजांचा सहभाग असल्याने त्याच्या चौकशीची काम माझ्याकडे सोपवण्यात आले होते. ८ नोव्हेंबर रोजी चौकशी अहवाल मी सादर केला आहे, असे तोष्णीवाल यांनी सांगितले आहे.

## जगदीश आढिया यांचे निधन

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**



जाम मिलचे माजी सरव्यवस्थापक व संचालक जगदीश मुळजीभाई आढिया यांचे अल्पशा आजाराने गुरुवार दि. २८ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३५च्या सुमास उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी असा परिवार आहे. जाम मिलमध्ये त्यांनी सुमारे चार दशकाहूनही अधिक काम केले. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता अंकित अपार्टमेंट, दमाणी नगर स्टार बाजार समोरील त्यांच्या राहत्या घरापासून मोदी स्मशानभूमी येथे जाणार आहे.


## नावात बदल

माझे जुने नाव - **मोहम्मद उमेर अब्दुल गफूर बागबान (Umer)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **मोहम्मद उमर अब्दुल गफूर बागवान (Umar)** (पत्ता - ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.

**ऑफि. नं. ५५३४२/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

## नावात बदल

माझे जुने नाव - **बीबी फातिमा मोहम्मद उमेर बागवान (Umer)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **बीबी फातिमा मोहम्मद उमर बागवान (Umar)** (पत्ता - ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.

**ऑफि. नं. ५५३४०/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

## नावात बदल

माझे जुने नाव - **अबु सुफियान मोहम्मद उमेर बागवान (Umer)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **अबु सुफियान म. उमर बागवान (Umar)** (पत्ता- ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.

**ऑफि. नं. ५५३४१/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

## नावात बदल

माझे जुने नाव - **फैझान मोहम्मद उमेर बागवान (Umer)** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **फैझान म. उमर बागवान (Umar)** (पत्ता - ८९/९० तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.

**ऑफि. नं. ५५३४३/२०२४**
**दि. २५/११/२०२४**

## जाहीर नोटीस

### में. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३५१/२०२४

**१. सुखदेव येडू मस्के** — **अर्जदार**
रा कव्हे ता. बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील सुनिल सु कुलकर्णी)
**विरुध्द**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथाग्रामसेवक, ग्रा. पं. कव्हे** — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी भारती सुखदेव मस्के, रा. कव्हे ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे कव्हे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनाक २१ डिसेबर १९८८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी भारती सुखदेव मस्के यांचा दिनांक २१ डिसेबर १९८८ रोजी मौजे कव्हे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत किंवा वकिलामार्फत में न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**बार्शी**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी व ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पेकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील सि.स. नं. २५१०/क याचे एकूण क्षेत्र ९२.८० चौमी यापैकी पश्चिम बाजूची मिळकत याचे क्षेत्रफळ २५.४९ चौमी आहे, याचे चौफुट २७४.२७ आहे त्यामधील उपलब्ध बांधकामासह, यासी चतुः सिमा पुर्वेस :- सुपेकर व त्यानंतर मुंढे यांची याच सि.स मधील मिळकत, दक्षिणेसः सि.स.नं. २५६३ ची मिळकत, पश्चिमेस : न.पल.ची खुली जागा, उत्तरेसः रस्ता., याचे पाणी व वागणुक उत्तर बाजुचे रस्त्याने जाते व आहे असा मिळकत

सदर मिळकत हा सौ. दुर्गाबाई माणिक पवार वगैरे ५ यांचे मालकीचा त्यांना वारस हक्काने मिळालेला असून प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे व सदर मिळकतीच्या हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरचा मिळकत ते विक्री करू इच्छितात, मिळकत विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने सौ. दुर्गाबाई माणिक पवार वगैरे ५ यांनी सदरचा मिळकत विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशीला बरोबर ठरविला आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. २८/११/२०२४.

शिक्का

**सही**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**पत्ताः ३९४५, भवानी पेठ, सोलापूर रोड,**
**रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**(अशिला तर्फे ॲडव्होकेट)**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३१६/२०२४

**१. जयश्री नामदेव देशमुख** — **अर्जदार**
रा. धनेश्वरी बोरगाव ता. कळब आः मु बार्शी
(अशीला, तर्फ वकील एस एस कुलकर्णी)
**विरुध्द**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बागी** — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की स्वतः अर्जदार, रा. धनेश्वरी बोरगाव ता. कळब आ. मु. बार्शी याचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २५ सप्टेंबर १९६७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९८९ (सुधारीत २०२३ काल १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २५ सप्टेंबर १९६७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी. जि. सोलापूर येथील राहित्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा अशिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दाधिकारी**
**बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३५७/२०२४

**१. शुभम भागवत बोराडे** — **अर्जदार**
रा. गाडेगाव ह. मु नाईकवाडी प्लॉट बार्शी
ता बार्शी जि सोलापूर
(अशील, तर्फे वकील गणेश किसन हांडे)
**विरुध्द**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथामुख्याधिकारी न.प. बार्शी** — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची आजी गयाबाई अर्जुन बोराडे, रा. गाडेगाव ह. मु नाईकवाडी प्लॉट बार्शी ता बार्शी जि सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २८ मार्च २०२१ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आज्जी गयाबाई अर्जुन बोराडे यांचा दिनांक २८ मार्च २०२१ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणा-या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी साझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**कार्यकारी खंडाधिकारी**
**बार्शी**

## मैंदर्गी नगरपरिषद, मैंदर्गी

### जाहीर निविदा सूचना

**जा.क्र एम/कावि/२/१३३१/२४** — **दि.२८/११/२०२४**

मैंदर्गी नगरपरिषदेकडून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता खालील कामे करावयाचे आहेत.

| अ. क्र. | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | शंभुस्थानी माता मंदिर समोर पेवर ब्लॉक बसविणे | ९,९८,४९४ | १०,००० | १,५०० |
| २ | दलित वस्तीमधील स्मशानभुमीत पेवर ब्लॉक बसविणे | ९,९८,६०१ | १०,००० | १,५०० |
| ३ | दलित वस्तीमधील स्मशानभुमीमध्ये मुरूम भरीव करणे | ९,५६,२०८ | १०,००० | १,५०० |
| ४ | दलितवस्ती स्मशानभुमीमध्ये स्टोअर रुम बांधणे | ९,९९,८५२ | १०,००० | १,५०० |
| ५ | दलित वस्तीमधील शंभुस्थानी माता मंदिर आणि दलित वस्ती स्मशानभुमी समोरील बाजूस कंपांड बांधणे | २,८१,६८४ | २,८०० | १,००० |

सदरील कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत व अर्हताप्राप्त अनुभवी ठेकेदारांकडून निविदा सुचनेत नमुद अटी व शर्तीस अधीर राहून दि. २९/११/२०२४ ते ०५/१२/२०२४ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत द्विलिफाफा पध्दतीनुसार निविदा मागवित आहे. कामाची निविदा फार्म, अटी, शर्ती व अधिक माहिती मैंदर्गी नगपररिषद कार्यालय बांधकाम विभाग येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

शिक्का

**सही/-**
**(अर्जुन सुरवसे)**
**मुख्याधिकारी**

## जाहीर प्रगटन

सोलापूर जिल्हयातील तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, मा. संचालक मंडळ सभा दिनांक २५/११/२०२४ ठराव क्र. २ ने संस्थेच्या नोटीस बोर्डावर ढकविण्यात आलेले. त्याची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आय रजि. पान नंबर | मयत सभासदाची नावे | शेअर्स रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ०२ | रेवणसिध्द ना. काटकर | ५००.०० |
| २ | ०३ | एन. डी. कारभासे | १,०००.०० |
| ३ | ०७ | नारायणदास व्हि. भूतडा | १,०००.०० |
| ४ | ११ | गुरुसिध्दप्पा म. लोणी | १,०००.०० |
| ५ | १२ | एस. एस. दहिहंडे | ५००.०० |
| ६ | १३ | डी. एस. दहिहंडे | ५००.०० |
| ७ | १४ | श्रीनिवासाचार्य ह. उडपी | ५००.०० |
| ८ | १५ | रामकृष्ण ना. राळेरासकर | ५००.०० |
| ९ | २० | बाबुराव रा. मिरजगावकर | ५००.०० |
| १० | २१ | दिगंबर मु कांबळे | ५००.०० |
| ११ | ३१ | जी. आर. कारंडे | ५००.०० |
| १२ | ३४ | अनिलकुमार कु. गांधी | ५००.०० |
| १३ | ३५ | विमलचंद मा गांधी | ५००.०० |
| १४ | ३९ | विठ्ठल द. नागवंशी | ५००.०० |
| १५ | ४८ | एस.एस. साळुंके | ५००.०० |
| १६ | ४९ | गोविंद स. शेटे | १,०००.०० |
| १७ | ५२ | शंकर मो बाकळे | ५००.०० |
| १८ | ८३ | नारायण रा. जाधव | ५००.०० |
| १९ | ९१ | पारसमल न. जोशी | ५००.०० |
| २० | ९२ | गजानन खडकीकर | ५००.०० |
| २१ | १०२ | उमाकांत श. भागवत | ५००.०० |
| २२ | १०३ | शशिकांत श. भागवत | ५००.०० |
| २३ | १०९ | श्रीनिवास ब. सोनी | ५००.०० |
| २४ | ११० | नरसिंगदास ब. सोनी | ५००.०० |
| २५ | १२३ | शंकर सि. बुधडकर | ५००.०० |
| २६ | १२६ | रामचंद्र रा. कोठाडिया | ५००.०० |
| २७ | १२७ | जीवराज रा. कोठाडिया | ५००.०० |
| २८ | १११ | रघुवीर ब. सोनी | ५००.०० |
| २९ | १०४ | अनिलकुमार श. भागवत | ५००.०० |
| ३० | १२९ | इब्राहिम अ. हमदुले | ५००.०० |
| ३१ | १३० | मोगलप्पा ब.पोगूल | ५००.०० |
| ३२ | १३४ | सुधाकर म. चौधरी | ५००.०० |
| ३३ | १३८ | एस. एस. बदामीकर | ५००.०० |
| ३४ | १३९ | आर.एस. पंचे | ५००.०० |
| ३५ | १५२ | पार्वतीबाई श्री. किण्णगी | ५००.०० |
| ३६ | १६२ | बालराजू वि. कटकूर | ५००.०० |
| ३७ | १७२ | म. रशीदखान का. पठाण | ५००.०० |
| ३८ | १७९ | व्यंकटय्या व्य. कुडक्याल | ५००.०० |
| ३९ | १८१ | सिताबाई पा. धजाळ | ५००.०० |
| ४० | १८२ | महादेव सि. तमशेट्टी | ५००.०० |
| ४१ | २०४ | किसनलाल रा. दरगड | ५००.०० |
| ४२ | २०५ | राधाकिसन रा. दरगड | ५००.०० |
| ४३ | २११ | बशीर ए. मुगद | ५००.०० |
| ४४ | २१४ | नामदेवराव जगताप | ५००.०० |
| ४५ | २१८ | प्रभाकर गो. कुसुरकर | ५००.०० |
| ४६ | २२५ | मोहनलाल गो. दोशी | ५००.०० |
| ४७ | २५३ | माधव रा. शिंगण | ५००.०० |
| ४८ | २७७ | चंद्रशेखर ब. नडगिरी | ५००.०० |
| ४९ | २८९ | शंकरराव भि. हमदुले | ५००.०० |
| ५० | २९५ | प्रभात गो. दोशी | ५००.०० |
| ५१ | ३१५ | जगन्नाथ बा. सोनी | ५००.०० |
| ५२ | ३२८ | जमुनाबाई ज. सोनी | ५००.०० |
| ५३ | ३४० | शिवलिंगप्पा नडगिरे | ५००.०० |
| **एकूणः-** | | | **२८,५००.००** |

वरील तपशिलात नमूद केलेले सभासद यांचा त्यांनी दिलेल्या संस्थेच्या अभिलेखाप्रमाणे उपलब्ध पता अपुर्ण आहे. प्रदीर्घ कालावर्षीपासून त्यांचा संस्थेत संपर्क नाही. संस्थेच्या वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस वर्तमान पत्रात देऊन ही वरील सभासद सस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहात नाहीत. वरील सभासदापैकी काही सभासद मयत असल्याचे कळाले.

त्यामुळे मा. संचालक मंडळ सभा दिनांक २५/११/२०२४ ने संस्थेच्या नोटीस बोर्डावर व सदर जाहीर प्रगटन मध्ये प्रसिध्द केलेल्या मयत सभासदांचे शेअर्सची रक्कम शेअर्स अनामत खात्यातून राखीव निधिकडे वर्ग करण्यात यावे. असा ठराव संम्मत झाला आहे.

तथापी याबाबत वरील सभासदापैकी काही सभासदांचे वारस अथवा प्रत्यक्ष सभासदांनी त्यांच्याकडे उपलब्ध कागदपत्रान्वये सदर जाहीर प्रगटन झालेपासून १५ दिवसाचे आत संस्थेच्या व्यवस्थाकांशी संपर्क साधावे.

त्यानंतर आलेल्या तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही व सदरचे शेअर्स राखीव निधीकडे वर्ग करण्यात येईल याची नोदं घ्यावी.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २८/११/२०२४**

**सही/-**
**बाळकृष्ण गा. राजागिरी**
**व्यवस्थापक**
**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**

## Re-Tender Notice (2nd call)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E-Tender Notice Digitally signed online bids are invited for following tender through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **E-Tender No. EE/EHV/PD-III/SLP/T-3/2024-25** (RFX No - 7000034302)

**Particulars:** Re-Tender for the work of providing 3ph auxiliary supply at 132 kV Kurduwadi TSS.

**Estimated Cost:** Rs. 16,95,722/-; E.M.D. (1% of est. cost); Tender cost in Rs. 500.00+ 5%; **Sale period: 29/11/2024 to 09/12/2024** upto 23:59 Hrs;

**Date of opening (Tech. bid):** 10/12/2024 at 11:00Hrs.

**Contact person:** Addl. Ex. Engg. (Mo. 9421176848).

**Pre-bid meeting :** 04/12/2024 at EHV Projects Division-III, Solapur.

For further details please visit to https://srmetender.mahatransco.in/

Note: All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer, EHV Projects, Div-III, Solapur**


## चाटला चौकात तरुणाचा फिनेल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

शहरातील चाटला चौकात दारूच्या नशेत तरूणाने अज्ञात कारणावरून फिनेल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.विकि मनोहर दौलताबाद (वय ३२, रा. २५६ गाळा, रविवार पेठ, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरूणाचे नाव आहे. २८ नोव्हेंबर दुपारी दीडच्या सुमारास विकि दौलताबाद याने चाटला चौकात अज्ञात कारणावरून दारूच्या नशेत फिनाईल प्राशन केले. यावेळी विकिला त्रास होऊ लागल्यावर त्यास बहिण विद्या बंदपट्टे हिने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


## सूचना

# महाराष्ट्र शासन

### नगर विकास विभाग

### मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

### दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६**
**क्र.टिपीएस-१२२४/४९०/प्र.क्र.१२९/२४/कलम ३७ (१कक) /नवि-१२:-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (युडीसीपीआर) (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त नियमावली असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिनियम' असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/ वियो. व प्रायो. कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नवि-१३. दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून ती दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीमध्ये विनियम क्र.७.६ हा जुन्या धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकास (Redevelopment of Old Dilapidated / Dangerous Buildings) यांचेशी संबंधित आहे. उक्त नियमावलीमध्ये सुधारणा करणेबाबत द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स व आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी अनुक्रमे शासनास दि. २४/७/२०२३ व दिनांक ७/३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त विनंती विचारात घेतल्यानंतर उक्त नियमावलीमध्ये मध्ये सोबतच्या परिशिष्टा मध्ये नमूद केल्यानुसार सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त प्रस्तावित फेरबदल' असा करण्यात आलेला आहे)

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त प्रस्तावित फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम १६२ (१) नुसार प्राधिकृत करण्यात येत आहे.

०२. ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील. विभाग

१) विभागीय सहसंचालक,नगर रचना,कोकण/पुणे /नाशिक / नागपूर/अमरावती औरंगाबाद विभाग
२) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका.
३) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५) सर्व विशेष नियोजनप्राधिकरणे/नवनगर विकास प्राधिकरणे.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
७) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

०३. सदरची सूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर (कायदे/नियम) प्रसिध्द करण्यात आली आहे.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे व नावाने

### परिशिष्ट

**शासन सूचना क्रमांक टिपीएस-१२२४/४९०/प्र.क्र.१२९/२४/कलम ३७(१कक)/नवि-१२**
**दिनांक १५/१०/२०२४ सोबतचे सहपत्र**

| Regulation | Existing Provision | Proposed Modification |
|---|---|---|
| 7.6 | ---- | **Following new provision is proposed to be inserted as Clause 7.6.3:-** 7.6.3: Redevelopment of multi-dwelling buildings of society/ Co-Operative Housing Societies/ Apartments **having tenaments size less than or equal to 60 sq.mtr. built up area** i) FSI allowed for redevelopment shall be FSI of existing authorized building and incentive FSI to the extent of 50% of existing built up area or 15 Sq.m. per tenement, whichever is more. Provided further that if the existing authorized built up area and incentive thereon as stated above is less than maximum building potential mentioned in Regulation No.6.1 or 6.3, as the case may be, then society may avail premium FSI / TDR upto maximum building potential. Such incentive FSI shall not be applicable redevelopment of existing bunglow. for ii) Provided that in cases where carpet area occupied by residential tenement in the existing building is less than the carpet area of 27.87 sq.m. then such tenement shall be entitled for minimum carpet area of 27.87 sq.m. and difference of these areas shall be allowed as additional FSI without any premium. In case of non-residential occupier the area to be given in the reconstructed building shall be equivalent to the area occupied in the old building. iii) This regulation shall be applicable only when existing members of the societies are proposed to be re-accommodated. iv) If tenanted building/s and building/s of co-operative housing society/non-tenanted building/s coexist on the plot under development, then proportionate land component as per existing authorized built up area of existing tenanted building on the plot shall be developed as per Regulation No.7.6.2. and remainder notional plot shall be developed as per this regulation. v) Notes below Regulation No.7.6 shall be applicable to this regulation. |

शिक्का

**विमाका/पुणे/जाहि/२५६/२०२४-२५**

**सही/-**
**(निर्मलकुमार चौधरी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

## महत्त्वाचे

### भारताचे पुढील दशकात फिफा रँकिंगमध्ये अव्वल-५० चे लक्ष्य

**नवी दिल्ली** : पुढील दहा वर्षांत भारतीय फुटबॉल संघ फिफा क्रमवारीत अव्वल ५० च्या जवळपास पोहोचण्याचे



लक्ष्य ठेवले असून त्याकरिता एक विस्तृत योजना तयार करण्यात आली असून ती अंमलात आणायची आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया म्हणाले. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे (एआयएफएफ) अध्यक्ष कल्याण चौबे यांनी देशातील एआयएफएफ-फिफा अकादमींच्या विस्ताराबाबत चर्चा करण्यासाठी शुक्रवारी क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांची भेट घेतली. सध्या, अशी एक अकादमी ओडिशामध्ये कार्यरत आहे आणि विविध विभागामध्ये अतिरिक्त चार एआयएफएफ-फिफा अकादमी तयार करण्याची योजना आहे. जागतिक फुटबॉल विकासाचे फिफा प्रमुख आर्सेन वेंगर यांच्या भेटीनंतर भुवनेश्वर, ओडिशा येथे अकादमी सुरू करण्यात आली. सध्या या अकादमीत ३२ युवा खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत. फिफाचे टीडीएस प्रकल्प संचालक गेड रॉडी सध्या प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी भारत भेटीवर आहेत. बैठकीनंतर डॉ. मांडविया यांनी क्रीडा सरकारच्या वचनबद्धतेवर जोर देऊन या उपक्रमाला जोरदार पाठिंबा दर्शविला.

### फ्रान्सच्या पॅरा टेनिसच्या प्रमुखपदी यानिक नोह

**पॅरिस** : , १९८३ फ्रेंच ओपन विजेता यानिक नोह पुढील वर्षापासून सुरू होणाऱ्या



फ्रान्सच्या पॅरा टेनिसचे नवीन प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. नोह यांच्यावर व्हीलचेअर, दृष्टिहीन तसेच कर्णबधिर खेळाडूंच्या टेनिस क्रियाकलापांच्या समन्वयासाठी जबाबदार असेल, असे फ्रेंच टेनिस फेडरेशनने एका निवेदनात म्हटले आहे. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये फ्रान्सच्या पुरुष व्हीलचेअर टेनिस संघाचे नेतृत्व करताना नोहाला उन्हाळ्यात अपंगत्वाच्या टेनिसचा पहिला अनुभव आला. प्रशिक्षण आणि उच्च स्तरीय' रणनीती चालवून पॅरा टेनिस विभागाची रचना करणे आणि देशभरातील सर्व पॅरा टेनिस क्रियाकलापांच्या विकासास पाठिंबा देणे ही त्याची मुख्य भूमिका असेल, असे टेनिस महासंघाने सांगितले. नोह आपल्या मायदेशातील ग्रॅण्ड स्लॅम एकेरी विजेतेपद जिंकणारा फ्रान्सचा शेवटचा माणूस आहे आणि १९८६ मध्ये एटीपी क्रमवारीत त्याने कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट क्रमांक तिसरा गाठला होता. नंतर डेव्हिस चषक आणि बिली जीन किंग चषक जिंकणाऱ्या आपल्या देशाच्या टेनिस संघाचा कर्णधार होता. २००५ मध्ये त्याचा आंतरराष्ट्रीय हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला.

### दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी बाबरचे पाक संघात पुनरागमन

**कराची** : वरिष्ठ खेळाडू बाबर आझम, फखर जमान, शाहीन शाह आफ्रिदी व नसीम शाह दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी पाकिस्तानच्या एकदिवसीय क्रिकेट संघात पुनरागमन करण्याच्या तयारीत आहेत. पाकिस्तानी निवडकर्ते लवकरच दक्षिण आफ्रिकेतील तीन एकदिवसीय, तीन टी-२० आंतरराष्ट्रीय व दोन कसोटी सामन्यासाठी संघ जाहीर करतील अशी अपेक्षा आहे. तंदुरुस्तीची चाचणी अयशस्वी झाल्यामुळे व गुडघ्याच्या समस्येमुळे ऑस्ट्रेलिया व झिम्बाब्वेमधील पांढऱ्या चेंडूंच्या मालिकेसाठी वगळण्यात आलेल्या फखरने आपल्या तंदुरुस्तीवर काम केले आहे आणि दक्षिण आफ्रिकेतील पांढऱ्या चेंडूच्या सामन्यांसाठी त्याचा विचार केला जाईल, असे निवडकर्त्यांच्या जवळच्या सूत्राने सांगितले. निवडकर्त्यांनी पाकिस्तान क्रिकेट मंडळाला (पीसीबी) केवळ कसोटी मालिकेसाठी निवडलेल्या खेळाडूंच्या गटाला दक्षिण आफ्रिकेत प्रशिक्षण शिबिरासाठी पाठवण्याची सूचना केली आहे.

# इरा शर्माला नमवून सिंधू तिसऱ्या फेरीत

## सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन ● लक्ष्य सेनचा आरामात विजय

**◆ लखनौ, २८ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या सय्यद मोदी इंडिया आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन २०२४ स्पर्धेत महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात गुरुवारी पी. व्ही. सिंधूने आपल्याच देशबांधव इरा शर्माचा २१-१०, १२-२१, २१-१५ असा विजय मिळवला.




महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात भारताच्या इरा शर्माविरुद्ध खेळताना पी. व्ही. सिंधू

इरा वर्माने सिंधूला चांगला घाम गाळायला लावला. पहिला गेम गमावल्यानंतर इराने चिवट झुंज देत दुसरा गेम जिंकून सामन्यात बरोबरी मिळविली व सामन्याचा निकाल तिसऱ्या गेमवर ढकलला. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती सिंधू निर्णायक गेममध्येही १३-१० ने पिछाडीवर होती. त्यानंतर सिंधूने आपले अनुभव पणाला लावून जोरदार मुसंडी मारत सामन्याच्या कल आपल्या बाजूने वळवला.

लक्ष्य सेनने ३५ मिनिटांत इस्रायलच्या डॅनिल डुबोव्हेंकोचा २१-१५, २१-१३ असा पराभव करत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला.

तनिषा क्रास्टो आणि ध्रुव कपिला या मिश्र दुहेरीच्या जोडीने मोहित आणि लक्षिता जगलान यांचा २१-७, २१-१३ असा पराभव केला. महिला दुसऱ्या फेरीत अश्विनी पोनप्पासह क्रास्टो गुरुवारी दुसऱ्यांदा कोर्टवर परतणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय क्रिकेट संघांनी घेतली ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांची भेट



ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अ‍ॅन्थनी अल्बानीज यांच्यासोबत सामूहिक छायाचित्र काढताना भारतीय क्रिकेटपटू

**◆ कॅनबेरा, २८ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अ‍ॅन्थनी अल्बानीज यांनी गुरुवारी ३० नोव्हेंबरपासून येथे पीएम इलेव्हन विरुद्ध दोन दिवसांच्या गुलाबी चेंडूच्या सराव सामन्यापूर्वी पाहुण्या भारतीय क्रिकेट संघाचे स्वागत समारंभ आयोजित केला होता.

६ डिसेंबरपासून अ‍ॅडलेडमध्ये दिवस-रात्र गुलाबी चेंडूच्या कसोटी सामन्यासाठी चांगली तयारी म्हणून मनुका ओव्हलवर सराव सामना होणार आहे.

पर्थ येथे बॉर्डर-गावस्कर चषकाच्या पहिल्या सामन्यात भारताने यजमान ऑस्ट्रेलिया संघाला त्यांच्याच भूमीवर २९५ धावांनी नमवून सर्वात मोठा विजय नोंदवला.

शिष्टाचाराचे पालन करून, भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने आपल्या सर्व सहकाऱ्यांची पंतप्रधान अल्बानीज यांच्याशी ओळख करून दिली. त्यांनी जसप्रीत बुमराह व विराट कोहली यांच्यासह पहिल्या कसोटीतील विजयाच्या नायकांचे कौतुक केले व भारतीय खेळाडूंसोबत सेल्फीही काढले.

या आठवड्यात मनुका ओव्हल येथे पीएम एकादशचे अप्रतिम भारतीय संघासमोर मोठे आव्हान आहे, असे पंतप्रधान अ‍ॅन्थनी अल्बानीज यांनी ऑस्ट्रेलियन संसदेतील बैठकीनंतर द एक्सवर पोस्ट केले.

जॅक एडवर्ड्सच्या नेतृत्वाखालील पीएम इलेव्हननेही अल्बानीजला भेट दिली. क्रिकेट संबंध हा भारत-ऑस्ट्रेलिया संबंधांचा एक भाग आहे. अल्बानीज, त्यांचे भारतीय समकक्ष नरेंद्र मोदी यांच्यासमवेत, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान दौऱ्यावर असताना गत वर्षी अहमदाबाद येथे झालेल्या कसोटी दरम्यान दोन्ही संघांच्या खेळाडूंना भेटले होते. ◂(वृत्तसंस्था)

# आयसीसीच्या बैठकीत ‘हायब्रीड’ मॉडेलवर चर्चा होणार

## चॅम्पियन्स चषक क्रिकेट आयोजन

**◆ दुबई, २८ नोव्हेंबर**

चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेच्या आयोजनावर तोडगा काढण्यासाठी आयसीसीने आपल्या सर्वशक्तिमान मंडळाची शुक्रवारी बैठक बोलावली आहे. एकीकडे भारताने या स्पर्धेसाठी आपला संघ पाकिस्तानमध्ये न पाठवण्याचा निर्णय घेतला आहे, तर तिकडे पाकिस्तानने हायब्रीड मॉडेलचा विचार करण्यास नकार दिला आहे. या टप्प्यावर हायब्रीड मॉडेल हा सर्वोत्तम पर्याय आहे. सहभागी सर्व पक्ष या स्पर्धेच्या फायद्यासाठी योग्य निर्णय घेतील अशी आशा आहे व पाकिस्तानशिवाय ही स्पर्धा होणे चांगले नाही, असे जवळच्या एका सूत्राने सांगितले.

भारत विरुद्ध पाकिस्तान या लढतीशिवाय चॅम्पियन्स ट्रॉफीची सर्व चमक नष्ट होईल व सर्वात महत्त्वाचे म्हणजे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होईल असे आयसीसी सदस्य पीसीबीला हा मुद्दा पटवण्याचा प्रयत्न करत आहेत.

आयसीसी आणि ब्रॉडकास्टर यांच्यातील करारानुसार, प्रशासकीय मंडळाने स्पर्धेचे वेळापत्रक किमान ९० दिवस अगोदर देणे अपेक्षित होते व त्या मुदतीचा भंग झाला आहे.

त्यामुळे भारतीय संघाचा



शेजारील देशात प्रवेश टाळण्यासाठी स्पर्धेच्या लीग टप्प्यात भारत व पाकिस्तानला वेगवेगळ्या गटात ठेवण्याच्या शक्यतेवर सदस्य चर्चा करण्याची शक्यता आहे. परंतु टीव्ही प्रसारण हक्क धारक ते मान्य करणार नाही. प्रोफाइल आणि आर्थिक उत्पन्न वाढवण्याचा एक खात्रीचा मार्ग म्हणून ते गट साखळी फेरीतच भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याची मागणी करतील, यातच प्रसारणकर्त्यांचा फायदा असेल, असे सूत्राने सांगितले.

अन्यथा भारताने बाद फेरीत प्रवेश केला तर त्याला पाकिस्तानमधून बाहेर काढावे लागेल, कारण बीसीसीआयने आधीच आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे चर्चा हायब्रीड मॉडेलभोवती असेल. ◂(वृत्तसंस्था)

# विल्यमसनचे शतक हुकले, न्यूझीलंड ८ बाद ३१९

**◆ ख्राईस्टचर्च, २८ नोव्हेंबर**

येथे गुरुवारपासून प्रारंभ झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या दिवशी केन विल्यमसन न्यूझीलंड संघात पुनरागमन करताना ९३ धावांची आकर्षक खेळी केली व आपल्या संघाला ८३ षटकांत ८ बाद ३१९ धावा उभारून दिल्या. खेळ थांबला तेव्हा ग्लेन फिलिप्स नाबाद ४१ व टीम साऊदी नाबाद १० धावांवर होते.



गत महिन्यात न्यूझीलंडने भारताविरुद्धची ऐतिहासिक कसोटी मालिका ३-० ने जिंकली होती, तेव्हा केन विल्यम्सनला दुखापत झाली होती. तो जूनपासून केवळ दोन कसोटी आणि नुकताच एक स्थानिक प्रथम श्रेणी सामना खेळला होता.

विल्यमसनने टॉम लॅथम (४७) सोबत ५८, रचिन रवींद्र (३४) सोबत ६८ आणि डॅरिल मिशेल (३४) सोबत ६९ धावांची भागीदारी केली व त्यामुळे न्यूझीलंडच्या डावाला आकार मिळाला. इंग्लंडकडून शोएब बशीरने ४ बळी, तर गस अटकिन्सन व ब्रायडॉन कार्सने प्रत्येकी २ बळी मिळविले. ◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राची मुले उपांत्य, मुली उपांत्यपूर्व फेरीत दाखल

## कुमार व मुली ४३ वी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**अलिगड, दि. २८ नोव्हेंबर-**

कुमार व मुलींच्या ४३व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांनी उपांत्य तर मुलींनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

अलिगड (उत्तरप्रदेश) येथील महाराणी अहिल्याबाई होळकर स्पोर्टस् स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलांनी कोल्हापूर आणि पश्चिमबंगालवर मात करीत उपांत्य फेरी गाठली. आशिष गौतम (१.४० मिनिटे व ६ गुण) व पार्थ देवकते (२.०० मि.व ६ गुण) यांच्या अष्टपैलू कामगिरीमुळे त्यांनी पश्चिम बंगालला ३२-२८ असे ९ गुणांनी नमविले. त्याअगोदर महाराष्ट्राने कोल्हापूरवर ४१-२६ अशी १५ गुणाने मात केली. यातही पार्थने अष्टपैलू खेळी केली. त्याने १.४० मिनिटे संरक्षण करीत आपल्या धारदार आक्रमणात १० गडी टिपले. सोत्या वळवी (१.१० मि. ८ गुण) व कृष्णा बनसोडे (२.०० मि. व २ गुण) यांनीही अष्टपैलू खेळी करीत त्याला साथ दिली. कोल्हापूरकडून सुभम माकोटे याने (१.१०



महाराष्ट्र विरुद्ध कोल्हापूर या सामन्यातील टिपलेला क्षण.
(छायाचित्र : सुरेंद्र विश्वकर्मा, मुंबई)

मि. नाबाद व ८ गुण) व श्रेयस पाटीलने (१.२० मि, ६ गुण) यांनी लढत दिली.

मुलींच्या सामन्यात महाराष्ट्राने छत्तीसगडचा ३०-१४ असा एक डाव राखून १६ गुणांनी धुव्वा उडविला. संघाच्या विजयात प्रतीक्षा बिराजदार (४.०० मि. व २ गुण), स्नेहा लामकाने (२.३० मि. नाबाद व २ गुण), सुषमा चौधरी (२.३० मि. व २ गुण) व सुहानी धोत्रे (१.३० मि. व ६ गुण) यांच्या अष्टपैलू खेळांचा समावेश आहे. छत्तीसगडकडून जमीता शाहू (१.२० मि. नाबाद व २ गुण) हिची एकाकी लढत अपुरी पडली.

**कोल्हापूरच्या मुली उपांत्यपूर्व फेरीत**

कोल्हापूरच्या मुलींनी विदर्भवर मात करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. त्यांची लढत कर्नाटकाबरोबर पडले. महाराष्ट्राच्या मुलांची उपांत्य फेरीत आंध्र व दिल्ली यांच्यातील विजेत्या संघाबरोबर पडेल. मुली राजस्थबरोबर लढतील.



# बी. एफ. दमाणी प्रशालेत क्रीडा सप्ताह समारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ पुणे संचलित बी. एफ. दमाणी प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

याचे उदघाटन समारंभ माजी रणजी क्रिकेटपटू शिवा अकलूजकर यांच्या हस्ते झाले. क्रीडा सप्ताहाच्या उदघाटन समारंभाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करुन, क्रीडा-साहित्य व मैदान पूजनाने झाली. प्रशालेतील राष्ट्रीय खेळाडूंनी क्रीडाज्योत पथकाचे नेतृत्व केले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी बहारदार संचलन करुन मान्यवरांना मानवंदना दिली. उदघाटन समारंभाचे औचित्य साधून खेळाडूंनी साहित्य कवायत, सूर्यनमस्कार ,दांडपट्टा व अरेबिक नृत्याचे बहारदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.क्रीडा सप्ताहाचे औपचारिक उदघाटन इ. ८ वी रामानुजन व स्वामी विवेकानंद कक्षाच्या मुलांच्या संघात झालेल्या रस्सीखेचच्या सामन्याने झाली.

यावेळी संस्थेचे स्थानीय अध्यक्ष कालिदास जाजू, सचिव मंगल काबरा, सहसचिव उज्ज्वल तापडिया, अमित मर्दा, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, पर्यवेक्षक राहुल इंगळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक वंदना राऊत यांनी तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय हणमंत जामदार यांनी करुन दिला. क्रीडा अहवाल गणेश म्हमाणे यांनी सादर केला. सूत्रसंचालन सोनाली थोबडे यांनी केले. श्रीराम फुलारी यांनी आभार मानले. समारंभाच्या यशस्वीतेसाठ जयकर ठोंबरे, शितलकुमार शिंदे, पवन भोसले, समर्थ भीमरथी, आकाश झळकेनवरु व कलाशिक्षक शरण अळळीमोरे आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्हा निवड चाचणी तलवारबाजी स्पर्धा आज

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर व जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्या वतीने ३५वी वरिष्ठ गट जिल्हा तलवारबाजी निवड चाचणी स्पर्धा शुक्रवारी (दि. २९) सायंकाळी ४.३० वाजता छत्रपती शिवाजी रात्र प्रशाला येथे होईल. या स्पर्धेतून निवडलेला संघ १३ ते १५ डिसेंबर दरम्यान नांदेड येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेमध्ये सहभागी होईल. ३० नोव्हेंबर रोजी १३ वर्षांखालील खेळाडू यासाठी पात्र आहेत. इच्छुकांनी पवन भोसले (मो. ९६३७९६३७७७) अथवा अक्षय माने (८३२९०७०७६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी कळविले आहे.

# खेळ हा जीवनातील अनन्यसाधारण पैलू : सुभाष माने

**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

जीवनात यशस्वी होण्यासाठी खेळाचे खूप महत्त्व आहे. मोबाईल बाजूला ठेवून एक तास तरी मैदानात जावा, असा संदेश राज्य कबड्डी पंच व स्वामी विवेकानंद प्रशालेचे क्रीडा शिक्षक सुभाष माने यांनी विद्यार्थ्यांना दिला

कै. सौ. अ. बि. उदगिरी बालक मंदिर, श्री बालक मंदिर, कै. आ. ह.आब्बा प्राथमिक विद्यालय, श्री चौडेश्वरी प्रशाला व श्री सोमवार पेठ गट्टी फंड यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा सप्ताह कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

श्री सोमवार पेठ गट्टी फंड यांच्या शतकोत्तरी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व श्री तोगटवीर शिक्षण प्रसारक मंडळाच्या संकुलातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांचा क्रीडा महोत्सव उद्घाटनप्रसंगी संस्था अध्यक्ष सुभाष चिलवेरी, श्री तोगटवीर



क्षत्रिय समाजाचे सचिव अनिल कंदी, गट्टी फंडचे अध्यक्ष मोहन पोसा, फंड मानकरी रमेश गट्टी व सेक्रेटरी तुकाराम गट्टी, पतपेढी संचालक अरविंद पुडूर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व क्रीडा ज्योत प्रज्वलित करून करण्यात आला. अरविंद पुडूर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्ष सुभाष चिलवेरी यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा स्वागत व सत्कार करण्यात आला. क्रीडा शपथ विश्वनाथ कंदी यांनी सर्व विद्यार्थ्यांसमवेत घेतली. मुख्याध्यापिका सविता यरझल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अमर उदगिरी, सचिव श्रीधर चिंता, सहसचिव सतीश पेरमाळ, खजिनदार विलास चिंता, सदस्य संतोष पुरुड, संतोष उदगिरी, नागेश अकीम, व्यंकटेश रंगम, मोहन गुर्रम, प्रशांत पोसा आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप फडतरे यांनी केले. मुख्याध्यापिका विद्या शिंपी व विश्वनाथ कंदी यांनी आभार मानले.



# श्री सिद्धेश्वर स्कूलच्या तिघांची विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

शालेय शहर शालेय कराटे स्पर्धेतून श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या रुद्र जाधव, जयवर्धन गवळी व तन्मय बहिरवाडे या तिघांनी अजिंक्यपद पटकाविले.

या कामगिरीवर त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच तेजस कलागते, वंशिका माळी व भारती चिंता यांनी उपविजेतेपद संपादिले.

या खेळाडूंना क्रीडाशिक्षक पवन भोसले यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे श्री. सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर,, मुख्याध्यापक योगेश राऊत, पर्यवेक्षिका नीता तम शेट्टी, वैशाली नडगीर आदींनी अभिनंदन केले.





# साकिब शेख, मुकिम खान यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

वेस्ट बंगाल कोलकता येथे २९ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या १६ वर्षाखालील मुले व मुलींची ३९व्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव साकिब शेख यांची महाराष्ट्र बास्केटबॉल संघाचे संघ व्यवस्थापक म्हणून व मुकिम खान यांची पंच म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांचे सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष के. डी. पाटील, उपाध्यक्ष मनोज यलगुलवार आदींनी शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### पाठलाग करून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**सोलापूर, दि २८ नोव्हेंबर-**

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला तिचा मोबाईल नंबर मागून विनयभंग केल्याप्रकरणी अज्ञात तरुणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. हा प्रकार २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास शहर परिसरात घडला. याबाबत अल्पवयीन पीडितेच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात तरुणाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादीची अल्पवयीन मुलगी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास शाळेला जात होती. दरम्यान ती शाळेजवळच गेल्यानंतर तिला तिच्या तोंड ओळखीचा मुलाने पाठलाग केला. त्याने तिचा हात पकडून तिचा मोबाईल नंबर मागितला. त्यानंतर २७ नोव्हेंबर रोजी त्याच मुलाने मुलीचा पुन्हा पाठलाग करून मुलीकडे बघून मान हलवून इशारा करून तिचा विनयभंग केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक भांबिष्टे तपास करत आहेत.

### टोळक्याने केलेल्या मारहाणीत तरूण जखमी

**सोलापूर, दि २८ नोव्हेंबर-**

भुलाभाई चौकात टोळक्याने केलेल्या मारहाणीत तरूण जखमी झाला.कौशिक श्रीकांत गुरव (वय १९, रा. जय हनुमान सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २७ नोव्हेंबर रोजी रात्री कौशिक गुरव हा त्याची आई माधवी गुरव यांच्यासोबत वडीलांकडे भुलाभाई चौकातील साळुंखे पुतळ्याजवळ जाऊन आपण बाहेर जेवायला जाऊ असे सांगायला गेला होता. त्यावेळी बोलत असताना अचानक पाच ते सहा लोक आले. त्या लोकांनी गुरव यास येथे काम चालू आहे असे सांगितले. त्यावेळी गुरव यांनी फॅमिली मॅटर चालू आहे असे सांगितले असता त्या लोकांनी कौशिक गुरव यास मारहाण करायला सुरुवात केली. त्यामध्ये कौशिक गुरव हा जखमी झाल्याने त्यास आई माधवी गुरव यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दुचाकीवरून पडलेल्या जखमी तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि २८ नोव्हेंबर-**

कुंभारी येथील गेनसिध्द मंदीरासमोरील सर्व्हिस रोडवर दारूच्या नशेत दुचाकीवरून पडून जखमी झालेल्या तरूणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना २७ नोव्हेंबर रोजी रात्री घडली. परशुराम सिध्दाराम चाबुकस्वार (वय ३५, रा. कुंभारी) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. २७ नोव्हेंबर रात्री नऊच्या सुमारास परशुराम चाबुकस्वार हा त्याची मोटारसायकल नं. एमएच १३ सीडब्ल्यू १३९० वरून दारूच्या नशेत कुंभारी गावात सर्व्हिस रोडने जात होता. गेनसिध्द मंदीरासमोरील सर्व्हिस रोडवर दारूच्या नशेत परशुराम चाबुकस्वार हा मोटारसायकलवरून पडून गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्यास बेशुध्दावस्थेत वळसंग पोलिस ठाण्यातील हवालदार चव्हाण यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता २८ नोव्हेंबर रोजी पहाटे डॉ. राजदीप सिंह यांनी परशुराम यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### टेंभुर्णीत ४४ जणांचे रक्तदान

**टेंभुर्णी, दि. २८ नोव्हेंबर-**

२६/११ दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना ४४ रक्तदात्यांनी रक्तदान करून श्रद्धांजली वाहिली असून हा रक्तदनाचा कार्यक्रम टेंभुर्णी येथील सामाजिक संघटना मीरा फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आला असल्याची माहिती मीरा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मयूर काळे यांनी दिली.



२६/११ दहशतवादी हल्लयातील शहीद जवानांना अभिवादन देण्यासाठी मीरा फाउंडेशन टेंभुर्णीच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरासाठी एचडीएफसी बँक शाखा टेंभुर्णीचे शाखा अधिकारी प्रशांत कुलकर्णी साहेब व सहाय्यक अधिकारी मयूर जाधव साहेब यांचे सहकार्य लाभले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक व सामाजिक कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

### सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार, दि. २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

### नागमणी गड्डम यांचे निधन



**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

लक्ष्मीनारायण टॉकीजवळील यशवंत सोसायटी येथील रहिवासी नागमणी मुरलीधर गड्डम यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सून, नातू असा परिवार आहे.

Classifieds

**पाहिजेत**

डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटण्याची वेळः- ९-५/६ फोन नं : ७०२०१४८४२६ ८६५२७५१९०२

**पाहिजेत**

अकलूज येथे आयुर्वेदिक कारखाना व नर्सरीत (शेती) काम करणारे जोडपे पाहिजेत. पगार २० हजार ते २६ हजार महिना. जोडीला संपर्क : ९८९०१४३४३२

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# दुचाकीचालकासह मागे बसणाऱ्यालाही हेल्मेट सक्ती; एक हजार रुपयांचा दंड

### महामार्गावर बसणार आता सीसीटीव्ही

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि २८ नोव्हेंबर-**

रस्ते अपघातात सोलापूर जिल्हा नेहमीच राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता रस्ते अपघात रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक समितीने विशेषतः ग्रामीण पोलिसांनी कंबर कसली आहे. बेशिस्त वाहनांवर दंडात्मक कारवाईची मोहीम राबविली जाणार आहे.



आता दुचाकीवरील पुढे बसलेल्यासह मागे बसलेल्या व्यक्तीच्या डोक्यावर देखील हेल्मेट बंधनकारक असणार आहे. दुचाकीस्वाराकडे हेल्मेट आहे, पण मागच्या व्यक्तीकडे नसेल तरी एक हजार रुपयांचा दंड द्यावा लागणार आहे. महामार्गाच जाळे सर्वत्र विस्तारल्यानंतर वाहनांचा वेग वाढल्याचे चित्र पहायला मिळत आहे. लेन कटिंग, ट्रिपलसीट दुचाकी, सीटबेल्ट न लावता चारचाकी चालवणे, मद्यपान करून वाहन चालविणे, १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच वाहन चालविणे, अशा बाबींवर कारवाईवेळी अधिक फोकस केला जाणार आहे. तत्पूर्वी, जिल्ह्यात सर्वाधिक अपघात व अपघाती मृत्यू होणाऱ्या ठिकाणांना (ब्लॅकस्पॉट) आरटीओ, वाहतूक पोलिस, महामार्गाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी संयुक्तपणे पाहणी करणार आहेत. त्यानंतर त्यांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नुसती पाहणी व तात्पुरत्या उपाययोजना न करता त्या अपघातप्रवण ठिकाणी ठोस उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने ही पाहणी होणार आहे. रस्त्यालगत विशेषतः महामार्गालगत उभारलेली खोकी तथा हातगाड्यांवर कारवाई केली जाईल.

महामार्गांवर वाहन चालविणाऱ्याने वाहतूक नियम मोडला आणि सुरवातीला दंड भरण्याची घाई केली जाणार नाही. दुसऱ्यांनाही अशीच स्थिती राहील, पण तिसऱ्यांदा वाहतूक नियम मोडल्यास यापूर्वीचा सगळा दंड त्या वाहनचालकाला जागेवरच भरावा लागणार आहे. दंड न भरल्यास त्याचे वाहन जप्त करण्याची करवाई केली जाणार आहे, असेही वाहतूक पोलिसांनी नियोजन केले आहे.



# देव, देश आणि धर्म रक्षणासाठी भाजपा कटिबद्ध : आ. सुभाष देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

देव, देश आणि धर्माच्या रक्षणासाठी भाजपा नेहमीच काम करत आला आहे. त्यामुळे अनेक साधुसंतांचे आशीर्वाद पक्षाच्या पाठिशी असल्यामुळेच विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मोठे यश मिळाले आहे, असे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात तिसऱ्या वेळी विक्रमी मतांनी विजयी झालेल्या आ. सुभाष देशमुख यांनी शुक्रवारी चडचण, तद्देवाडी (जि. विजयपूर), येथील श्री गुरुचंद्रशेखर संस्थान हिरेमठ येथे भेट देवून महाराजांचे आशीर्वाद घेतले; त्यावेळी आ. देशमुख बोलत होते. यावेळी महांतेश महास्वामी महाराज तर चडचण येथे चंद्रशेखर शिवाचार्य महाराजांनी आ. देशमुख यांना राजकीय व सामाजिक कार्यात आपली अशीच भरभराट होवो, असा आशीर्वाद दिला. कार्यक्रमास कंदलगावचे सरपंच धनेश कडते, कैलास कडते, आनंद कोले, सुरेश बगले, प्रकाश कोरे, लोकमंगल पतसंस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली यांच्या इंडी तालुक्यातील भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.



# नरोटे यांनी विधानसभा निवडणुकीचा अहवाल प्रदेश कमिटीकडे केला सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने नाना पटोले यांनी विधानसभा निवडणुकीतील उमेदवार, शहर व जिल्हा अध्यक्ष यांची बैठक टिळक भवन दादर येथे आयोजित केली होती. यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी विधानसभा निवडणुकीचा अहवाल मुंबई येथील बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे सादर केला.

या बैठकिस माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, नसीम खान, भाई जगताप यांच्यासह प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना नानाभाऊ पटोले म्हणाले की, निवडणूक प्रचारात काँग्रेस महाविकास आघाडीला मोठा प्रतिसाद होता. महाविकास आघाडी सत्तेवर येणार असे दिसत होते. पण महायुतीने बेईमानाने सत्ता घेतली. महायुतीला एवढे बहुमत कसे मिळाले आहे, याबाबत जनता सुद्धा संभ्रमित आहे. लोकांच्या मतदानाने नाहीत तर मशीन ने सत्ता काबीज केली आहे अशी शंका अनेकांनी व्यक्त केले. यामुळे आगामी सर्व निवडणुका मतपत्रिकेवर घेण्यासाठी भारत जोडो सारखी लोकशाही वाचवा सह्यांची मोहीम सुरू करणार असल्याचे सांगितले. यावेळी सोलापुरातून चेतन नरोटे, तिरूपती परकीपंडला यांच्यासह राज्यातील काँग्रेसचे उमेदवार, शहर अध्यक्ष उपस्थित होते.

# संविधानाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची गरज : कारंजे

### पी. बी. ग्रुपतर्फे संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना हक्क आणि कर्तव्य दिले. संविधानावरच आपला देश चालतो. यामुळे सर्व विद्यार्थ्यांना घरात आणि शाळेमध्ये संविधानाविषयी मार्गदर्शन करण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी केले.

मिलिंद नगर, बुधवार पेठ, प्रबुद्ध भारत चौक येथे संविधान दिनानिमित्त प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्या वतीने राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांच्या समवेत संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.सोलापूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त



संदीप कारंजे यांच्या हस्ते संविधान निर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या उपक्रमास सुरुवात करण्यात आली. विविध शाळेतील हजारो विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या समवेत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यावेळी महापालिका उपअभियंता तपन डंके, आरोग्य निरीक्षक बसवेश्वर जमादार, सामाजिक कार्यकर्ते भारत बाबरे, श्रीमंत जाधव, बलभीम शिंदे ,विजय इंगळे, ॲड. विशाल मस्के, ॲड. स्वाती मस्के, पी.बी. ग्रुप प्रमुख गौतम चंदनशिवे,चंद्रकांत सोनवणे, सिद्धांत सुर्वे, गोपीनाथ जाधव, श्रावण सरवदे ,अमर सुरवसे, अजय इंगळे,पी बी ग्रुप अध्यक्ष आदित्य चंदनशिवे ,पी बी ग्रुप उपाध्यक्ष श्रीकांत वाघमोडे, उमेश रणदिवे, गौतम शिंदे, रावजी सखाराम हायस्कूल व कनिष्ठ ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य वालवडकर, श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेचे संजय पंडित, मिलिंद खोबरे, तनय गांधी , दमाणी विद्या मंदिरचे अंकुश मदडे, जयकर ठोंबरे, संतोकीराम रामसुख इंग्लिश मीडियम हायस्कूलचे धर्मराज कट्टीमनी, म.न.पा. २७ नंबर शाळेचे नवले,बाळासाहेब जगताप, जुनिअर कॉलेजचे प्राध्यापक गणेश लेंगरे, अविनाश मुळकुटकर आद श्रीमंत जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

# पूर्णम इकोविजन फाऊंडेशन दशकपूर्ती समारोह रविवारी

**पुणे, दि. २८ नोव्हेंबर-**

ई-कचऱ्याच्या पुनर्वापरासाठी कार्यरत पूर्णम इकोविजन फौंडेशनचा दशकपूर्ती वर्धापनदिन सोहळा रविवार १ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच ते सात या वेळेत बीएमसीसी महाविद्यालयाच्या टाटा सभागृहामध्ये होणार आहे. यासाठी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक भाऊ काटदरे हे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश मणेरीकर यांनी दिली.

पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील वडगाव येथे पूर्णम इकोविजन ही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहे. वर्धापन दिनानिमित्त पुनर्चक्र - शून्य कचरा प्रदर्शन सादर करण्यात येणार आहे. ज्याच्यामुळे समाजबांधवांचा कचऱ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलेल. शनिवार (दि.३० नोव्हेंबर) आणि रविवार (दि.१ डिसेंबर) सकाळ ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या प्रांगणात हे प्रदर्शन सुरू राहील. मणेरीकर म्हणाले,'' २०१२ पासून संस्थेच्या कार्याची सुरूवात झाली. पर्यावरण संवर्धन व संरक्षण यासोबत कचरा व्यवस्थापन या विषयावर लक्ष्य केंद्रित करून कार्य सुरू झाले. यालाच शाश्वत विकास आणि लोकसहभागाची जोड मिळाली आहे. फॅब्रिक अपसायकलिंग, ई-वेस्ट संकलन, ई- कचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने विघटन, रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि कंपोस्टिंग या विषयात योग्य मार्गदर्शन देण्याचे काम संस्था करते.'' या कार्यक्रमात पूर्णम तर्फे दिले जाणारा पर्यावरण पूरक गृह निर्माण सोसायटीसाठीचा ''पर्यावरण हितवर्धिनी '' आणि दुसरा उद्योजकांसाठी दिला जाणारा '' पर्यावरण मित्र '' या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.



सोलापूर : भारतीय जनता पक्षाच्या वतीने कार्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी भाजपचे प्रदेश सचिव एसी मोर्चा राजाभाऊ माने, युवा मोर्चा शहर उपाध्यक्ष अजित गादेकर, लक्ष्मण गायकवाड, श्रीधर गोखले, आनंद गोडलोलू, भिमा आसादे, सुनिल टोणपे आदी उपस्थित होते.

# मरणाचे भय वाटणारा मरणापासून लांब पळतो

**शोध क्रीडा सांस्कृतिक, सामाजिक संस्था कुर्डुवाडीने बुधवारी 'भयरात्र' हे नाटक सादर केले. याचे लेखक रविशंकर झिंगरे तर पायल पांडे यांनी दिग्दर्शन केले.**

पडदा उघडताच समोर स्टेशन प्लॅटफॉर्म चे दृश्य.खूप धूसरपणा, गडगडाट आणि इंजिनाची शिट्टी, गाडी धडधडत गेल्याचा आवाज मग समोर च्या पायऱ्यांवर बसलेला एक तरूण तो आणि मागच्या प्लॅटफॉर्म वरील वृद्ध बोलू लागतो नुकत्याच घडलेल्या अपघातांविषयी. इथे नाटकाची सुरुवात होते.

हा अपघात कसा झाला ? रक्ताच्या थारोळ्यातील प्रेत हे ऐकताना तो चा संयम सुटून तो बोलू लागतो. आणि म्हाताऱ्याच्या बडबडगीत पुरता अडकून स्वतः:ची सांसारिक व्यथा सांगतो.मरणाचे भय वाटणारा तो मरणापासून लांब पळतो आहे. कारण ज्योतिषाने वर्तविले ल्या भविष्या प्रमाणे तो आणि त्याचा मित्र यांचा अपघाती मृत्यू.मगाच्या अपघातात मेलेला त्याचा मित्र.आता आपला मृत्यू हे भय सतावते आणि म्हाताऱ्याला मृत्यू हवा आहे आणि तोचं मरणाचं भय म्हाताऱ्याला घालवायचं आहे यासाठी म्हाताऱ्याचं जीवन मरणवरणावरील भाष्य नाटकभर चालते . त्या ची भीती घालवण्यासाठी येणाऱ्या मुक्तायनी एक्स्प्रेस साठी प्लॅटफॉर्म च्या अगदी कडेला उभे राहतात गाडी जाते म्हातारा मरतो तो आपण मेलो नाही असा सुटकेचा निःश्वास टाकतो. एका क्षणी त्यांचे भयंकर डोके दुखू लागते रक्त येऊ



लागते आणि त्याचा मृत्यू होतो. इथे नाटकाचा शेवट होतो.

जीवन- मरणावरचे भाष्य, आणि कितीही धडपडा मृत्यू गाठणारच हे सत्य सांगण्यासाठी केलेला २.३० मिनिटे केलेला शाब्दिक छळ. लेखकाला ही गोष्ट थोडक्यात सांगता आली असती. कुठे थांबायचे यांचे भान सांभाळले असते, शब्दात बदल करून केलेला तोच तोच पणा टाळता येऊन नाटकाची विचाराची वीण पक्की करता आली असती. लेखनातल्या सुंदर जागा मनाला भुरळ घालतात उदा. संध्या म्हणजे मनावरचे मळभ दूर करण्यासाठी केलेली सूर्याची उपासना . पैलू पाडलेल्या हिऱ्याचे कोंदण म्हणजे मृत्यू.मरण्यासाठी कारण एकच जन्म. स्मृतिभ्रंश म्हणजे 'व्हेजीटेबल' अशा सुंदर शाब्दिक संपत्तीने लिखाण सजलेले.




> **आजचे नाटक :** 'रुक्ष' (पंचशील सामाजिक मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था, लऊळ)
> **वेळ व ठिकाण :** सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
> **लेखक :** प्रशांत जगताप
> **दिग्दर्शक :** डॉ. दिनेशकुमार कदम

पण चर्चात्मक नाटकात कंटाळले पणाची भीती असते.तेच या नाट्यप्रयोगात घडले. प्रेक्षकांच्या सहनशीलतेचा अंत बघितला गेला.

दिग्दर्शकाने यात काटछाट करण्याचे स्वातंत्र्य घेतले असते तर शब्दात बदल करून मांडलेला विचारांचा तोच तोपणा टाळून प्रयोग सुसह्य करता आला असता. तो च काम करणाऱ्या दहिवाळ यांच्या जवळील अभिनय क्षमतेचा वापर दिग्दर्शकाने करून घ्यावयास हवा होता.२ ऱ्या अंकात तसा थोडा प्रयत्न झाला.म्हाताऱ्याचे काम करणाऱ्या डॉ संतोष सुर्वे यांनी अभिनयाची सुंदर झलक दाखवली.विषेशत:मुक्ताई एक्स्प्रेस जाताना फलाटाच्या कडेला उभे राहून मरणाचं केलेलं स्वागत . म्हाताऱ्याचं उठतं,बसणं पायऱ्या चढताना धडपडणं,नाटकभर न थकता बोलत राहणं. 'प्रॅक्टीस मेन मॅन परफेक्ट' हे दिसून येत होतं.मित्राचे काम करणाऱ्या ऋत्विक गायकवाड यांनी समजून भूमिका केली. बाथरूम गळते बघायला येऊन जाताना मित्राच्या बायकोला केलेली डोळ्यांची खूणही स्पष्ट जाणवली.

नेपथ्यात - लेव्हल्स,पायऱ्यायांच्या सहाय्याने उभे केलेले प्लॅटफॉर्म, स्टेशनचीपाटी , दोन सेक्शन पाडून उभा केलेला गच्चीवरील कोपरा काटे नसलेले घड्याळ, इ.बारीक सारीक तपशील टिपला होता.

म्हातारा, मित्र, तो यांची वेशभूषा, रंगभूषा पात्रांच्या आवश्यकतेनुसार होती. ध्वनईसंकलनात - पाऊस, रेल्वे चे धडधडत जाणे,लांबून ऐकू येणारी शिट्टी,कुत्र्याचे भुंकणेव,वारा ,बासरी,सतार या तंतू वाद्याचा प्रसंगानुरूप वापर,म्हाताऱ्याच्या ( अश्वत्थामा ) कपाळावरील न दिसणारी पण असणारी जखम म्हणजे प्रारब्ध यावेळी केलेला भैरवी ठुमरीचा उपयोग लक्षणीय होता.

प्रकाश योजनाकार - श्याम चव्हाण यांनी प्रकाश योजनेत पावसाळी रात्रीचा धूसरपणा,लांबवर झालेला अपघात दाखवताना केलेला लाल धूसर रंगाचा वापर , मुक्ताई एक्स्प्रेस जाताना जाताना आणि म्हातारा मेल्यावर केलेली योजना.सर्वात सुंदर - मुक्ताई एक्स्प्रेस जाताना केलेला लाइट आणि साउंडचा एकत्र मेळ यामुळे खरोखर ट्रेन समोरून जाण्याचा आभास निर्माण करण्याचा यशस्वी प्रयोग झाला.या सर्व बाबींची जमा म्हणजे एक छान प्रयोग पाहण्याचे समाधान मिळाले.

**विद्या काळे**
**- नाट्य समीक्षक**

# शहर गुन्हे शाखेकडून चाचा-भतीजाच्या जोडीसह सराईत पाच गुन्हेगारांना अटक

## ७ गुन्हे उघडकीस; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून सराईत पाच गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून चोरीचे ६ व फसवणुकीचा १ गुन्हा उघडकीस आणला आहे. या कारवाईत पोलिसांनी २ लाख ९३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांमध्ये शहराच्या विविध भागातून महागड्या सायकली चोरणाऱ्या चाचा-भतीजाचा समावेश आहे.

रविकांत यशवंत काळे (वय २४, रा. वैष्णवी नगर भाग २, वैष्णवी देवी मंदीराजवळ, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर), सर्फराज मान्नू अन्वरहुसेन इराणी (वय ४७, रा. हांडेवाडी रोड, भारत पेट्रोल पंपाशेजारील बोळात, हडपसर, पुणे), नागेश भिमाशंकर पाटील (वय ३७, रा. चनशेट्टी अपार्टमेंट, भवानी पेठ, सोलापूर), बाबू शामलाल कुकरेजा (वय ६५, रा. घर नं. ११, भैय्या चौक, निरवासी चाळ, सोलापूर) आणि राजू लक्ष्मण कुकरेजा (वय ३८, रा. घर नं. जे ५, सुरवसे नगर, कुमठा नाका, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी रविकांत काळे यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीस गेलेले सोने, लॅपटॉप, गुन्ह्यातील रिक्षा असा २ लाख ३३ हजारांचा ऐवज जप्त करून फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील गुन्हा उघडकीस आणला. सर्फराज इराणी यास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील फसवणुकीचा गुन्हा उघडकीस आणून २० हजार रुपयांची रोकड हस्तगत केली. नागेश पाटील याच्याकडून पोलिसांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यातील दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून १५ हजार रुपये किंमतीची चोरीची दुचाकी जप्त केली. बाबू आणि राजू कुकरेजा या चाचा-भतीजाच्या जोडीला पोलिसांनी ताब्यात घेऊन सायकल चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणून २५ हजार रुपये किंमतीच्या ४ सायकली जप्त केल्या.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय पाटील, पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलिस अमंलदार राहुल तोगे, आबाजी सावळे, अजिंक्य माने, विठ्ठल यलमार, बापू साठे, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, बाळू काळे, सतिश काटे, सायबर पोलिस ठाण्याकडील मच्छिंद्र राठोड, गायकवाड यांनी केली.


# तीन दिवसांत साडेपाच लाख अपार आयडी

- शिक्षण विभागासमोर आव्हान सोलापूर जिल्ह्यातील ७.७१ लाख
- विद्यार्थ्यांपैकी केवळ १.८९ लाख विद्यार्थ्यांचे अपार तयार
- केंद्र सरकारने विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश दिल्याने शिक्षकांची धावपळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ नोव्हेंबर**

केंद्र शासनाने यु-डायस प्रणाली मधून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ऑटोमेटेड पर्मनंट अकॅडमी अकाउंट रजिस्ट्री अर्थात (अपार) आयडी उपलब्ध करून देण्याचा राष्ट्रीय उपक्रम हाती घेतला आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सुमारे पावणे आठ लाख विद्यार्थ्यांपैकी आत्तापर्यंत फक्त १ लाख ८९ हजार २२९ विद्यार्थ्यांचे अपार आयडी कार्ड काढण्यात आले आहे. उर्वरित साडेपाच लाख विद्यार्थ्यांचे कार्ड काढण्यासाठी केवळ तीन दिवसांचा कालावधी शिल्लक असल्याने शिक्षण विभागाची चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र दिसत आहे.

दरम्यान जिल्ह्यात ४ हजार ७१७ शाळांमधील पहिली ते बारावीचे एकूण ७ लाख ७१ हजार ८०१ इतके विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्याचे काम सुरू केले आहे. यासाठी ३० नोव्हेंबर रोजीची अंतिम मुदत आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेच्या प्रकल्प संचालकांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्रही पाठवले आहे. जिल्हास्तरावर विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे शाळांकडून आवश्यक माहितीची पूर्तता करण्यासाठी धडपड सुरू झालेली आहे. याबाबत केंद्र सरकारकडून सातत्याने पाठपुरावा सुरू झाला आहे.




जिल्हास्तरावरील संगणक प्रोग्रामवर व तालुकास्तरावरील डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि एम.आय.एस कोऑर्डिनेटर यांना प्रशिक्षण देण्यात आले असून सर्व मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण घेण्याचे कळवले आहे. यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली सहा नोव्हेंबर रोजी आढावा बैठक संपन्न झाली. त्यानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील जवळपास सर्वच शाळांना दिवाळीनिमित्त नोव्हेंबर महिन्यात सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या होत्या. त्यानंतर विधानसभा निवडणूक आल्याने शिक्षकांना निवडणूक कार्यात रुजू करण्यात आले होते. परिणामी अपार आयडीचे काम रखडले. मतमोजणी पश्चात शिक्षकांचे नियमित काम सुरू झाले परंतु आता केवळ तीन दिवस उरल्याने शिक्षकांची मोठी दमचाक आणि धावपळ होत आहे. त्यामुळे या कामासाठी मुदत वाढवून मिळावी अशी विनंती केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे.

### पालकांकडून संमती पत्र

अपार आयडी बनवण्यासाठी पालकांचे संमती पत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रत्येक शाळेकडून पालकांची संपर्क साधून त्यांच्याकडून संमती पत्र मागण्यात येत आहे. ज्याप्रमाणे संमती पत्र प्राप्त होईल त्याप्रमाणे यादी परिपूर्ण होणार आहे.

### मुदत वाढण्याची शक्यता

दिवाळीच्या सुट्ट्यानंतर विधानसभा निवडणुकीत शिक्षक मोठ्या प्रमाणात व्यस्त होते. त्यामुळे अपार आयडी च्या कामासाठी खूप कमी वेळ मिळाला. कदाचित मुदत वाढण्याची शक्यता आहे जिल्ह्यातील पावणेआठ लाख विद्यार्थ्यांपैकी १ लाख ८९ हजार ३२९ विद्यार्थ्यांना आयडी प्राप्त झाला आहे.

**-कादर शेख, शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग सोलापूर.**

# ज्ञान कल्याणक विधी उत्साहात संपन्न



## श्री मजिंनेंद्र १००८ आदिनाथ जिनेबिंब पंचकल्याक महामहोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

श्री मजिंनेंद्र १००८ आदिनाथ जिनेबिंब पंचकल्याक महामहोत्सवातील ज्ञान कल्याणक विधी गुरुवार उत्साहात पार पडला.

पंच कल्याणक कार्यक्रमातील चौथ्या दिवशी पहाटे सहा वाजता जाप अनुष्ठान, श्री जिन अभिषेक, शांतीधारा आणि तपकल्याणक पूजन हा विधी पार पडला. त्यानंतर साडेआठ वाजता मुनी श्रींचे मंगल प्रवचन झाले. सकाळी साडेनऊ वाजता महामुनी राज आदिनाथजी यांचा प्रथम आहार विधी कार्यक्रम संपन्न झाला. दुपारी एक वाजता प्राणप्रतिष्ठा अधिवासना विधी, सुरी मंत्र, केवल ज्ञान उत्पत्ती, समोशरण रचना, दिव्य ध्वनी, ज्ञान कल्याण पूजन इत्यादी विधी मूर्तींवर करून ज्ञान कल्याणक कार्य संपन्न झाले. दुपारी साडेतीन वाजता मुनी श्रींचे मंगल प्रवचन झाले. सायंकाळी सात वाजता महाआरती आणि ज्ञानकल्याणक विषयक सांस्कृतिक कार्यक्रम विविध नाटिका एकांकिका रंगीबेरंगी वेशभूषा आणि वाद्यांसह सादर झाल्या. यासाठी भोपाळवरून आलेले संगीतकार श्री संजय रंगीला अँड पार्टी यांनी जैन श्रावकांना विविध तालवाद्यांद्वारे मंत्रमुग्ध केले.

हा कार्यक्रम श्री सनत आणि सतीश जैन जिंतूर यांनी पंचकल्याणकाच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाची नाटिका आणि इतर पात्र उत्कृष्ट निभावली गांधी नाथा रंगजी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाने अतिशय सुंदर असे संस्कृती कार्यक्रम प्रदर्शित केले. सोलापुरातील जैन महिला मंडळ, ज्ञानदीप महिला मंडळ आणि रत्नत्रय महिला मंडळ या मंडळांनी जैन धार्मिक नृत्य विविध वेशभूषा सह सादर करून श्रावकांना मंत्रमुग्ध केले.

### पिंची हे मुनींचे अहिंसा उपकरण

पिंछी परिवर्तन आकाश मार्गाने ड्रोन कॅमेराच्या मदतीने पिंछीचे अवतरण व्यासपीठावर होताना विलोभनीय दृश्याचा सर्व श्रावकांना आनंद झाला. श्रावणात चोचीने मोर आपली जुनी झालेली मोर पिसं काढून टाकतो ती पडलेली पिस श्रावक गोळा करून साधूंची पिंछी बनवतात. पिंची हे मुनींचे अहिंसा उपकरण आहे. पंचकल्याणक कार्यक्रमात सहा नवीन पिंछी श्रावकांकडून सहा मुनिना भक्ती भावाने देण्यात आल्या. मुनीनी वर्षभर वापरलेली पिंछी त्याच श्रावकाला दिली जाते ज्याने वर्षभर जैन धर्माचे पालन केले आहे. मुनी सेवा, व्रत, वैकल्प, प्रतिमा, साधना, नियम यांचे अष्टमूलगुणांचे पालन केलेले आहे, त्यांना पिंछी मिळते. पारस दुरुगकर, मनीष शहा, वरुणा शहा, मंजुषा मैंदर्गी, आदर्श मेहता, हर्षवर्धन बुबने, आणि रत्नत्रय तीन मुनी तर्फे संजय शहा यांना महाराजांकडून पिंछीचा मान मिळाला.





# आ. विजयकुमार देशमुख यांनी घेतली फडणवीस यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर उत्तर विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर तसेच महायुतीच्या ऐतिहासिक विजयानंतर सोलापूर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबई येथील सागर निवासस्थानी भेट देवून त्यांचा सत्कार केला.

तर यावेळी विजय मालकांच्या सोबत असलेले शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांची उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पाठ थोपटली आणि समाधान व्यक्त केले. या भेटीवेळी सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून घवघवीत विजय मिळविल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांनी आमदार विजयकुमार देशमुख यांचा सत्कार करत त्यांनाही शुभेच्छा दिल्या. दरम्यान, या शुभेच्छा मंत्रीपदाच्या होत्या की सहज होत्या. याबाबत मात्र सोलापूर शहरात आज दिवसभर चर्चा सुरू होती. तर नरेंद्र काळे यांनी शहराध्यक्ष म्हणून अत्यंत जबाबदारीने काम पार पाडत मविआचा सुफडा साफ केल्याने त्यांचीही फडणवीस यांनी पाठ थोपटली. या प्रसंगी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, उत्तर विधानसभा संयोजक संजय कोळी, प्रमोद मोरे, प्रसाद कुलकर्णी, किरण पवार आदींची उपस्थिती होती.



# भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने क्रांतिसुर्य ज्योतीबा फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती नागेश बंगाळे, संजय रणदिवे,जिल्हा अध्यक्ष मिलिंद प्रक्षाळे हे होते. डॉ सतीश खारवे, आदम बागवान, लतीफ नदाफ मा.जिल्हाध्यक्ष गांनी महात्मा फुलेंच्या अभिवादनपर भाषणात महात्मा फुले यांनी त्यांचे संपूर्ण जीवन मानव मुक्तीच्या कल्याणासाठी अर्पण केले. त्यांनी समाजात स्वातंत्र्य, समता, न्याय,बंधुता, समानता प्रस्थापित केली व शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, वंचित उपेक्षीत घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपली जीवनाची अहुती दिली. अशा या महान क्रांती सुर्याला भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने विनम्र अभिवादन करीत आहोत. अशपाक शेख, विलास सरवदे, मोहम्मद इशाक डोका तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी पप्पू शिंदे, निखिल चंदनशिवे, अण्णा साहेब प्रक्षाळे, रणजीत शिंदे, अशोक सोनवणे, उत्तम वाघमारे, प्रभाकर तुपारे, गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# सोलापुरात वाढली हुडहुडी; पारा @१४.६

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

दरवर्षी दिवाळीपूर्वी किंवा ऐन दिवाळीत येणारी थंडीची लाट यंदा दिवाळी संपल्यावर आली आणि आता हुडहुडी वाढत आहे. गुरूवारी तापमान १४.६ होते.

दरम्यान, या थंडीचा फायदा गहू आणि तुरीला होणार असल्याची माहिती काही शेतकरी बांधवांनी दिली. तर द्राक्ष बागांना थंडीपासून धोका कमी असल्याचेही सांगण्यात आले.



यंदा परतीच्या पावसाने मुक्काम उशिरापर्यंत वाढविल्याने हिवाळाही काही दिवस पुढे लांबला. पावसामुळे रब्बी हंगामातील पेरण्याही लांबल्या. सध्या थंडी जोरात चालू असल्यामुळे तापमानाचा पारा खूप खाली घसरत आहे. या थंडीने जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ठिकठिकाणी शेकोट्या पेटवल्या जात आहेत. तर हुडहुडी भरवणारी थंडी तुरीसह गहू पिकासाठी लाभदायी ठरणार आहे. मात्र, ती आणखी कमी झाल्यास ज्वारी पिकासाठी फायदेशीर ठरू शकते. आभाळ जितके जास्त येईल तितके ज्वारी पीक जोमात येत असते. सध्या शेतशिवारात तूर पीक जोमात असून, सध्या शेंगाच्या अवस्थेत आहे. तर रब्बी हंगामातील गहू, हरभरा, जवस, ज्वारी पिकांची अजूनही पिकांची पेरणी सुरू आहे. गेल्या दोन दिवसांत तापमानाचा पारा खुपच खाली आला आहे. यामुळे सायंकाळी ७ वाजल्यापासूनच थंडी वाजू लागली आहे. वाढलेली ही थंडी तुरीसह गहू, करडई पिकाला वरदान ठरणार आहे. दरम्यान, अती गारवा वाढल्यास भाजीपाला आणि द्राक्ष पिकांच्या वाढीलाही धोका होवू शकतो.


# महाराष्ट्राची हास्यजत्रा कॉमेडीची हॅटट्रीक

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या सोनी मराठी वाहिनीवरील कार्यक्रमाने महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत.

महाराष्ट्राची हास्यजत्रा आता कॉमेडीची हॅटट्रीक घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या नव्या पर्वामध्ये आपल्याला नक्कीच नवीन काहीतरी पाहायला मिळणार आहे.तब्बल ६ वर्षांहून जास्त काळ महाराष्ट्राची हास्यजत्रा हा कार्यक्रम प्रेक्षकांचे मनोरंजन करतो आहे.महाराष्ट्राची हास्यजत्रा ह्या कार्यक्रमाचे आजवर ८०० पेक्षा अधिक भाग प्रसारित झाले आहेत.२ डिसेंबरपासून महाराष्ट्राची हास्यजत्रेचे नवे पर्व सोनी मराठीवर सुरू होणार आहे.

# तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेवरील 'आनंदडोह' चित्रपटाची घोषणा




**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

'शिवराज अष्टकाच्या' रूपाने घराघरांत पोहचलेले गुणी लेखक-दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज अन त्यांच्या शूर शिलेदारांचा इतिहास जागतिक सिनेमांच्या पातळीवर नेऊन ठेवलाय.

'शिवराज अष्टक नंतर आता संत साहित्याचे समृद्ध संचित घराघरांत पोहचावे यासाठी त्यांनी पाऊल उचलले आहे.'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाच्या निर्मितीनंतर आता जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेवरील आनंदडोह या नव्या चित्रपटाची घोषणा त्यांनी केली आहे. 'साईराम एंटरप्राईजेस' निर्मित, योगेश सोमण लिखित आणि दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित आनंदडोह हा भव्य मराठी चित्रपट २०२५ मध्ये प्रेक्षक भेटीला येणार आहे. मुक्ता बर्वे,योगेश सोमण, अजय पूरकर, समीर धर्माधिकारी, आदिनाथ कोठारे हे कालाकार दिसणार आहेत.










हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पूर्व वैमनस्यातून जावयास मारहाण करणाऱ्या सासूसह दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

पूर्व वैमनस्यातून जावयास मारहाण करणाऱ्या सासूसह दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कृष्णा हणमंतु आमाटे (वय ३२, रा. बापूजी नगर, टाकळीकर विट भट्टीजवळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मल्लम्मा किसन भैरे व बाबू किसन भैरे (रा. बापूजी नगर, वनराज चौक) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मल्लम्मा भैरे यांचा कृष्णा आमाटे हा जावई असून बाबू हा त्यांचा मेव्हुणा आहे. २१ नोव्हेंबर रोजी अडीचच्या सुमारास बापूजी नगर येथे मल्लम्मा भैरे हिने झालेल्या भांडणाचा राग मनात धरून जावई कृष्णा यास शिवीगाळ करून मारहाण केली. तर मेव्हुणा बाबू याने लोखंडी सळईने कृष्णाच्या पायावर, हातावर, डोक्यात मारून जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार नदाफ तपास करीत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## क्राईम वृत्त...

### घरात घुसून महिलेला मारहाण; पाचजणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

घरात घुसून महिलेला मारहाण करून चारचाकी वाहनावर दगड घालून नुकसान करणाऱ्या पाचजणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत करूणा महेश काशिद (वय ४२, रा. राणा प्रताप नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन पृथ्वीराज भारत गरड (रा. बॉम्बे पार्क, जुळे सोलापूर) व त्याच्या चार साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ नोव्हेंबर रोजी दोनच्या सुमारास करूणा काशिद यांच्या नणंदेचा मुलगा पृथ्वीराज गरड व त्याच्या चार मित्रांनी करूणा काशिद यांच्या घरात घुसून विनाकारण करुणा यांना शिवीगाळ करून त्यांच्या पतीस, मुलास व मुलीस मारहाण केली. यावेळी काशिद यांना बेल्ट, काठी व स्टील पाईपने मारहाण करून जखमी करण्यात आले. तसेच घरासमोर अंगणात उभ्या असलेल्या एमएच १३ ईसी ५५५९ या कारवर दगड फालून कारच्या काचा फोडून नुकसान करण्यात आले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गावडे पुढील तपास करीत आहेत.

### तरूणाचा फिनेल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

शहरातील विजापूर रोडवरील सय्यद बुखारी दर्गाजवळ राहणाऱ्या तरूणाने अज्ञात कारणावरून फिनेल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. गौस अमिन शेख (वय २७, रा. सय्यद बुखारी दर्गा) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास राहत्या घरी गौस शेख याने अज्ञात कारणावरून फरशी पुसण्याचे फिनाईल प्राशन केले. त्यामुळे गौस यास त्रास होऊ लागल्याने त्यास भाऊ अशरफ शेख याने शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेकोटीतील आगीचा भडका उडाल्याने युवक जखमी

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

शेकोटीतील आगीचा भडका उडाल्याने युवक जखमी झाला. शुभम अंबादास इंजामुरे (वय १९, रा. भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर) असे जखमी युवकाचे नाव आहे. २७ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास शुभम हा दोन तीन मित्रांसमवेत घराच्या बाजूला थंडी वाजत असल्याने शेकोटी करून बसले होते. त्यावेळी हात शेकत असताना अचानक आगीचा भडका उडाल्याने शुभम याचा हात भाजून तो जखमी झाल्याने त्याला उपचारासठी आई सुनिता यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### ॲपे चालकाने केलेल्या मारहाणीत दुचाकीवरील दोघे जखमी

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

आदित्य नगरजवळील साई होम चौकात ॲपे ट्रॉलीने धडक दिल्यानंतर ॲपे चालकाने केलेल्या मारहाणीत दुचाकीवरील दोघे जखमी झाले. प्रतिक तुळजाराम जाधव (वय २५), आदित्य तुळजाराम जाधव (वय २०, दोघे रा. आदित्य नगर, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. २८ नोव्हेंबर रेजी पावणे दोनच्या सुमारास प्रतिक जाधव व आदित्य जाधव हे दोघे दुचाकीवरून साई होम पासून विजापूर रोडकडे जात असताना साई होम चौकात ॲपे ट्रॉलीने रॉंग साईडने येऊन दुचाकीला धडक दिली. यामध्ये दोघे जाधव हे खाली पडल्याने ॲपे चालकास विचारणा केल्यानंतर दोघांना रॉडने व दगडाने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे दोघांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गाय आडवी येऊन दुचाकी घसरल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

गाय आडवी आल्याने दुचाकी घसरल्याने एकजण जखमी झाला. युवराज शिवाजी पवार (वय ४०, रा. प्रतापनगर तांडा, विजापूर रोड, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २७ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास युवराज पवार हे दुचाकीवरून माशाळ वस्ती रोडकडून प्रताप नगर रोडकडे जात असताना समोरून गाय आडवी आल्याने त्यांची दुचाकी घसरून अपघात झाला. या अपघातात युवराज पवार हे गाडीवरून पडून त्यांच्या नाकास, डोक्यास, हाता-पायास जबर मार लागून जखमी झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी भाऊ आतिश पवार याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# 'लाडक्या बहिणी'नीच महायुतीच्या उमेदवारांना तारले

## स्थानिक 'प्रचारयंत्रणा' सक्षम नसल्यानेच महाविकास आघाडीस अपयश

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**



सोलापूर शहर मध्य, उत्तर आणि दक्षिण सोलापूर या तीनही मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यंदा वरिष्ठ पातळीवरून निब्बर नियोजन लावले होते. सत्ताधाऱ्यांबरोबरीने चांगल्या सभाही गाजवल्या मात्र स्थानिक प्रचारयंत्रणा सक्षम नसल्यानेच त्यांच्या पदरी अपयश आल्याची चर्चा सध्या राजकीय गोटातून रंगत आहे. दरम्यान, लाडक्या बहिणीच्या आशीर्वादानेच सत्ताधाऱ्यांना विधानसभा मतदारसंघातील या निवडणुकीत यशस्वी भरारी घेता आल्याचे सर्वश्रुत झाले आहे.

वरीलपैकी शहर दक्षिण आणि शहर मध्य या दोन मतदारसंघासाठी सुरूवातीलाच उमेदवारीवरून महाविकास आघाडीत निर्माण झालेल्या बिघाडीने विधानसभा मतदारसंघातील मतदार चांगलाच कन्फ्युज झाला. त्यातच शहर मध्यसाठी काँग्रेसकडून प्रथम बाबा मिस्त्री यांचे नाव आले...यानंतर त्यांनी दिलेला नकार यातच काँग्रेस पक्षश्रेष्ठींचेही बहुतांश मनोधैर्य खचले. यानंतर महाविकास आघाडीने शहर मध्यसाठी दिलेला उमेदवार तितके मोठे नेटवर्क असलेला नव्हता. चेतन नरोटे यांच्या प्रचारासाठी सुरूवातीला काही दिवस एकही हायटेक नेता आला नाही. यामुळे त्यांच्या जीवाची घालमेल होत होती. ज्यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे या निवडणूक रणांगणात उतरल्या तेव्हा कुठे या उमेदवाराच्या जीवात जीव आला होता. त्यातच माकपाचे आडममास्तर यांनी काँग्रेसवर केलेले विविध आरोपही या उमेदवारास चांगलेच भोवले. काँग्रेस पक्षातून एमआयएममध्ये गेलेले फारूक शाब्दी यांनी स्वतंत्रपणे मुस्लिम समाजाच्या एकगठ्ठा मतांवर आपण सहजपणे निवडूण येण्यासाठी जोरदार फिल्डिंग लावली होती. मात्र शाब्दी यांना मिळणाऱ्या मतांचे काँग्रेस आणि माकपाकडे काही अंशी विभाजन झाले आणि या ठिकाणी भाजपाची वनवे सीट चांगल्या मताधिक्याने आली. यामुळे पहिल्याच प्रयत्नात अन् कमी वयात देवेंद्र कोठे यांना आमदारकी मतदारांनी बहाल केली. या मतदारसंघातही लाडकी बहिण योजनेचा बराच लाभ कोठे यांना झाला. या मतदारसंघात २१ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यामध्ये महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांना १ लाख १० हजार ४२८ तर एमआयएमचे फारूख शाब्दी यांना ६१ हजार ४२६ इतके मतदान झाले तर इतर उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले.



सोलापूर दक्षिण, उत्तर, मध्य

विधानसभा निवडणूक विश्लेषण

### लोकसभेचा ट्रेंड विधानसभेत नाही चालला

लोकसभा निवडणुकीत चाललेला मतांचा ट्रेंड विधानसभा निवडणुकीत ही चालेल ही महाविकास आघाडीची अपेक्षा फेल ठरली. या निवडणुकीत विविध समाजातील मतांचे मोठ्या प्रमाणात ध्रुवीकरण झाले. ही बाब अधोरेखित करण्याजोगी असली तरी या निवडणुकीत सर्वच समाज घटकातील बहुतांश महिला मतदार हे महायुतीच्या सोबत राहिल्याचे सत्य नाकारूनच चालणार नाही. भारतीय जनता पक्षाने या निवडणुकीत सुयोग्य अशी प्रचार यंत्रणा राबविली. त्यांचे काही हायटेक नेते प्रचारासाठी येवून गेले आणि त्यांनी थेट मतदारांशी संवाद साधत आपला लेखाजोखा मांडला होता आणि भविष्यात या योजना कार्यान्वित करावयाच्या असतील तर आमच्या पाठीशी राहण्याची गरजही त्यांनी सांगितली होती. यामुळे लोकसभेचा ट्रेंड या निवडणुकीत चालला नाही तर जवळपास संपूर्ण महिलावर्ग भाजपच्या पाठीशी राहिल्याचे दिसते.

### तीनही मतदारसंघात 'पदयात्रे'चीच नवी थीम

शहर उत्तर, मध्य आणि दक्षिण सोलापूर या तीनही मतदारसंघात मोठ्या सभा झाल्या मात्र सर्वपक्षीय उमेदवारांनी जास्तीचा भर थेट मतदारांच्या गाठीभेटी व कॉर्नर सभा यावर दिला. हीच थीम अपक्षांनीही या निवडणुकीत वापरली होती. मात्र महाविकास आघाडीत झालेली बिघाडी, मैत्रीपूर्ण लढतीच्या नादात विस्कटलेली घडी, नेते एकीकडे तर कार्यकर्ते दुसरीकडेच अशा काही अंशी झालेल्या दुरावस्थेमुळे शहर मध्य आणि शहर दक्षिण मतदारसंघात महाविकास आघाडीची अवस्था बिकट झाली. तर याउलट महेश कोठे यांनी व्यवस्थित प्रचारयंत्रणा राबवूनही आ. देशमुखांची पारंपरिक मते आणि लाडक्या बहिणींची मते मिळविण्यात कोठेही कमी पडले. यामुळे वरील तीनही मतदारसंघात भाजपा उमेदवारांना अपेक्षेपेक्षा जास्तच मताधिक्य मिळाले.

शहर उत्तर मध्ये महाविकास आघाडीकडून शरद पवार गटाचे महेश कोठे यांची जोरदार इंट्री झाली. फॉर्म भरल्याच्या पहिल्या दिवसांपासून त्यांचा प्रचारही सक्षमपणे सुरू होता. प्रचारकाळात त्यांना भाजपातील काही नगरसेवक येवून मिळाल्याने आनंद झाला. इतकेच नाहीतर रोज निघणाऱ्या पदयात्रेत त्यांना नवनवे समाज, मंडळेही पाठिंबा देत असल्याने कोठे यांचे सीट लागणारच असे संकेत मिळत होते; तसे अंदाजही बांधले जात होते. मात्र या ठिकाणीही लाडक्या बहिणींनीच महेश कोठे यांचा टक्का गोठविला आणि त्यांच्यावर पराभवाची नामुष्की आली. यामुळे आ. विजय देशमुख यांना पाचव्यांचा या मतदारसंघावर स्वार होता आले. या मतदारसंघात २१ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यामध्ये महायुतीचे उमेदवार विजयकुमार देशमुख यांना १ लाख ७२ हजार १५ इतकी मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी मविआचे महेश कोठे यांना ६२ हजार ६३२ इतकी मते मिळाली. तर इतर सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले.

दक्षिण मतदारसंघात तर लाडक्या बहिणींनी आमदार सुभाष देशमुख यांना भरभरून मताचे दान दिले. आ. देशमुख यांचे चिरंजीव तथा भाजपा नेते मनिष देशमुख यांनी पहिल्यांदाच केलेले यशस्वी नियोजन व लाडक्या बहिणींच्या आशीर्वादानेच बापूंची तिसऱ्यांदा सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील स्वारी यशस्वी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. हा काँग्रेस पक्षाच्या ताब्यात असणारा पारंपरिक मतदारसंघ मागील दहा वर्षापासून भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आहे. मागील दोन विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत या निवडणुकीत भाजप उमेदवार आ. सुभाष देशमुख यांनी अधिक मते घेत दक्षिणचा गड कायम राखला आहे. या मतदारसंघात २५ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यामध्ये महायुतीचे सुभाष देशमुख यांना १ लाख १६ हजार ९३२ इतके मतदान मिळाले तर त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना (उबाठा) उमेदवार अमर पाटील यांना ३९ हजार ८०५ इतके मतदान झाले. इतर सर्वांचे डिपॉझिट जप्त झाले.

### मविआत दक्षिणमध्ये नाट्यमय घडामोडी

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या वतीने अमर पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यापूर्वीच काँग्रेस पक्षाने या विधानसभा मतदारसंघावर हक्क सांगितला होता. काँग्रेसकडून माजी आ. दिलीप माने यांना उमेदवारीही जाहीर करण्यात आली. मात्र त्यांना पक्षाचा एबी फॉर्म मिळाला नाही. त्यामुळे नाट्यमयरीत्या त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. तर काँग्रेसच्या आशीर्वादाने श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे जेष्ठ संचालक धर्मराज काडादी हे अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात राहिले. या मतदारसंघात काँग्रेस पक्षाकडून माजी नगरसेवक बाबा मिस्त्री हे इच्छुक होते. मात्र दक्षिणमधून काँग्रेसकडून उमेदवारी मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी प्रहार कडून निवडणूक रिंगणात उडी घेतली. या मतदारसंघात २५ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले. निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात माजी आ. दिलीप माने यांनी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दर्शविला. तर मतदानाच्या दिवशी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे यांनीही काँग्रेस धर्मराज काडादी यांच्यासोबत असल्याचे स्पष्ट केले. महाविकास आघाडीत सुरू असलेल्या या सर्व नाट्यमय घडामोडीमुळे सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातही मतदार कन्फ्युज झाला आणि महायुतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ महायुतीचे उमेदवार आ. सुभाष देशमुख यांना झाला.

## विधानसभेच्या निकालानंतर मीम्स, रिल्सची प्रचंड प्रमाणावर देवाण-घेवाण

### सोशल मीडियावर राजकारणाची चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सोशल मीडियाच्या कट्ट्यावरही धुमशान सुरू आहे. महायुतीच्या दणदणीत विजयानंतर समर्थकांचा असलेला विजयोत्सव आणि विरोधकांचे शाब्दिक बाण सुटत आहे.

सर्वसामान्यांमधील आनंद आशा, अपेक्षा, शुभेच्छा यांचाही वर्षाव फेसबुक, एक्स, इन्स्टाग्राम या सोशल मिडिया माध्यमावर होत आहे. विजयी उमेदवार, त्यांचे पक्षकार्यकर्ते विजयी मिरवणुकीचे रिल्स डाऊनलोड करून त्या क्षणांचा पुन्हापुन्हा आनंद घेत आहेत.

शनिवारी संध्याकाळी निकाल लागल्यानंतर लाडकी बहीण लाडाची पासून ते अजितदादांचे गुलाबी जॅकेट यांचे कौतुक होऊ लागले. एकीकडे कौतुक होत असताना, महिलांना पैशाऐवजी चांगल्या योजना देतो, हाताला काम देतो, असे का म्हणाले नाही असा टीकेचा सूरही पोस्टमधून उमटत होता. राज ठाकरे यांच्या अविश्वसनीय या एक्सवरील प्रतिक्रियेनंतर, आता तरी एकत्र या, तुमची एक तरी सीट यायला हवी होती, एकच झेंडा घ्या हाती घ्या, मतभेद विसरून मराठी माणसांसाठी एकत्र या, अशा शेकडो कमेंट नेटकऱ्यांनी दिल्या.

मी पुन्हा येईन या देवेंद्र फडणवीसांच्या आव्हानाचे कौतुक सोशल मीडियावर होत होते. विजयी उमेदवारांसोबत कधीकाळी काढलेल्या जुन्या फोटोंना उजाळा मिळत होता. दणदणीत विजयाचे शिलेदार असलेल्या देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे फोटो, मार्मिक टिप्पणी असलेले फोटो फॉरवर्ड होत होते. सोशल मीडियाच्या कट्टयावर आरोपप्रत्यारोपण, टोमणे कौतुक असा आखाडा नातेवाईक, मित्रमैत्रीणी, सहकारी यांच्या ग्रुप्सवरही रंगला होता.

### मुख्यमंत्री कोण?...

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार याबद्दलची सोशल मीडियावर ही चर्चा जोशात सुरू आहे. एक्सवर यासंदर्भात टीकाटिप्पणी, विश्लेषण होत होते. इन्स्टावरच्या हलक्या फुलक्या रिल्सपेक्षा इथे गंभीर चर्चा सुरु होती. मोजक्या शब्दांत नेमके मतप्रदर्शन केले जात होते. तर फेसबुकच्या वॉलवर पैजा लागत होत्या. या निकालाचे आपापल्या परीने अर्थ लावण्याचा प्रयत्न सामान्यांकडून केला जात होता. लाइक, कमेंटस्, फॉरवर्डचा हा माहौल मतदानाच्या आदल्या दिवसापासून रंगायला सुरवात झाली. सरकार स्थापनेपर्यंत सोशल कट्ट्यावरचा हा माहौल रंगत जाणार याची साक्ष नेटकरी देत आहेत.

### राजकीय पक्षांनीही घेतली मदत...

निवडणुका जाहीर होण्यापूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचाराला वेग आला होता. राजकीय पक्ष, उमेदवारांनीही प्रचारासाठी मदत घेतली. जाहीर प्रचार संपल्यानंतर छुप्या प्रचाराला गती आली होती. कार्यकत्यांनीप्रचाराची धग कायम ठेवली होती.

# 'पनाश'च्या बिल्डर-डेव्हलपर, आर्किटेक्ट यांना महापालिकेची नोटीस


## विजापूर रोडवरील १७ मजली बांधकामात अनियमितता; महिनाभरात खुलासा करा, अन्यथा परवानगी होणार रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

विजापूर रोडवरील तब्बल १७ मजली पनाश टावर इमारती संदर्भात तपासणीत व अहवालाद्वारे विविध अनियमितता संबंधीच्या बाबी आढळून आल्याने अखेर महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाच्या वतीने उपसंचालक नगर रचना यांच्या सहीने या इमारतीचे बिल्डर डेव्हलपर आणि आर्किटेक्ट इंजिनियर यांना नोटीस पाठवली आहे. कागदपत्रानीशी विविध बाबींचा खुलासा महिनाभरात करावा अन्यथा परवानगी रद्द करण्यात येईल असे या नोटीसद्वारे स्पष्ट केले आहे

विजापूर रोडवरील तब्बल १७ मजली पनाश टावर इमारती संदर्भातील प्रकरण ऐरणीवर आले आहे. सोलापूर महापालिकेची दिशाभूल करणारी कागदपत्रे, मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नावे बांधकाम परवाना, विविध करारांचा भंग, महापालिका आणि टॉवरमध्ये मालकी हक्क प्राप्त होणाऱ्या प्लॉट धारकांची खुली जागा आणि झालेला कायद्याचा भंग, महापालिकेची व्यावसायिक जागा देण्याच्या करारावरील झालेली फसवणूक, टॉवरच्या मजबुतीचे प्रमाणपत्र नियमबाह्य या व विविध अनेक प्रकार यापूर्वी चव्हाट्यावर आले आहेत. या प्रकाराबाबत महापालिकेकडे विविध तक्रारी प्राप्त झाले आहेत. बांधकाम परवानगीतील अनियमित ते बाबत आलेल्या तक्रारीवरून महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार केलेल्या तपासणीत या प्रकरणी बेकायदेशीर व अनियमित बाबी आढळल्या आहेत, असे महापालिका बांधकाम परवानगी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रकरणात बिल्डर डेव्हलपर यांना देण्यात आलेल्या नोटीसीमध्ये विविध ६ मुद्दे नमूद करण्यात आले आहेत. यामध्ये दि. २ मार्च २०२१ रोजी सादर केलेल्या फेर प्रस्तावामध्ये प्रस्तावित नकाशावर सर्व मिळकतदारांची स्वाक्षरी व संमती पत्र घेणे युडीसीपीआर मध्ये नियमानुसार बंधनकारक असताना याची पूर्तता केलेली नाही. ही मुळ मंजूर झालेल्या ९ मजल्याच्या बांधकाम



परवानगी प्रस्तावामध्ये स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट सादर केल्याचे संचिकेमध्ये आढळत होत नाही.

भूखंडाचे क्षेत्र २० हजार चौरस मीटर व त्यापेक्षा जास्त असल्यास युडीसीपीआर नुसार बांधकामास केंद्र शासनाचे इन्व्हायरोमेंटल क्लिअरन्स सर्टिफिकेट सादर करणे बंधनकारक असताना ते केलेले नाही. या प्रकरणात युडीसीपीआर नियमांनुसार प्रीमियम शुल्क इंस्टॉलमेंट द्वारे भरणा करण्यास महापालिकेकडून कळविण्यात आलेले असताना आपण महापालिकेकडे ही रक्कम जमा केली नाही तसेच उर्वरित हप्त्याची रक्कम व त्यावरील व्याज येणे बाकी आहे. शासन निर्णयानुसार विकासकाने ग्राहकांचे पूर्ण मुद्रांक शुल्क स्वतः भरणार असल्याबाबत हमीपत्र लिहून देऊन प्रीमियम विकास शुल्क रकमेत ५० टक्के प्रमाणे सवलत घेतलेली आहे. तथापि तसे झालेले दिसत नाही. याबाबत फ्लॅट धारकांनी फसवणूक केल्या संदर्भात तक्रार केली आहे. याचबरोबर बांधकाम परवानगीची मुदत संपुष्टात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयात दावा चालू असून न्यायालयाचे निकाल आणि आदेश प्राप्त होईपर्यंत जागेवर चालू असलेले बांधकाम तात्काळ थांबविण्यात यावे असे आदेश असताना देखील महापालिका अधिकाऱ्यांच्या तपासणीत १७ व्या मजल्यावर वीट बांधकाम सुरू असल्याचे आढळून आले आहे. यामुळे आपली परवानगी रद्द का करू नये अशी नोटीस महापालिकेने बजावली असून एक महिन्यात याचा खुलासा करणे बंधनकारक आहे. मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे नोटिसीत नमूद केले आहे.

पनाश टॉवर इमारतीच्या अनुषंगाने महापालिकेकडे प्राप्त तक्रारींची सखोल चौकशी करण्यात आली. यामध्ये अनेक बेकायदेशीर बाबी आणि अनियमितता आढळून आली. यासाठी महापालिका नगर रचना खाते अंतर्गत बांधकाम परवाना विभागाने या इमारतीचे परवानाधारक आर्किटेक्ट- इंजिनियर यांनाही पुढील कार्यवाही आणि कारवाईच्या फेऱ्यात घेतल्याचे त्यांना दिलेल्या नोटिसीवरून पुढे आले आहे. विविध चार मुद्देनिहाय त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

### महापालिकेची दिशाभूल करून सुधारित बांधकाम परवानगी मिळवल्याचा आरोप

या इमारतीचे परवानाधारक आर्किटेक्ट- इंजिनियर यांनाही यांनाही कारवाईच्या फेऱ्यात घेतले आहे. प्रस्ताव सादर करताना प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सर्व तांत्रिक बाबी तपासून आणि सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी असताना बेजबाबदारपणे चुकीचा प्रस्ताव सादर करून महापालिकेची दिशाभूल करून सुधारित बांधकाम परवानगी मिळवल्याचे दिसून येत आहे. याबाबत आपले महापालिकेतील परवाना रद्द का करण्यात येऊ नये तसेच कौन्सिल ऑफ आर्किटेक्ट यांच्याकडे आपला परवाना काळ्या यादीत समाविष्ट करण्यासाठी का सांगण्यात येऊ नये, अशी नोटीस दिली असून त्याचा खुलासा महिनाभरात मागविला आहे.

### स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळत नाही

वेळोवेळी बांधकाम परवानगी रिवाईज करताना १७ मजल्याचे बांधकाम वाढवताना कोणत्याही प्रकारचे विहित नमुन्यात स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळत नाही. ही बाब अतिशय गंभीर असून भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास याबाबत सर्वस्वी जबाबदार आपणच राहणार असल्याचे बिल्डर यांना सांगण्यात आले असून याचा खुलासा मागविला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५८

**नाईकवे स्तुति वर्णिता थोरीव ।**
**होतो माझा जीव कासावीस ।।**

आत्मीक समाधान लाभावे म्हणून धडपड करणाऱ्यांपेक्षा मोठेपण मिळावे म्हणून धडपड करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. मोठेपणात आत्मीक समाधान नसते, पण आत्मीक समाधान खरे मोठेपण असते. हे सत्य असले तरीही माणसाची धडपड मोठेपणासाठीच चालू असते. लोकांनी आपणाला मोठे म्हणावे, आपली स्तुती करावी, आपला मान-सन्मान करावा, असे अनेकांना वाटत असते. एखाद्या व्यासपीठावर किंवा चार चौघात कोणी स्तुती करू लागला म्हणजे ज्याची स्तुती चालू आहे त्याचे वजन वाढू लागते, त्याचबरोबर स्तुतीने तो फुगू लागतो. खरे म्हणजे स्तुती हे वजन वाढविण्याचे किंवा फुगविण्याचे साधन नव्हे. तर हे माणसाच्या मनात ईर्षा, द्वेष, अहंकार, मीपणा, मत्सर, अभिमान आदीला खतपाणी घालणारे हे साधन आहे. या साधनाचा खरा परिचय होणारा माणूस या साधनाला एक प्रकारचे शस्त्र समजतो. आपणाला मानवतेपासून दूर नेणारी ही स्तुती त्याला ऐकवत नाही. आपली कोणी स्तुती करू लागला तर माझा जीव कासावीस होतो. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**नाइकवे स्तुती वर्णिता थोरीव ।**
**होतो माझा जीव कासावीस।।**



जगद्गुरुंचे हे म्हणणे अत्यंत चांगला परिणाम करणारे आहे. स्तुतीस, मोठेपणास पात्र असतांनाही आपली कोणी स्तुती करू नये, असे म्हणणे ही साधी गोष्ट नाही. पण ज्यांच्यापुढे मोठेपणा ठेंगणा पडतो किंवा ज्याच्यापुढे स्तुती आपली मान खाली झुकवते, अशा महात्म्यांना स्तुतीचे, मोठेपणाचे कांही वाटण्याचे कारणच नाही. एकीकडे स्तुती, मोठेपण हे आपले महत्व वाढावे म्हणून संत, महात्म्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतात. तर दुसरीकडे संसारात अडकलेले अनेक जीव स्वत:चे मोठेपण वाढावे म्हणून स्तुती व मोठेपणाच्या मागे लागलेले असतात. आपण अशी अनेक व्यासपीठ पाहतो की जेथे उपस्थितांना मार्गदर्शन होण्याऐवजी व्याख्याते, संयोजक व्यासपीठावर बसलेल्या काहींचे कौतुकच करीत असतात. व्यासपीठावर बसलेल्यांना बरे वाटावे म्हणून त्यांची स्तुती करण्यापेक्षा उपस्थितांना खरे वाटावे म्हणून बोलणे जास्त योग्य असते. पण असे अनेक ठिकाणी होत नाही. पूर्वीच्या काळातील भाटांचे स्थान विज्ञान युगातही कायम आहे. कांही मंडळी तर जाणून बुजून अशा भाटांना सोबत ठेवत असतात. चांगले लोक मला चांगले, मोठे म्हणा म्हणून कधीच प्रयत्न करीत नाहीत. पण वाईट किंवा अपात्र लोक मोठेपणासाठी, स्तुतीसाठी जाणून-बुजून प्रयत्न करीत असतात. लोकांनी चांगले म्हणावे स्तुती करावी, मोठेपण द्यावे म्हणून दिखाऊ वर्तन करण्यापेक्षा आपण स्वत:च्या नजरेत स्वत:ला योग्य ते स्थान देऊ शकण्यासाठी योग्य ते वर्तन करायला हवे. थोडक्यात आपली धडपड ही मोठेपणासाठी न होता चांगुलपणासाठी व्हावी.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : शुक्रवार** | **दिनविशेष -** |
| **दि. २९ नोव्हेंबर २०२४** | **शिवरात्री** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **चांगला दिवस** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - कार्तिक** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. त्रयोदशी (०८.३९)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - स्वाती (१०.१७)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - शोभन (१६.३२)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - विष्टि (२१.३८)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# लालपरीला दोन कोटी अकरा लाखांचे उत्पन्न

## सोलापूर विभागातील ५३३ एसटी बसेसचा विधानसभा निवडणुकीसाठी झाला वापर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत ५३३ एसटी बसेस राखीव करण्यात आल्या होत्या. या बस गाड्यांच्या प्रवासी भाड्यापोटी महामंडळाला शासनाकडून दोन कोटी दहा लाख ८९ हजार २३० रुपये मिळणार असल्याची माहिती सोलापूर एसटी विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी दिली आहे. यामुळे एसटीच्या उत्पन्नात कोटींची भर पडणार आहे. विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी (दि. २०) मतदान प्रक्रिया पार पडली. निवडणूक कर्तव्यावरील संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना विधानसभा मतदारसंघात नेऊन सोडणे व मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर परत त्यांना त्यांच्या विधानसभा मतदारसंघात घेऊन येण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) सोलापूर विभागाकडून ५३३ एसटीची व्यवस्था केली होती. बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅड व इतर साहित्याची ने-आण करणे, तसेच कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर पोहोचवून सर्व साहित्यसह परत घेऊन येण्यासाठी एसटी बसेसची व्यवस्था केली होती.



याप्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बस उपलब्ध करून देण्याचे नियोजन एसटी महामंडळाकडून करण्यात आले होते. यासाठी सोलापूरसह अन्य आठ आगारातून तसेच विभागीय कार्यालय येथून दोन दिवसांसाठी राखीव बसेस ठेवण्यात आल्या होत्या. निवडणूक कामकाजासाठी एसटीच्या बस सर्व राखीव ठेवल्याने नियमित प्रवासी वाहतूक प्रभावित झाली होती.

दरम्यान निवडणूक आटोपल्यानंतर सर्वच आगारातील प्रवासी वाहतूक सुरळीत झाली आहे. पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्याकडे होमगार्ड कर्नाटक राज्य येथून ४२ गाड्यांची मागणी केली होती. यातून ४० लाखांचे तर तर पोलिस अंमलदार वाहतूक सोलापूर जिल्हा यांनी २३ बसेसची मागणी केली होती यातून सहा लाख ४८ हजार रुपये उत्पन्न मिळाले आहे.

### दोन दिवस प्रवाशांची गैरसोय

विधानसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेसाठी सोलापूर विभागातून एसटी बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. या दरम्यान १९ आणि २० नोव्हेंबर रोजी एसटी बसेस राखीव असल्याने प्रवाशांची थोडीफार गैरसोय झाल्याचे पाहावयास मिळाले.

### निवडणूक कर्तव्यावरील माध्यमातून प्राप्त होणार उत्पन्न

विधानसभा निवडणुकीसाठी दोन दिवसांसाठी सोलापूर विभागातील नऊ आगारातील जवळपास ४६८ आणि विभागीय कार्यालय येथील ६५ अशा एकूण ५३३ बसेस आरक्षित करण्यात आल्या होत्या. यातून सोलापूर विभागाला अंदाजे दोन कोटी दहा लाख ८९ हजार २३० रुपयांची उत्पन्न मिळणार आहे.

**-अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक**
**सोलापूर एसटी विभाग**

### मतदासंघातील बसेस मागणी व उत्पन्न

| मतदारसंघ | बसची मागणी | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| सोलापूर | २२ | ८,८०,००० |
| **शहर उत्तर** | | |
| सोलापूर | १९ | ७,६०,००० |
| **शहर मध्य** | | |
| सोलापूर | ३८ | १५,२०,००० |
| **शहर दक्षिण** | | |
| मोहोळ | ४९ | १६,८४,००० |
| पंढरपूर | ५० | १३,२६,००० |
| अक्कलकोट | ६३ | २१,००,००० |
| करमाळा | ४१ | १०,८७,३२० |
| माढा | ४९ | १९,४५,००० |
| बार्शी | ४७ | १८,५६,९१० |
| सांगोला | ४४ | १७,६०,००० |
| माळशिरस | ४६ | १५,२२,००० |
| **होमगार्ड** | | |
| कर्नाटक राज्य | ४२ | ४०,००,००० |
| **पोलीस अमंलदार** | | |
| वाहतूक सोलापूर | २३ | ६,४८,००० |
| **एकुण** | **५३३** | **२,१०,८९,२३०** |



## बेवारस वाहनांची ओळख पटवून वाहने घेऊन जाण्याचे सोलापूर तालुका पोलिसांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**

सोलापूर तालुका पोलिस ठाण्याच्या आवारातील बेवारस अवस्थेत पडलेल्या चारचाकी व दुचाकी वाहनांची ओळख पटवून वाहनाचालकांनी त्यांची वाहने घेऊन जाण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

सोलापूर तालुका पोलिस ठाण्याच्या आवारात ४ चारचाकी व ६७ दुचाकी वाहने गेल्या अनेक महिन्यांपासून पडून आहेत. या वाहनांवर अद्यापपर्यंत कुणीही मालकी हक्क सांगितलेला नाही. त्यामुळे ज्या कोणी नागरीकांची चारचाकी व दुचाकी वाहने असतील त्यांनी त्यांच्या मालकी हक्काचे कागदपत्रे सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात आणून देऊन त्यांची वाहने परत घेऊन जावीत. पुढील १५ दिवसापर्यंत ही बेवारस वाहने पोलिस ठाण्याच्या आवारात ठेवण्यात आलेली असून त्यानंतर त्या वाहनांचे कोणीही मालक नाही असे गृहीत धरून योग्य त्या कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी सांगितले.

## थकीत कर्ज एकरकमी भरणा केल्यास व्याजात ५० टक्के सवलत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी परतावा योजना दि.३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. महामंडळाच्या सर्व योजनेतील थकबाकीदार लाभार्थींनी सदरच्या योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे,असे आवाहन ओबीसी महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

जिल्ह्यात महामंडळाच्या कर्ज परतफेडीची मुदत संपलेले अनेक लाभार्थी असून त्यांच्याकडून कर्ज वसुलीसाठी सर्व वैधानिक प्रयत्न महामंडळाकडून करण्यात येत आहेत. थकीत कर्ज प्रकरणात वसुली व्हावी या करिता संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एकरक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलतीची एकरकमी परतावा योजनेस संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयास प्रत्यक्ष भेट द्यावी.



## सिव्हिल इंजिनियर्सतर्फे १५० बांधकाम कामगारांची तपासणी, औषधे वाटप

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सतर्फे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात १५० बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करुन औषधे वाटप करण्यात आली. महाहाऊसिंगतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मजरेवाडी येथे ३८६७ घरांच्या बांधणीचा प्रकल्प युनिटी मल्टीकॉन प्रा. लि. तर्फे सुरू आहे.

या प्रकल्पावरील कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याकरिता शेठ सखाराम नेमचंद जैन आयुर्वेद महाविद्यालयाचे युनिटी मल्टीकॉन्स प्रा. लि. महाहाऊसिंग, मे. इंग्रेन यांचे सहकार्य लाभले. शेठ सखाराम नेमचंद जैन आयुर्वेद महाविद्यालयाच्या १४ डॉक्टरांनी बांधकाम कामगारांची तपासणी करून त्यांना औषधे दिली. याप्रसंगी असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सचे अध्यक्ष प्रशांत मोरे, सचिव मनोहर लोमटे, उपाध्यक्ष भगवान जाधव, खजिनदार संतोषकुमार बायस, माजी अध्यक्ष अमोल मेहता, इफ्तेकार नदाफ, सुनील फुरडे, किरण कदम, विनायक जोशी, शेठ सखाराम नेमचंद जैन आयुर्वेद महाविद्यालयाचे डॉ. अमोल वेल्हाळ, डॉ. हादीमनी, डॉ. रेणुका कोल्हे, डॉ. सोनम तारल, डॉ. योगिता कसाने, प्राचार्या डॉ. वीणा जावळे, अनुप दोशी, युनिटी मल्टीकॉन्सचे दानिश मौलवी, झिशान मोतीवाला, इंग्रेनचे अस्लम मुल्ला आदी उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या मायक्रोप्लॉनिंगमुळे निर्भिड अन् शांततेत निवडणुका

**संपूर्ण राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान झाले तर दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडली. दिनांक १५ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया जिल्ह्यात अत्यंत निर्भीड व शांततामय वातावरणात पार पडली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कुशल नेतृत्वाखाली सर्व ११ विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ही प्रक्रिया यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली, ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात जवळपास १८ हजार अधिकारी कर्मचारी यांनी आपले योगदान देऊन लोकशाहीचा हा उत्सव थाटात पार पाडला.**

निवडणूक आयोगाने अधिसूचना जाहीर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने २४ तास, ४८ तास व ७२ तासात जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागातील सर्व राजकीय होर्डिंग पोस्टर बॅनर्स हटवले. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख म्हणून संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम केले. जिल्हास्तरीय सर्व नोडल अधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण अत्यंत चांगले देण्यात आले, यासाठी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

मतदार जनजागृती करण्यासाठी स्वीप अंतर्गत संपूर्ण जिल्हाभरात अत्यंत मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेण्यात आले. यासाठी स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर व जिल्हा ग्रामीण विकास



यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनी उत्कृष्ट नियोजन करून ज्या ठिकाणी लोकसभा निवडणुकांमध्ये कमी मतदान झालेले आहे अशा ठिकाणीही मतदार जागृती मोहीम राबवली. शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जनजागृती मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले. संपूर्ण जिल्हाभरात अत्यंत चोखपणे मतदार जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आल्यामुळे सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये ६४.५९ टक्के मतदान झालेले होते तर यावर्षी २० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्यात ६७.७२% मतदान झाले मतदानाच्या एकूण टक्केवारी जवळपास तीन टक्के वाढलेली दिसून आली.

विधानसभेला लोकसभा निवडणूक २०२४ पेक्षा अधिक मतदान केंद्राची संख्या झाली. विधानसभेला एकूण ११ विधानसभा मतदारसंघात ३ हजार ७३८ मतदान केंद्रे होती. या सर्व मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार किमान पायाभूत सोयीसुविधाचे निर्मिती केलेली होती. मतदाराला मतदान केंद्रावर येऊन सहज मतदान करता येईल या पद्धतीने मतदान केंद्राची निवड करण्यात आलेली होती तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या होत्या. एकूण मतदान केंद्राच्या जवळपास ६० टक्के म्हणजेच २ हजार ३०५ मतदान केंद्रावर वेब कास्टिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली होती. या सुविधेमुळे संबंधित मतदान केंद्रावर कशा पद्धतीने मतदान केंद्राध्यक्ष व केंद्र अधिकारी मतदानाची प्रक्रिया राबवत आहेत याची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षात जिल्हाधिकारी स्वतः पहात होते व आवश्यक त्या ठिकाणी निर्देश देत होते. सी-व्हिजील कक्षात निवडणुकीच्या अनुषंगाने आलेल्या तक्रारीवर कक्षाच्या वतीने वेळेत तक्रारी संबंधितांपर्यंत पोहोचवून त्याचा निपटारा करण्यात आला. या कक्षाचे नोडल अधिकारी आशिष लोकरे यासाठी सातत्याने लक्ष ठेवून होते. जवळपास सर्व विधानसभा मतदारसंघात मतमोजणी प्रक्रिया वेळेत पूर्ण होऊन विजयी उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निरीक्षक यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र दिले. लोकसभा निवडणूक २०२४ प्रमाणेच जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत मतदान व मतमोजणी सह सर्व निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पाडल्यामुळे जिल्हा प्रशासनाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

**सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर**

### पोलीस सुरक्षा व्यवस्था

मतमोजणी ही शांततेत व सुरळीत पार पडावी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी संपूर्ण सुरक्षा व्यवस्था, आग प्रतिबंधक सुविधा यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. प्रत्येक मतमोजणी कक्षात, पुरेसा वीज पुरवठा व जनरेटर बॅकअप सुविधा देण्यात आली होती. मतमोजणी कक्ष आणि परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले होते. चोख सुरक्षा व्यवस्थेमध्ये मतमोजणी निर्विघ्नपणे पार पडले.

### मतमोजणी केंद्रावर राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती

मतमोजणी कामाकरिता राखीव अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच स्ट्राँग रूममधून मतमोजणी कक्षामध्ये मतदान यंत्र पोहोचविण्यासाठी कलर कोडींग केलेले कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मतदान यंत्र नेण्यात येत होते. मतदानाच्या दिवशी जिल्हास्तरीय माध्यम कक्ष जिल्हा नियोजन भवन येथून सुरू होते तर प्रत्यक्ष मतमोजणी दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या व्हीआयपी सभागृह येथून जिल्हास्तरीय माध्यम कक्षाचे कामकाज सुरू होते. अकरा विधानसभाच्या माध्यम कक्षाच्या नोडल अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन पत्रकारांना देण्यात येत होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### वागदरी जिल्हा परिषद शाळेत महात्मा फुलेंचा स्मृतीदिन साजरा

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी बाबासाहेब बनसोडे होते. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन रेखा सोनकवडे यांनी केले. जोतीराव गोविंदराव फुले महात्मा ज्योतिबा फुले नावाने लोकप्रिय होते. महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जातीविरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. सामाजिक प्रबोधन अस्पृश्यता व जातीव्यवस्थेचे निर्मूलन आणि स्त्रियांना व मागास जातींच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी केले. शैक्षणिक क्रांतीचे जनक क्रांतिसूर्य महात्मा फुले स्त्रीशिक्षणाचे प्रणेते, समतेचे प्रतीक आणि समाज परिवर्तनाचे आधारस्तंभ, समाजातील अंधकार हटवण्यासाठी आपले सर्वस्व जीवन आत्मसमर्पित करणारे ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. स्त्रीशिक्षणाचा पाया रचणारे दुर्लक्षित समाजासाठी लढणारे एक असामान्य व्यक्तिमत्व होते. सामाजिक क्रांतीची मशाल पेटवणारे थोर समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी देशात सर्वप्रथम महिला शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, असे मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी सांगितले. रत्नाबाई रेऊरे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्याविषयी माहिती सांगितली. याप्रसंगी अनुसया कलशेट्टी, तोलन बागवान, रत्नाबाई रेऊरे, मनिषा कुणाले, अर्चना गिरी, कविता फड उपस्थित होते.



### कुर्डूवाडी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागातर्फे संविधान दिन साजरा

**कुर्डूवाडी, दि. २८ नोव्हेंबर-**

संविधान दिना निमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोस हार घालून संविधान दिन साजरा केला. याप्रसंगी जनता सहकारी बँकेचे चेअरमन अर्जुनराव बागल, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष दत्ताजी गवळी, काँग्रेस अध्यक्ष फिरोज खान, काँग्रेस अल्पसंख्यक शहराध्यक्ष हमीद शिकलकर, संतोष गवळी, शाबिर शिकलकर, किशोर किर्वे, मोईन मुलाणी, एजाज मुलाणी, शिवाजी चौधरी, राजू टोणपे, ऋतिक त्रिंबके, क्षीरसागर, राम पाले व कार्यकर्ते उपस्थीत होते. शेवटी संयोजक हमीद शिकलकर यांनी आभार मानले.

### मोहोळमध्ये शहीद जवानांना अभिवादन

**मोहोळ, दि. २८ नोव्हेंबर-**

मुबंई येथे २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्यात शहीद झालेल्या वीर जवानांच्या प्रतिमेला मोहोळचे पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी वाहतूक पोलीस सिद्धेश्वर बाबर, रोडे, दराडे, नेमाजी, हिंदुराव देशमुख, श्रीरंग लाळे, संतोष गायकवाड, डॉ. प्रमोद पाटील, शिवरत्न गायकवाड, नसीर मोमीन, संजय शिंदे, शाहूराजे देशमुख, सोमनाथ पवार, विजय गायकवाड, पत्रकार भारत नाईक, सुहास आखाडे, सोमा पोळ, स्वप्निल शिंदे,संतोष महानवर, गणेश पासले, रोहित गायकवाड, नागेश धोत्रे, संदीप गायकवाड, विजय बरकडे, वैभव मस्के, वैभव गायकवाड, प्रवीण गायकवाड, रविराज मस्के, राज खोत, वैभव सरवले, केदार स्वामी, प्रदीप माने, मनोदिप काळे, रईस शेख, ईश्वर कांबळे, सोमनाथ देशमुख, संदीप गायकवाड, सोमा गायकवाड, रविराज मस्के, रोहित गायकवाड, अक्षय भोसले, गणेश शिंदे, दादा क्षीरसागर, संकेत शिंदे, दिनेश इंगळे, गणेश शिंदे, बंडू मोरे, प्रदीप माने उपस्थित होते.

### मंगळवेढा शहरातून एक इसम बेपत्ता

**मंगळवेढा, दि. २८ नोव्हेंबर-**

मंगळवेढा शहरातील दत्तू गल्लीमधून रमेश विठ्ठल दत्तू (वय ४७) हा इसम अचानक बेपत्ता झाला असल्याची तक्रार त्यांच्या भावांनी पोलिसात दिली असून पोलिस त्या इसमाचा कसून शोध घेत आहेत. बेपत्ता इसम रमेश दत्तू (वय ४७) हा मजुरीचे काम करीत असून त्याला दारूचे व्यसन होते.दि.४ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.०० च्या दरम्यान दत्तू गल्ली येथे खबर देणार्या भावास तो दिसला होता,खबर देणार्याने त्यास घरी चल म्हणाल्यानंतर मी नंतर येतो असे तो म्हणून तेथेच थांबला.रात्री उशीरापर्यंत कुटुंबियांनी वाट पाहिली मात्र तो घरी आलाच नाही.मंगळवेढा शहरात व नातेवाईक आदी ठिकाणी त्याचा शोध घेतला मात्र तो मिळून आला नाही.त्याचे वर्णन - अंगाने सडपातळ,रंग सावळा,नाक सरळ,चेहरा उभट,उंची ५ फुट,अंगात नेसणेस भगवा शर्ट व काळी पँट अशा वर्णनाचा इसम कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### मंगळवेढा शहर परिसरातून २५ वर्षीय तरुणी बेपत्ता

**मंगळवेढा, दि. २८ नोव्हेंबर-**

मंगळवेढा शहरातील नागणेवाडी परिसरातून एक २५ वर्षीय तरुणी अचानक राहते घरातून बेपत्ता झाली असल्याची तक्रार मंगळवेढा पोलिसात त्यांच्या कुटुंबियांनी दाखल केली असून पोलिस त्या तरूणीचा कसून शोध घेत आहेत. २४ रोजी सकाळी ११.०० वा. सदर राहते घरातून अचानक ती तरूणी बेपत्ता झाली असून तीचे वर्णन पुढीलप्रमाणे-रंग सावळा,उंची ५,३ इंच,अंगात नेसणेस पिंक रंगाची साडी,शरीर मध्यम,शिक्षण इयत्ता ९,मराठी,हिंदी,कन्नड भाषा बोलते अशा वर्णनाची तरुणी कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढयाचे पोलिस हवालदार कांबळे यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# अक्कलकोटकरांना भरली हुडहुडी

## थंडी, तापाच्या रुग्णांमध्ये वाढ; रात्री ८ नंतर रस्ते होताहेत निर्मनुष्य

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ नोव्हेंबर-**

अक्कलकोट शहर व तालुक्यात सर्वत्र गेल्या चार पाच दिवसापासून हुडहुडी थंडीचा कडाका वाढल्यामुळे नागरिक व महिला गारठुन गेले आहेत. लहान मुलांसह वयोवृध्द नागरिक, महिलानां हुडहुडी थंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. या वाढत्या हुडहुडीने लहान मुले-मुली आजारी पडत आहेत. सध्या दवाखान्यात थंडी तापाचे रुग्ण वाढले आहेत.

यंदाच्या वर्षी परतीच्या पावसाने चांगली हजेरी लावली होती. उजनीचे पाणी कुरनूर धरणात आल्याने धरण शंभर टक्के भरले आहे. बोरी नदीवरील सर्व आठ बंधारे पूर्णपणे भरले आहे. यामुळे थंडीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. दररोज सायंकाळी हवेत गारठा तयार होऊन हुडहुडी सुटत आहे. जसजसे रात्री होत जाते, तसतशी थंडीचा जोर वाढत जात आहे. दुकानदार आपली दुकाने लवकर बंद करून घर गाठत आहेत. रात्री आठ-नऊनंतरच रस्ते ुळे सायंकाळी, व पहाटेच्या सुमारास निर्मनुष्य होत आहेत. वाढत्या थंडीम फिरणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे.



> चार दिवसांतील तापमान १६ अंशापर्यंत खाली आले असून अजून थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता आहे. रविवार कमाल ३१ किमान १७, सोमवार कमाल ३१ किमान १८, मंगळवार कमाल ३२ किमान १७, बुधवार कमाल ३० किमान १६ इतकी आहे. यासाठी लहान मुलांसह वयोवृध्द नागरिकानी विशेष काळजी घ्यावी. सकाळी सूर्यप्रकाश पडल्यावर बाहेर पडावी आणि संध्याकाळी सूर्यास्तच्या आत घरी परतावे.
>
> **- डॉ. अशोक राठोड,** वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, अक्कलकोट

> सदृढ शरीराला व्यायामाची गरज आहे. हिवाळ्यात या थंडीच्या दिवसातच वर्षभराची ऊर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे गरजेचे असते म्हणून सुंदर व आनंदी जीवनासाठी सर्वांनी व्यायाम करणे गरजेचे आहे.
>
> **- गुरुलिंग उर्फ गुंडूअण्णा येळमेली,**
> शाखा प्रमुख, आरएसएस प्रभात

सध्या सर्वजण थंडीला तोंड देण्यासाठी स्वेटर, मफलर, कानटोप्या, पायमोज, हँडग्लोज, ओढणी, शाल आदीचा वापर करीत आहेत. बाजारात या वस्तूंना मागणी वाढली आहे. पहाटे सहा वाजल्यापासून सुरु असलेल्या शिकवणी वर्गांना जाणाऱ्या मुला-मुलींना थंडीचा जास्त त्रास भासत आहे. शेतकऱ्यांना पहाटे शेतातील भाजीपाला बाजारात आणताना या भयंकर थंडीच्या त्रासाला तोंड द्यावे लागत आहे. खेडेगावातील ग्रामीण विद्यार्थ्यांना पहाटे उठून एसटी बस व जीप, मोटारसायकलने शाळा कॉलेजला ये-जा करीत असताना थंडीच्या त्रासाला तोंड द्यावे लागत आहे. या सर्वांनी आपापल्या परिसरामध्ये शेकोटी पेटवून थंडीवर मात करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र या हुडहुडी भरणाऱ्या थंडीतही पोलिस भरतीसाठी सराव करणाऱ्या तरुण-तरुणी घाम गाळत आहेत. या वातावरणाचा फायदा घेत येथील फतेसिंहराजे मैदान, विठ्ठल मंदिर, स्वामी समर्थ महाराज पॉलिटेक्निक कॉलेज मैदान, शिवपुरी रोड, बॅगेहळ्ळी रोड, खेडगी कॉलेज रस्ता, हन्नूर रस्ता, बासलेगांव रस्ता आदी भागात शुध्द हवेत फिरायला येऊन प्राणायायम, योगासने, सूर्यनमस्कार, जॉगिंग, हास्याचे फवारे आदु व्यायाम करुन शरीर तंदुरुस्त करुन घेत असल्याचे चित्र दिसत आहे.

## झाडे तोडल्याच्या कारणावरून एकास काठीने बेदम मारहाण

### खडगी शिवारातील घटना; पाच जणांविरूध्द गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २८ नोव्हेंबर-**

खडकी शिवारातील शेतात जाणार्या रस्त्यावरील झाडे तोडल्याच्या कारणावरून एका ३८ वर्षीय तरूणास काठीने बेदम मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी बापू दादा मेटकरी, आकाश येशू मेटकरी, मच्छिंद्र तुकाराम मेटकरी, भामाबाई अंबादास वाघमोडे, तुकाराम सुखदेव मेटकरी (रा. खडकी) या पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी समाधान मेटकरी (वय ३८, रा. मेटकरवाडी-पाटखळ) यांचे खडकी शिवारात ५ एकर १६ गुंठे शेतजमीन असून फिर्यादीच्या शेतास जाणाऱ्या समाईक रस्त्यावरील झाडे तोडण्यासाठी पंढरपूर वनविभागाची परवानगी घेऊन २५ रोजी सकाळी ११.०० वा. फिर्यादी व छाया उत्तम लवटे, ज्ञानेश्वर उत्तम लवटे आदीजण झाडे तोडत होते. सायंकाळी ४ वा. आरोपीने येऊन तुम्ही झाडे का तोडत आहात असे विचारल्यावर फिर्यादीने आम्ही वनविभागाची झाडे तोडण्याचे पत्र घेऊन आलो आहोत, तुम्हाला दाखवतो असे म्हणताच आरोपीने आम्हाला परवानगीचे पत्र दाखवू नका, तुमच्याकडेच बघतो असे म्हणून शिवीगाळी करीत निघून गेले. पुन्हा सायंकाळी ५ वा. आरोपीनी येऊन आता यांना सोडायचे नाही असे म्हणून लाथाबुक्क्यांनी व काठीने हातावर, मांडीवर, डोक्यात मारून गंभीर जखमी केले. तसेच छाया लवटे हिचे गळयातील सोन्याची माळ व मणी मच्छिंद्र मेटकरी याने हिसकावून घेवून तुम्हाला आता जीवंत सोडत नाही अशी दमदाटी केल्याचे समाधान मेटक्री यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# राजकीय पडझड रोखण्यासाठी समाधान अवताडेंना पालकमंत्री बनविण्याच्या हालचाली

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२८ नोव्हेंबर-**

राज्यात भाजपा आणि महायुतीची सुनामी आलेली असताना सोलापूर जिल्ह्याने मात्र महाविकास आघाडीला ११ पैकी सहा जागा देत आपण शरद पवार यांच्या मागे असल्याचे दाखवून दिले होते. सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात भाजप आणि महायुतीला बसलेला फटका दुरुस्त करण्यासाठी आता पंढरपूर मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ घालून पॅचअप करायच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

समाधान आवताडे हे मराठा समाजातील तरुण आणि संघटन कौशल्य असलेले आमदार असल्याने माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस आणि बार्शी या ठिकाणी ते पुन्हा एकदा पक्षाला नवसंजीवनी मिळवून देतील, असा भाजपचा विश्वास आहे. समाधान आवताडे यांचा दांडगा जनसंपर्क आणि सर्वांशी मिळून मिसळून वागण्याची त्यांची पद्धत यामुळे पुन्हा एकदा या सहा मतदारसंघात पक्षाची बांधणी मजबूत होऊ शकणार आहे.

अवताडे यांच्यासमोर मोहिते पाटील यांचे मोठे आव्हान असले तरी त्याला तोंड देण्याची ताकद त्यांच्यात असल्याने ते भाजपासाठी कोणालाही भिडू शकतात, याचा विश्वास पक्षाला आहे.





> **पश्चिम भागात महायुतीला धक्का**
>
> अक्कलकोटपासून सोलापूरपर्यंत भाजपने क्लीन स्वीप घेत काँग्रेसचा सुपडा साफ केला. मात्र ग्रामीण भागात मोहोळपासून सांगोल्यापर्यंत शरद पवार गटाने महायुतीला आसमान दाखवल्याचे चित्र आहे. यात मोहोळ, माढा, करमाळा, माळशिरस या चार मतदारसंघात शरद पवार गटाने दणदणीत विजय मिळविला तर बार्शीमध्ये ठाकरे गटाचे दिलीप सोपल आणि सांगोल्यात शेतकरी कामगार पक्षाचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी विजय मिळवत महायुतीला दे धक्का दिला.

त्यामुळेच आता होणाऱ्या मंत्रिमंडळ रचनेत सोलापूर जिल्ह्यातून समाधान अवताडे यांना संधी देत पालकमंत्री बनविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.समाधान आवताडे हे २०२१ साली पहिल्यांदा पंढरपूर मंगळवेढा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भगीरथ भालके यांचा पराभव करून निवडून आले होते. कालच्या निकालातही त्यांनी पुन्हा एकदा भगीरथ भालके यांना आसमान दाखवत दुसऱ्यांदा विजय मिळवला आहे.समाधान अवताडेंचे संघटन कौशल्य जिल्ह्यातील राजकीय पडझड सोलापूर जिल्ह्यातून मंत्रीपदासाठी भाजप जिल्हाध्यक्ष सचिन कल्याण शेट्टी यांच्याही नावाची चर्चा असली तरी ग्रामीण भागात अवताडे जास्त परिणामकारक ठरू शकतील असे भाजप निरीक्षकांचे मत आहे. यावेळी ११ पैकी सहा जागा महाविकास आघाडीने घेत भाजपाला आणि महायुतीला दे धक्का केला असून यात महायुतीला साथ देणारे सर्व सहा विद्यमान आमदारांना पराभवाची धूळ चाखावी लागली होती.

> **नव्याने बांधणी करण्यासाठी प्रयत्न**
>
> सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात महायुतीचा झालेला सफाया भाजपासाठी चिंतेचा विषय बनला असून पुन्हा एकदा या सहा मतदारसंघात नव्याने बांधणी करण्यासाठी पंढरपूर-मंगळवेढ्याचे आमदार आणि देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू समाधान आवताडे यांच्यावर ही जबाबदारी देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

आता येऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका आणि महापालिक या निवडणुक डोळ्यासमोर ठेवून भाजप पावले टाकू लागली असून पक्षाचे लक्ष २०१९ ला गमावलेल्या दोन्ही लोकसभेच्या जागा पुन्हा मिळवण्याचे मुख्य लक्ष आहे. अशावेळी बहुजन चेहरा देताना सर्वांना सोबत घेऊन जाईल अशा व्यक्तीचा विचार पक्ष करीत आहे. पुढील दोन ते तीन दिवसात राज्यात नवीन सरकार येणे अपेक्षित असून यामध्ये सोलापूर जिल्ह्याला मंत्रिपदाची संधी देताना अवताडे यांच्या नावाचा विचार होईल असे सूत्रांचे सांगणे आहे.

## शहीद अशोक कामटे संघटनेचे कार्य आदर्शवत

### तहसीलदार संतोष कणसे : १२९ जणांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ नोव्हेंबर-**

शहीद अशोक कामटे संघटनेचे कार्य इतर सामाजिक संघटनांसाठी एक आदर्शवत कार्य असल्याचे मत सांगोल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांनी व्यक्त केले.

संघटनेतर्फे शहीद दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. किर्तीकुमार शिंदे, पोलिस निरीक्षक भीमराव खणदाळे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पी. बी. गव्हाणे, नवनाथ पवार, गिरीश नष्टे, माजी नगरसेवक आनंद माने, गजानन बनकर, विलास पाटील, नवनाथ शिंदे, महेंद्र कांबळे, माधव शिंदे, दादासो खडतरे, रमेश फुले, उत्तम चौगुले, कौशल्यादेवी शिंदे, सुप्रिया बेले, आशाताई सलगर, शालन शिंदे, प्रमिला जगदाळे, अरविंद केदार, रमेश पवार उपस्थित होते. यावेळी १२९ रक्तदात्यांनी रक्तदान करून शहिदांना आदरांजली अर्पण केली. शिबिराच्या सुरुवातीस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शहिदांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. शिबिराला डॉ. निकिता देशमुख, रमेश फुले, ॲड. विजयसिंह चव्हाण, अनुराधा खडतरे, राजलक्ष्मी शिंदे, शिवांजली शिंदे, किशोर बनसोडे, दीपक बनसोडे, मुकुंद हजारे, मयुर ढोले, शारिक तांबोळी, विशाल नलवडे, तेजस कुरकुटे, गणेश पाटोळे यांनी भेट दिली. प्रास्ताविक नीलकंठ शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रसाद खडतरे यांनी केले. आभार चारूदत्त खडतारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विठ्ठलपंत शिंदे, मकरंद पाटील, तोसिफ शेख, सुयोग बनसोडे, अतुल बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## नातेपुते येथे सोमवारपासून कीर्तन महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २८ नोव्हेंबर-**

नातेपुते येथ जगद्गुरु संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन त्रिशतकोत्तर तथा ३७५ वा. अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व कीर्तन महोत्सव सोहळ्याचे आयोजन ग्रामस्थांच्या सहकार्यातून करण्यात आलेले आहे.

शंभू महादेवांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नातेपुते नगरीमध्ये नाचू किर्तनांचे रंगी। ज्ञान दुप लावू जगी!! चला जाऊ स्वल्प वाटे वाचे गाऊ विठ्ठल या न्यायाने सप्ताहाची प्रेरणा वै हभप मनोहर महाराज भगत सप्ताहाचा शुभारंभ सोमवारी २ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. सांगता ८ डिसेंबर रोजी होणार आहे. सप्ताहातील कीर्तन महोत्सव रात्री ८ ते १० यावेळेत होणार आहे. २ डिसेंबर रोजी हभप दत्तात्रय महाराज गलांडे लासुर्णे, ३ डिसेंबर रोजी हभप गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले अध्यक्ष गाथा मंदिर देहू, ४ डिसेंबर रोजी हभप बापूसाहेब महाराज देहुकर जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज, ५ डिसेंबर रोजी हभप अशोक महाराज जाधव रामायणाचार्य, जुन्नर, ६ डिसेंबर रोजी हभप गणेश महाराज भगत नातेपुते, ७ डिसेंबर रोजी हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे अध्यापक जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी, ८ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते ११ यावेळेत काल्याचे कीर्तन, संतवीर हभप बंडातात्या कराडकर, संस्थापक व्यसनमुक्त युवक संघ महाराष्ट्र राज्य, काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद होईल. विठ्ठल मंदिर नातेपुते येथे हा कार्यक्रम होणार आहे.



हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह समितीचे अध्यक्ष अमोल गजानन पाडसे, बापुसाहेब भांड, विनायकराव उराडे, चंद्रकांत तात्या ठोंबरे, गणेश कुचेकर, गणेश पागे, तुकाराम ठोंबरे, मंगेश दिक्षीत, अभिजित म्हामणे, समाधान माळी, जालिंदर ठोंबरे, नारायण काळे, सचिन साळी परिश्रम घेत आहेत.

# कुर्डूवाडीतील रेल्वे भुयारी बोगद्याच्या कामास लवकरच होणार प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २८ नोव्हेंबर-**

गेली पाच वर्षे झाली कुर्डूवाडी शहराचे दोन भाग करणाऱ्या रेल्वे रुळा खालील होणारा बोगदाला प्रलंबित होता. गेल्या आठवड्यात या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे. पुढील एक ते दीड महिन्यामध्ये हे काम पूर्ण होण्याची आशा आता कुर्डूवाडीकरांना दिसून येते आहे.

कुर्डूवाडी शहराच्या मधोमध रेल्वेचे गेट क्रमांक ३८ होते. गेल्या पाच वर्षांपूर्वी रेल्वे विभागाने सततच्या रेल्वेच्या वाहतुकी मुळे हे गेट बंद करून टाकले होते. येथे भुयारी बोगदा करण्याचे नियोजन होते. यासाठी रेल्वे टेंडर काढून या ठिकाणी काम ही सुरू झाले होते. बोगद्यात वापरल्या जाणाऱ्या मोठ्या सिमेंटच्या चौकोनी रिंग तयार करून ठेवण्यात आलेल्या होत्या. परंतु गावातील नेते मंडळींनी बोगद्याऐवजी उड्डाणपूल असावा, अशी मागणी रेल्वे विभागाकडे केली होती यासाठी प्रसंगी आंदोलनाचा पवित्रा त्यांनी उगारला होता.

जोपर्यंत आंदोलन करते शांत होत नाही. तोपर्यंत रेल्वे विभागाने हे काम करायचे बंद ठेवले होते. रेल्वेचा भुयारी बोगदा नसल्यामुळे कुर्डूवाडी शहराचे भारत-पाकिस्तान सारखे दोन भाग झाले होते. रेल्वे कॉलनी परिसर व त्या परिसरातील दहा गावातील लोक कुर्डूवाडी शहरात यायचे बंद झाले होते. याचा परिणाम शहरातील बाजार पेठेवर होऊन शहरातील बाजारपेठ उध्वस्त होण्याच्या मार्गावर होती. दुपारी बारा वाजेपर्यंत अनेक व्यापाऱ्यांची भवानी सुद्धा होत नव्हती अशी अनेक व्यापाऱ्याने खंत बोलून दाखवली होती. सरते शेवटी रेल्वे विभागाने राजकीय नेते मंडळाचे समजूत काढून हे काम आत सुरू केलेले आहे.



> **लवकरच वाहतूक सुरळीत होणार**
>
> या बोगदाच्या जवळ मोठ्या क्रेनच्या सहाय्याने आणून ठेवलेल्या आहेत. पुढील आठवड्यामध्ये प्रत्यक्ष बोगद्याच्या खोदाईची कामाची सुरुवात होणार आहे. जशी खोदाई होईल तशी या ठिकाणी रिंग टाकून रेल्वेची वाहतूक लागलीच सुरळीत करण्यात येणार आहे. रेल्वे विभागाने यावेळी मोठ्या दोन क्रेन व इतर साहित्याची जमवाजमव केलेली आहे. नगरपालिकेच्या हद्दीऐवजी रेल्वे विभागाने त्यांच्या स्वतः च्या हद्दीतून हा बोगदा करायचे शेवटी ठरवलेले आहे. गेली पाच वर्षे झाली प्रलंबित असलेल्या या कामाची कुर्डूवाडीकर चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत.

## सोलापूर जिल्हा न्यायालयात संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा न्यायालय, सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि सोलापूर वकिल संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश मो. सलमान आझमी यांचे हस्ते न्यायालयाच्या मुख्य प्रवेशाव्दारा समोरील संविधान उद्देशिकेच्या प्रतिमेस पुष्प अपर्ण करून उद्देशिकेचे सामूहिक वाचन झाले. याप्रसंगी



जिल्हा न्यायाधीश आर. जे. कटारीया, जिल्हा सरकारी वकिल प्रदिपसिंह रजपूत, वकिल संघाचे अध्यक्ष अमित आळंगे, सर्व न्यायिक अधिकारी, विधीज्ञ, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रबंधक पल्लवी पैठणकर, अधिक्षक मुकुंद ढोबळे, संजय म्याकलवार, प्रसाद चुंगे, सहा-अधिक्षक उमेश कुलकर्णी, मेघराज लालसंगी, चेतन सातलगांवकर तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस. ए. जी. नदाफ आदींनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...

### खर्डी येथील सीताराम महाराज समाधीचे आ. समाधान आवताडे यांनी घेतले दर्शन

**मंगळवेढा दि.२८ नोव्हेंबर**



खर्डी येथे श्री. सद्गुरू सीताराम महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आपल्या मतदारसंघाचे आमदार मा.श्री.समाधान आवताडे साहेब यांनी महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक होऊन मनोभावे दर्शन घेतले. सदर पवित्र ठिकाणी महाराजांच्या दर्शनाने सार्वजनिक कार्यक्षेत्रात अधिक जोमाने सेवाकार्य करण्यासाठी सकारात्मक ऊर्जा आणि परमसाध्य बळ मिळते अशी भावना आमदार महोदय यांनी व्यक्त केली. यावेळी जेष्ठ नेते श्री.तुकाराम आबा कुरे तसेच इतर मान्यवर सहकारी आणि ग्रामस्थ-भाविक व मंदिर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



### भीम प्रतिष्ठान, विवेक विचार मंचतर्फे संविधान दिन साजरा

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

भीम प्रतिष्ठान आणि विवेक विचार मंच सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी, मिलिंद नगर, बुधवार पेठ येथे संविधान दिनानिमित्त कार्यक्रम आणि उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचनही करण्यात आले यावेळी अनेक मानवरांची उपस्थिती लाभली. यावेळी संविधानाचे महत्व याबद्दल अनेकांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी संविधानाचे महत्व घराघरात नव्हे तर शाळा कॉलेजमध्येही याचे वाचन आणि त्याचे महत्व काय आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मोठे कार्य आणि योगदान आजच्या पिढीला समजणे खूप महत्वाचे आहे. यावेळी भीम प्रतिष्ठानचे बाबा बाबरे व त्यांचे संस्था पदाधिकारी सिद्धांत बाबरे, अकबर शेख, राम चाकोते, अधिवक्ता परिषदेचे ॲड. गवई, ॲड. देशमुख, ॲड. महिंद्रकर, ''भटके विमुक्त''चे संतोष शिर्के, बावळे सर, भवानीनगर कार्यवाह केदारजी दामा व सहकारी, संगीताताई जाधव, मंजुषाताई मुडके, ममता मादगुंडी, पद्मा तारके, विवेक विचार मंचचे ॲड. प्रशांत कांबळे, अश्विनी चव्हाण तसेच विवेक विचार मंचचे सदस्य व सहयोगी संस्थाचे मान्यवर उपस्थित होते.



### महापालिकेच्या वतीने २६/११ मधील शहिदांना अभिवादन

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

मुंबईमध्ये दि. २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना महापालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. सोलापूर महानगरपालिकेचे वतीने मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले भारताचे थोर सुपूत्र व सोलापूरचे माजी पोलीस आयुक्त अशोक कामटे, मुंबईतील ए.टी.एस. पथकाचे प्रमुख पोलीस अधिकारी हेमंत करकरे, चकमक फेम गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय साळस्कर सोलापूरातील राज्य राखीव पोलिस गट १० चे जवान राहुल शिंदे, एन.एस.जो. मधील मेजर संदीप उन्नीकृष्णन हे शहीद झाले होते. महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांचे कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, उद्यान अधीक्षक किरण जगदाळे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश चौगुले, सिद्धू तिमिगार, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

### सह्याद्रीमध्ये डी. फार्मसी तृतीय फेरीसाठी ऑप्शन फॉर्म लवकरच चालू होणार

**सांगोला, दि. २८नोव्हेंबर-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथे डी. फार्मसी प्रथम वर्षासाठी तिसरी फेरी प्रवेश प्रक्रिया दि.३० नोव्हेंबर पासून चालू होणार आहे व त्याचे ऑपशन फॉर्म ३० नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर या दरम्यान भरायचे आहेत तरी डी.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेशप्रक्रिया नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रियेत भाग घ्यावा असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी डॉ.ए.एम.तांबोळी (९९७५४०२४६५), डॉ. एम. जी. शिंदे (८३०८४८७२७८) प्रा. एस. एम. पवार (९९७५९९२८१८), पी. एस. लोखंडे (९८२३१०७३७१) यांना संपर्क करावा, असे आवाहन प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे. तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी ऑपशन फॉर्म भरणे- ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर, तिसरी प्रवेश फेरी लिस्ट- ४ डिसेंबर, तिसऱ्या फेरीत नंबर लागलेल्या अर्जदार विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या प्रवेशासाठी करावयाची प्रक्रिया- ५ ते ७ डिसेंबर, कट ऑफ डेट- १३ डिसेंबर.

# पंढरपुरातील वैकुंठ स्मशानभूमीत समस्याच समस्या

**● अंत्यसंस्कार करताना सोसाव्या लागतात मरणयातना | पंढरपूर नगरपालिकेचे कमालीचे दुर्लक्ष**





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ नोव्हेंबर-**

येथील वैकुंठ स्मशानभूमीमध्ये समस्यांची अक्षरशः: मांदियाळी दिसून येत आहे. त्यामुळे एखाद्या आप्तस्वकीयांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमीत आलेल्या महिला, वृद्धांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे पालिकेने वैकुंठ स्मशानभूमीतील समस्यांकडे गांभिर्याने लक्ष देऊन त्या सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे शहरातील नागरिकांतून बोलले जात आहे.

शहरात एकमेव वैकुंठ स्मशानभूमी आहे. उपनगरातील टाकळी भागात एक स्मशानभूमी असून तिचे अस्तित्व केवळ नावापुरतेच आहे. कारण या उपनगरातील स्मशानभूमीत कोणत्याही सुविधा नाहीत. आत्तापर्यंत पंधरा, सोळा वर्षात केवळ एक, दोन जणांच्या मृतदेहांवर या स्मशानभूमीत केवळ (शहरात पूरपरिस्थिती गंभीर असल्यामुळे मुख्य वैकुंठ स्मशानभूमीत पाणी होते) नाईलाजास्तव अंत्यसंस्कार करावे लागलेले आहेत. त्यामुळे शहर आणि उपनगरातील नागरिकांना गावाभागामध्ये असलेल्या एकमेव वैकुंठ स्मशानभूमीतच मृतदेहांवर अंत्यसंस्कार करावे लागतात. मात्र गेल्या कित्येक महिन्यांपासून या वैकुंठ स्मशानभूमीला देखील पालिकेच्या दुर्लक्षामुळे एक ना अनेक समस्यांनी ग्रासलेले दिसत आहे.

या वैकुंठ स्मशानभूमीतील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे या ठिकाणी अंत्यसंस्कारासाठीचे कट्टे किंवा चबुतऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. त्यामुळे एकाच दिवशी अनेक मृतदेह अत्यसंस्कारासाठी आल्यावर प्रत्येक मृतदेहासाठी स्वतंत्रपणे कट्टे किंवा चबुतरे उपलब्ध होत नाहीत. अनेकांना कट्यांशिवाय खाली जमिनीवरच किंवा एकाच कट्ट्यांवर दोन, तीन मृतदेहांवर अंत्यसंस्कार करावे लागतात. या स्मशानभूमीत ज्या ठिकाणी अंत्यसंस्कार केले जातात तेथील चबुतऱ्याच्या किंवा कट्ट्यांची जमीनदेखील एकसारखी सपाट दिसत नाही. अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असल्यामुळे अंत्यसंस्काराच्या वेळी रचलेले सरपण किंवा लाकडे देखील ढासळली जातात. याबरोबरच स्मशानभूमीत पाण्यासाठी असलेला हातपंप हा देखील खूप दूर अंतरावर असल्यामुळे वयोवृद्ध नागरिकांचे हाल होतात. पावसाळ्यात अंत्यसंस्कारावेळी उपस्थित असलेल्या नागरिकांना उभारण्यासाठी जवळच आडोसा किंवा एखादे पत्राशेड नसल्यामुळे देखील नागरिकांना अडचणीचे होते. वैकुंठ स्मशानभूमीत मोकाट जनावरांचा सर्रास वावर दिसून येतो. त्याला देखील प्रतिबंध करण्याची गरज आहे. स्मशानभूमीत सर्वत्र काटेरी वनस्पती वाढलेल्या दिसतात. त्यामुळे पालिकेने या काटेरी वनस्पती काढून त्या ठिकाणी सावली देणाऱ्या डेरेदार वृक्षांचे वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्मशानभूमीचा परिसर देखील प्रसन्न होण्यास मदत होईल. स्मशानभूमीत बसण्यासाठी बाकडे आहेत मात्र त्याची देखील संख्या अपुरी आहे. झाडांच्या कडेला गोल कट्टे बांधलेले आहेत मात्र त्या ठिकाणी तेलकट तांबड्या मोठ्या मुंग्याची मांदियाळी असते. त्यामुळे बसलेल्या माणसाला या मुंग्या चावल्या तर त्याची काही धडगत उरत नाही. गेल्या दीड, दोन वर्षांपासून पालिकेवर प्रशासकाची नियुक्ती आहे. त्यामुळे नगराध्यक्ष, नगरसेवकांचा कोणताही हस्तक्षेप नाही. तरी देखील पालिका अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे स्मशानभूमी देखील अनेक समस्यांनी ग्रासल्याचे दिसून येत आहे. या समस्या दूर करण्यासाठी पालिकेच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

**● पालिकेकडून नियमित स्वच्छतेची गरज**

स्मशानभूमीला देखील बकाल अवस्था आलेली दिसत आहे. कारण स्मशानभूमीत नियमित स्वच्छता ठेवली जात नाही. अंत्यसंस्कारानंतर स्मशानभूमीत लाकडी बांबू, मृतदेहाच्या अंगावरील कपडे, कापसाच्या उशा तसेच गाद्या याबरोबरच प्रेताच्या गळ्यातील फुलांचे हार, फुटकी मातीची मडकी, काचेच्या बांगड्या, इंधनाचे आदी सामान सर्वत्र पडलेले दिसून येतात. त्यामुळे स्मशानभूमीत नियमित साफसफाईची गरज आहे.

**● कायमस्वरूपी सुरक्षा व सीसीटीव्हीची व्यवस्था आवश्यक**

स्मशानभूमीत सोन्याच्या लालसेने राख चोरुन नेण्याच्या घटना वाढत असल्यामुळे पालिकेने या ठिकाणी कायमस्वरूपी सुरक्षारक्षक नेमण्याची गरज आहे. याबरोबरच या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणेची देखील गरज आहे. त्यामुळे उपद्रवी (दारुडे, जुगार, मटका घेणाऱ्या) मंडळींना चांगली जरब बसून येथे चालणारे अवैध प्रकार किंवा धंदे बंद होण्यास मदत होईल.

**● अस्थी आणि राखेच्या विसर्जनासाठी पर्यायी व्यवस्था आवश्यक**

चंद्रभागा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी उच्च न्यायालयाकडून अनेक निर्देष देण्यात आलेले आहेत. पालिकेच्या वतीने अद्यापही स्मशानभूमीत अस्थी तसेच राखेचे विसर्जन करण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांकडून अस्थी आणि मृतदेहाच्या राखेचे सर्रास पवित्र चंद्रभागा नदीच्या पात्रात विसर्जन केले जाते. त्यामुळे चंद्रभागेच्या प्रदूषणाचे हे एक अत्यंत महत्त्वाचे कारण आहे. याकडे देखील पालिका अधिकाऱ्यांनी गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## पराभव झाल्याने सुडाचे राजकारण करणार नाही

**● माजी आ. शहाजीबापू पाटील यांचे स्पष्टीकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२८ नोव्हेंबर-**

> उबाठाचे उमेदवार दीपकआबा म्हणतात बापूंनी मला पाठिंबा द्यायला हवा होता. मी दीपकआबांना लहान भाऊ मानून आमदारकीचे ५०% अधिकार दिले. हे अधिकार शिवसैनिकांना दिले असते तर माझा पराभव झाला नसता. या निवडणुकीत मतदार बंधू-भगिनींनी ९१ हजार मते देऊन त्यांची जबाबदारी पूर्ण केली हे काही कमी नसुन मतदारांचे आभार व्यक्त करतो.
>
> **- माजी आ. शहाजीबापू पाटील**



माझा पराभव झाला म्हणून सुडाचे राजकारण करणार नाही. यापुढेही सांगोला तालुक्याच्या विकासासाठी मोठे योगदान देण्यास सदैव तत्पर आहे अशी ग्वाही माजी आ. शहाजीबापू पाटील यांनी दिली.

ते चिकमहुद ता.सांगोला येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या विचारविनिमय बैठकीत बोलत होते. यावेळी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, या विधानसभा निवडणुकीत प्रत्येकाने आपण काय योगदान दिले याचे आत्मचिंतन केले पाहिजे. ही निवडणूक सर्व व्यापक भावनेवर गेली. या निवडणुकीत माझा पराभव झाला असला तरी कार्यकर्त्यांनी पराभवामुळे खचून जावू नये व नाराजही होऊ नये. आपण सर्वांनी मोठ्या जिद्दीने, धाडसाने व उमेदीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकवल्याशिवाय स्वस्त बसायचे नाही असा निर्धार करत मला येत्या दोन महिन्यात मोठे पद मिळेल असा आत्मविश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी दादासाहेब लवटे, दीपक पवार, विजय शिंदे, रमेश बनसोडे, विकास मोहिते, नवनाथ माने, धनाजी कवडे, राजेंद्र खांडेकर, परमेश्वर साळुंखे, खंडू सातपुते, शहाजी घाडगे, दामोदर साठे, सुनील शिंदे, दत्तात्रय नागणे, विजय पाटील, धनाजी चव्हाण, ॲड. महादेव कांबळे, विजय बनसोडे यांनी मनोगत व्यक्त केले.

## ५४ मीटर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करा

**खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचे मनपा आयुक्तांना पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर -**



सोलापूर, शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते सोरेगाव या ५४ मीटर बाह्यवळण रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे. यासंदर्भात माढ्याचे खा. धैर्यशील मोहिते - पाटील यांनी महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांना पत्र दिले आहे.

सोलापूर शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक, अवंती नगर, सीएनएस हॉस्पिटल, सलगर वस्ती ते राजस्व नगर , सोरेगाव या ५४ मीटर बाह्यवळण रस्त्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. सध्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैय्या चौक) येथील रेल्वे पूल जुना झाल्याने जड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. दरम्यान या पुलाचे काम सुरू केल्यानंतर या रस्त्यावरील वाहतुकीचा मोठा खोळंबा होणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी याच भागाकडील छत्रपती संभाजी महाराज चौक ते सोरेगाव या ५४ मीटर बाह्यवळण रस्त्याचे काम तातडीने पूर्ण होणे गरजेचे आहे. या रस्त्याचे काम मार्गी लावण्यात यावे यासाठी यापूर्वी सोलापूर विकास मंचसह विविध पक्ष संघटनांच्या वतीने मागणी करण्यात आली होती.

या रस्त्यासाठी सोलापूर महापालिकेने आतापर्यंत सुमारे २० कोटी रुपये खर्च केले आहेत. महापालिकेकडून रेल्वे अंडर ब्रिजसाठी १८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. तसेच या ब्रिजच्या बाजूच्या ॲप्रोच रस्त्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडूनही ३.५ कोटी रुपये निधी मंजूर आहे.

**सोलापुरातील रस्त्याच्या कामात घातले लक्ष**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यात महाविकास आघाडी अंतर्गत माढा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते पाटील आणि सोलापूर मतदारसंघातून काँग्रेसच्या प्रणिती शिंदे या खासदार झाल्या. ५४ मीटर हा रस्ता सोलापूर शहरा अंतर्गत काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांच्या कार्यक्षेत्रात आहे. गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याचे काम प्रलंबित आहे. आता थेट माढ्याचे खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनीच या रस्त्याच्या कामात लक्ष घातल्याने चर्चेला उधाण आले आहे.

## आ. भारतनाना भालके यांच्या आठवणींना श्री विठ्ठल कारखान्यावर उजाळा

**● चतुर्थ पुण्यतिथीनिमित्त अभिवादन; अनेकांनी व्यक्त केल्या भावना**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ नोव्हेंबर-**



तालुक्यातील वेणुनगर-गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे कारखान्याचे माजी चेअरमन कै. आ. भारतनाना भालके यांचे चतुर्थ पुण्यतिथीनिमित्त त्यांचे प्रतिमेचे विधीपूर्वक पूजा कारखान्याचे संचालक संभाजी भोसले व आनंद पाटील यांच्या हस्ते व संचालक मंडळाच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

कारखान्याचे संचालक दिनकर चव्हाण व शिवसेना प्रवक्ते (उबाठा) रणजित बागल यांनी मनोगत व्यक्त करुन कै.आ.भारतनाना भालके यांच्या आठवणींना उजाळा देऊन भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कारखान्याचे लिगल ऑफिसर ओ. जे. अवधूत यांनी केले. या कार्यक्रमास कारखान्याचे संचालक जनक भोसले, सुरेश भुसे, सिध्देश्वर बंडगर, दशरथ जाधव, अशोक घाडगे, तानाजी बागल, माजी नगरसेवक प्रशांत शिंदे, प्रविण भोसले, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील, जनरल मॅनेजर डी. आर. गायकवाड, तसेच कारखान्याचे सभासद, कार्यकर्ते, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सरकोली येथील निवासस्थानी गर्दी**

पंढरपूर तालुक्यातील (कै.) माजी आमदार भारतनाना भालके यांचे गाव असलेल्या सरकोली येथील त्यांच्या निवासस्थानी देखील विठ्ठल परिवाराच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गुरुवारी त्यांना आदरांजली वाहण्यासाठी गर्दी केलेली होती.

**समाजमाध्यमांद्वारे वाहिली आंदरांजली**

येथील माजी आमदार (कै.) भारतनाना भालके यांचे निधन होऊन चार वर्षाचा कालावधी लोटला आहे. मात्र भालकेंच्या आठवणी अजून देखील पंढरपूर, मंगळवेढा मतदारसंघातील नागरिक, त्यांच्यावर प्रेम करणारे पदाधिकारी आणि सर्वसामान्य कार्यकर्ते उराशी बाळगून आहेत. त्यामुळे विठ्ठल परिवाराच्या पदाधिकाऱ्यांपासून ते अगदी सर्वसामान्य नागरिकांनी देखील समाजमाध्यमांव्दारे (कै.) भारतनाना भालकेंना आदरांजली वाहून त्यांना विनम्र अभिवादन केल्याचे दिसत होते.

## सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या अध्यक्षपदी सदाशिव बेडगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**



महाराष्ट्र हे पुरोगामी लोकशाहीचे राज्य आहे या राज्यात सन २०१२ पर्यंत १२५०० सार्वजनिक ग्रंथालय कार्यरत होती २५ मे २०१२ साली आघाडी सरकारने महसूल खात्यामार्फत ग्रंथालयाची पटपडताळणी केली आणि सध्या राज्यात ११५० ग्रंथालय अस्तित्वात आहेत शासनाच्या उदासीनतेमुळे तसेच राज्य ग्रंथालय संघ,व इतर अनेक संघटनामुळे ग्रंथालय व ग्रंथालय कर्मचारी यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असल्याने ग्रंथालय कायदा होवून ५७ वर्षे झाली तरी राज्यातील ग्रंथालय कर्मचारी यांचे प्रश्न सुटले नाहीत म्हणून राज्यातील ग्रंथालय कर्मचारी यांच्या आग्रहाखातर नवीन संस्था स्थापन करण्यात आली सुनील दत्त पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.

अध्यक्ष सदाशिव बेडगे, कार्याध्यक्ष सुनील दत्त पाटील, उपाध्यक्ष विजय पाटील , उपाध्यक्ष बालाजी कांगणे, उपाध्यक्ष वसंत धोत्रे, सचिव धोंडिराम जेवूरकर, सहसचिव नरसिंह मिसालोलू, सहसचिव उमा पुदाले, खजिनदार निलेश क्षिरसागर, सदस्य सिद्राम मुद्देबिहाळ, सदस्य मनोहर झोटे यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी महाराष्ट्रातून मनोहर झोके, गजानन गिते (बुलढाणा) सुनील दत्त पाटील, (सांगली) बालाजी कांगणे, (अंबेजोगाई) निलेश क्षिरसागर (पुणे) सौ. उमा पुरावे (पलूस) भीमाशंकर बिराजदार, सिध्दाराम हलकुडे, संतोष गद्दी, सिद्राम मुद्देबिहाळ, नरसिंह मिसालोलू, रामचंद्र वग्गे, धोंडिराम जेवूरकर, आदी उपस्थित होते. यावेळी भीमाशंकर बिराजदार यांना निमंत्रित सदस्य तर पुणे विभाग अध्यक्ष संतोष गद्दी, सोलापूर जिल्हा अध्यक्ष सिद्राम मुद्देबिहाळ यांची निवड करण्यात आली. आभार नरसिंह मिसालोलू यांनी मानले.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जिल्हास्तरीय क्रिकेट सामन्यात हर्ष वैजनाथ माळी याचे शतक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन अंतर्गत पुणे येथे (२०२४-२५) या वर्षासाठी सुरू असलेल्या जिल्हास्तरीय १४ वर्षीय वयोगटा खालील क्रिकेट सामन्यात सोलापूर जिल्हा क्रिकेट संघा कडून खेळत असताना लीग मॅचेसच्या दि.२६ नोव्हेंबर रोजी शेवटच्या सामन्यात हर्षचे १४ चौकार आणि एका षटकारासह ११९ धावांचे दणदणीत शतक झाले.

शतकवीर हर्ष आणि संघाच्या उत्तुंग कामगिरीच्या बळावर सोलापूर क्रिकेट संघाची सुपर लीगमध्ये धडक प्रवेश मिळविला.



९० षटकांच्या दोन दिवसीय कसोटी क्रिकेट सामन्यात एकूण ४ इनिंगमध्ये हर्ष २४५ धावा काढून संघामध्ये सर्वाधिक धावांसह अव्वल स्थानावर आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

यासाठी त्याला मॉडेल क्रिकेट अॅकॅडमी सोलापूरचे कोच सत्यजित जाधव, रोहित जाधव, तनवीर खान यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## संक्षिप्त वृत्त...



### रोहित्राची तात्काळ दुरूस्ती करा; अन्यथा आमरण उपोषण

**तेर, दि.२८ नोव्हेंबर -**

तेर (ता.धाराशिव) येथील घोगरे डी.पी.चा नागरिकांना वारंवार होणारा त्रास टाळावा व तात्काळ डी.पी.ची दुरुस्ती करुन विद्युत पुरवठा सुरळीत करावा अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला. यासाठी तेर येथील ग्रामस्थांच्या वतीने महावितरण कार्यालयातील कार्यकारी अभियंता शाखा तेर यांना निवेदन देण्यात आले. निवेदनावर अर्शाद मुलांनी, युसुफ काझी, मुदसर शेख, जुबेर मुलांनी, इस्माईल शेख, रियाज शेख, तौफिक मोमीन, सलमान मुलांनी, नजीब शेख, शहाबाज मुलांनी यांच्या सह्या आहेत.



### तेर येथे माऊली ज्ञानेश्वर महाराज यांचा संजीवनी सोहळा संपन्न

**तेर, दि.२८ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबाकाका यांच्या मंदिरात माऊली ज्ञानेश्वर महाराज यांची संजीवनी सोहळ्या निमित्ताने हभप. आबा महाराज मोरे यांचे किर्तन संपन्न झाले. यावेळी गुलाल उधळून महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी मंदिराचे पुजारी हभप. रघुनंदन महाराज पुजारी, हभप. अविनाश महाराज तपीशे, हभप. गोविंद महाराज पागरकर, मेघराज पुजारी, पृथ्वी पुजारी आदींसह भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एकादशीनिमित्त भाविकभक्त यांना केळी फळाचे वाटप

**तेर, दि.२८ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका यांच्या मंदिरात उत्पति एकादशीमुळे तेर येथील अश्विनी गायकवाड यांच्या वतीने भाविकभक्त यांना केळी फळाचे वाटप करण्यात आले. यावेळी शशिकला लोंढे, वसंत सोनवणे, पंढरी गायकवाड उपस्थित होते.

### श्री तुळजाभवानी मंदिर विकास कामांमध्ये ६० ते ७० लोकांचे घरे उठणार...

# तुळजाभवानी मंदिर परिसराच्या ५८ कोटीच्या विकास कामास कार्यरंभ आदेश

**घरे जाणाऱ्या लोकांच्या पुनर्वसन पॅकेजसाठी समिती नेमली... समितीचा अहवाल येताच नागरिकांना पॅकेज संदर्भातील माहिती दिली जाणार...**

### जिल्हाधिकारी डॉ. ओम्बासे यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ नोव्हेंबर -**

श्री तुळजाभवानी मंदिर आणि परिसर विकास कामांमध्ये ६० ते ७० पुजारी आणि नागरिकांचे घरे जाणार असून ज्यांची घरे जाणार अशा लोकांचे आर्थिक नुकसान होऊ नये आणि त्यांना चांगले पॅकेज मिळावे या अनुषंगाने मंदिर संस्थानच्या वतीने अहवाल समिती नेमण्यात आली असून समितीचा अहवाल आल्यानंतर तो लोकांपर्यंत पोहोचवण्यात येणार असल्याचे २८ नोव्हेंबर रोजी मंदिर प्रशासकीय कार्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे यांनी सांगितले.

यावेळी तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने, धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर इंतुले, अभियंता राजकुमार भोसले, प्रविण अमृतराव, जयसिंग पाटील, विश्वास कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती.



महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिराचे साधारण बाराव्या दशकातील बांधकाम असून त्या अनुषंगाने मंदिराचे ५८ कोटीचे मंदिर महाद्वार ते देवीच्या गाभार्यापर्यंत होणाऱ्या ५८ कोटीच्या विकास कामांमध्ये जतन, संवर्धन, आणि कालबाह्य कामे काढून टाकणे हे एकूण सहा टप्प्यात होणार आहेत पुरातनतत्व संचालनालयाची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून एकूण सहा टप्प्यात हे कामे होणार आहेत. सवानी कंट्रक्शन मुंबई आणि साईप्रेम कंट्रक्शन लातूर यांना या दोन्ही एजन्सींना हे कामे मिळाले आहेत.

पहिल्या टप्प्यामध्ये यज्ञ मंडप, भुयारी मार्ग, सभामंडप, भवानी मंदिर आणि भवानी मंडप यांचे जतन आणि दुरुस्ती दुसऱ्या टप्प्यांमध्ये मातंगी मंदिर, गोमुक्त तीर्थ, सिद्धिविनायक मंदिर, मार्तंड ऋषी मंदिर, टैल भैरव मंदिर, खंडोबा मंदिर यांच्या खूप मोठ्या प्रमाणात बदल न करता दुरुस्ती आणि जतन करणे.

तिसऱ्या टप्प्यांमध्ये असयुक्त बांधकामे काढणे यामध्ये स्टेडियम, पोलीस स्टेशन, जुने प्रशासकीय कार्यालय, गार्डन याप्रमाणे असणारे असे युक्त कामे काढून टाकणे. चौथ्या टप्प्यामध्ये अभिषेक हॉल जतन आणि दुरुस्तीमध्ये तुकोजी महाराज यांचा मठाचा एरिया वाढवणे, अभिषेक हॉल विस्तारीत करून एरिया वाढवणे, मंदिरातील ओहऱ्या काढून मंदिर एरिया वाढवणे.

तसेच पाचव्या टप्प्यात तुकोजी महाराजांच्या मठापासून दोन लिफ्ट आणि महाद्वारातून एक लिफ्ट दिव्यांग भाविकांच्या सोयीसाठी करण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यामध्ये काम करत असताना पुजारी भाविक यांना येणाऱ्या अडचणी सूचना प्रशासनाच्या लक्षात आणून द्याव्यात, असे आव्हान यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी नागरिकांना केले.



## मानेवाडी शिवारात कारच्या धडकेत मोटार सायकलस्वार जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ नोव्हेंबर -**

नळदुर्ग-तुळजापुर रोडवरील मानेवाडी शिवारात कारने मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलस्वार जागीच ठार झाल्याची घटना २८ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, सद्दाम याकुब आत्तार (वय ३२ रा. नळदुर्ग) हा एम एच ०३ डीई ७९७३ या मोटारसायकल वरून नळदुर्गहून तुळजापुरकडे काही कामानिमित्त जात असताना नळदुर्ग-तुळजापूर रोडवरील मानेवाडी शिवारातील करनूरे पुलाजवळ तुळजापुरहुन नळदुर्ग कडे भरधाव वेगाने निघालेल्या एम एच ११ सीजी १३१३ या क्रमांकाच्या कार ने समोरून मोटरसायकल ला जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलस्वार जागीच ठार झाला आहे.

या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर महामार्ग पोलीस केंद्र नळदुर्ग व नळदुर्ग पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन अपघातामध्ये मयत झालेल्या दुचाकीस्वारचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविले.

### जिल्ह्यातील १७ हमीभाव केंद्रांवर २५ हजार क्विंटल खरेदी...

## सोयाबीन खरेदीला १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...


**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

सुरुवातीच्या टप्प्यात बारदाण्याच्या तुटवड्यामुळे सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू होण्यास विलंब झाला होता व अपेक्षित ओलावा नसल्याने खरेदीला वेग येत नाही ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर खरेदीसाठी पुन्हा एकदा १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. नाफेडकडे आता १५ डिसेंबरपर्यंत सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे सोयाबीन विकण्याची घाई न करता शेतकरी बांधवांनी खरेदी केंद्राकडेच नोंदणी करावी. आजवर जिल्ह्यातील १७ हमीभाव खरेदी केंद्रांवर निकषात बसणाऱ्या तब्बल २५ हजार क्विंटल सोयाबीनची ४ हजार ८९२ रूपये या हमीभावने खरेदी करण्यात आली असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



धाराशिव जिल्ह्यातील १७ हमीभाव खरेदी केंद्रांवरून सोयाबीन खरेदी मोठ्या वेगात सुरू आहे. सुरूवातीच्या काळात बारदाण्याच्या तुटवडा निर्माण झाल्यामुळे खरेदी प्रक्रियेत विलंब निर्माण झाला होता. फेडरेशनकडे पाठपुरावा करून बारदाना निविदा प्रक्रिया तातडीने राबवून जिल्ह्यासाठी आवश्यक असलेला बारदाना उपलब्ध करून घेतला होता. त्यामुळे हमीभाव केंद्रांवर खरेदी प्रक्रियेला गती आली आहे. परिणामी खुल्या बाजारातही सोयाबीनचे दर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांनी सोयाबीन विकण्याची घाई न करता नोंदणीसाठी दिलेल्या पुढील १५ दिवसांच्या मुदतवाढीचा उपयोग करून घ्यावा. सध्या जिल्ह्यातील १७ हमीभाव खरेदी केंद्रांवर बारदाना मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळेच खरेदीलाही मोठी गती मिळत असल्याचे चित्र आहे. ज्या शेतकऱ्यांनी फेडरेशनकडे नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने नोंदणी करून सोयाबीन खरेदी केंद्रावरच सोयाबीनची विक्री करावी, असे आवाहनही पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील भूम, दस्तापूर, गुंजोटी, ईट, नळदुर्ग, कळंब, वाशी, उमरगा, धाराशिव, सोन्नेवाडी, चिखली, शिराढोण, टाकळी बें,



तुळजापूर, कानेगाव, कनगरा, चोराखळी आदी १७ ठिकाणी खरेदी केंद्र सुरू झाले आहे. गरज पडली तर त्यात वाढ करण्याची देखील आपण प्रयत्न करू.आतापर्यंत २५ हजार हजार क्विंटल सोयाबीनची खरेदी पूर्ण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर चार हजार ८९२ रुपये प्रति क्विंटलप्रमाणे पेमेंटही जमा करण्यात आले आहे. यापूर्वी नोंदणीसाठी १५ नोव्हेंबर ही मुदत देण्यात आली होती. त्यात वाढ करून ३० नोव्हेंबर करण्यात आली होती.

मात्र अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे आत पुन्हा एकदा नोंदणीसाठी १५ दिवसांची मुदतवाढ करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांनी सोयाबीन विक्री करण्याची घाई न करता १५ डिसेंबरपूर्वी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहनही आमदार पाटील यांनी केले आहे.

## तडवळे येथे शाळेला कुलूप; गाव बंद, रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**क. तडवळे, दि.२८ नोव्हेंबर -**

तडवळे गावातील ग्रामस्थांनी केले शाळेला कुलूप लावून रास्ता रोको आंदोलन आज दि.२८ रोजी करण्यात आले. शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखले जाणारे कसबे तडवळे येथे ग्रामस्ता कडून शाळेला कुलूप लावून गाव कडेकोठ बंद ठेवून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.



गावामध्ये पहिली ते बारावी पर्यंत शिक्षणाची सोय असताना गावात सुसज्ज इमारत असून सगळ्या सोई उपलब्ध असून आमच्या गावात दहावी परीक्षा बोर्ड का मिळत नाही.

जर वर्षी ढोकी येते परीक्षा देण्यासाठी जात असताना विद्यार्थ्यांचे अक्सिडेंत होऊन अनेक विद्यार्थी अपंग होऊन बसलेले तडवळे गावात मिळतील. गावातील नागरिकांनी अनेकदा प्रशासनाकडे पाठपुरावा करून सुधा मान्यता मिळत नसल्याने हे आंदोलन करण्यात आले. तसेच दहा दिवसाच्या आत मान्यता नाही मिळाली तर ह्या पेक्षा कडकं आंदोलन करण्यात येईल असे ग्रामस्थांनी या वेळी सांगितले. प्रशासन मुद्दाम आमच्या गावाला वेठीस धरत असे तडवळे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

लवकरात लवकर आम्हाला दहावी बोर्ड मिवळून द्यावा, असे आवाहन प्रसानाच्या वतीने आलेले अधिकारी यांना करण्यात आले.

यावेळी गावातील तसेच परिसरातील पालक शिक्षण प्रेमी रस्त्यावर मोठ्या संख्येने उतरले होते.

या वेळी लातूर बार्शी रोडवर दोन्ही बाजूला लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

## कळंब बसस्थानकासमोरील लॉजवर वेश्याव्यवसाय?

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

कळंब बस स्थानकासमोरील एका बियर बारच्या वरील लॉजवर वेश्याव्यवसाय चालत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या लॉजवर शाळकरी मुलींची ये-जा असल्याचेही निदर्शनास आले आहे.

यांप्रकरणी चौकशी करून या व्यवसायाला आळा घालण्याची मागणी येथील नागरिकांतून होत आहे.

पोलीस या सर्व प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. बस स्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी आणि शाळेच्या परिसरात असा अनैतिक व्यवसाय चालत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.



या लॉजवर तातडीने कारवाई करून वेश्याव्यवसाय बंद करावा आणि संबंधित दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पोलिसांच्या कथित दुर्लक्षाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी पोलिसांवरही कारवाई करावी, अशी मागणी येथील स्थानिक नागरिकांतून जोर धरत आहे.

# तुळजापूर तालुक्यातील ४१० बुथपैकी ३०९ बुथवर राणाजगजितसिंह पाटील तर १०० बुथवर ॲड. धीरज पाटील यांना लीड

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२८ नोव्हेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघातील एकुण ४१० बुथपैकी भाजपचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना ३०९ बुथवर तर काँग्रेसचे ॲड. धीरज पाटील यांना १०० बुथवर मताधिक्य मिळाले आहे. एका होर्टी येथील बुथ क्र.३४३ या बुथवर भाजप आणि काँग्रेस यांना समान १७४ मत मिळाले आहेत.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात यावेळी महायुतीचे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि महाविकास आघाडीचे ॲड. धीरज पाटील यांच्या चुरशीची निवडणुक झाली आहे. या निवडणुकीत महायुतीचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी ३६ हजार ८७९ मताधिक्याने दणदणीत विजय मिळविला आहे. या निवडणुकीत महायुतीचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना १ लाख ३१ हजार ८६३ तर महाविकास आघाडीचे ॲड. धीरज पाटील यांना ९४ हजार ९८४ इतके मते मिळाली. या निवडणुकीत पहिल्यांदा विधानसभेची निवडणुक लढविणारे काँग्रेसचे ॲड. धीरज पाटील यांनी अतिशय कडवी लढत दिली. त्यांनी ९४ हजार ९८४ मते घेऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. त्यांना तुळजापुर तालुक्यातुन विशेष करुन त्यांच्या स्वताच्या तुळजापुर शहरातुन म्हणावे तसे मतदान घेता आले नाही ही त्यांच्या परभवाचे मुख्य कारण आहे.

भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी अतिशय नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा राबविली तसेच या मतदार संघातील महायुतीचे सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या विजयासाठी प्रयत्न केले म्हणुनच हा विक्रमी विजय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा झाला आहे. तसा प्रयत्न काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडुन झालेला दिसुन येत नाही. तुळजापुर विधानसभा मतदार संघात एकुण ४१० बुथ आहेत. यापैकी ३०९ बुथवर भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना मताधिक्य मिळाले आहे तर १०० बुथवर काँग्रेसचे ॲड. धीरज पाटील यांना



मताधिक्य मिळाले आहे. होर्टी येथील ३४३ या बुथवर भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व काँग्रेसचे ॲड. धीरज पाटील यांना समान १७४ मते मिळाली आहेत. कांही बुथवर इतर उमेदवारांना मताधिक्य मिळाले आहे मात्र ही आकडेवारी पहिल्या दोन उमेदवारांचीच आहे.

या निवडणुकीत या मतदार संघात एकुण २३ उमेदवार होते. मात्र लढत दुरंगीच झाली याचा फार मोठा फायदा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना झाला आहे. या मतदार संघातील नळदुर्ग आणि तुळजापुर या दोन शहरामधुन आमदार राणा जगजितसिंह यांना मताधिक्य मिळाले आहे.

तुळजापुर शहरातुन आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना ३ हजार ३२० मतांची तर नळदुर्ग शहरातुन ३३६ मतांची आघाडी मिळाली आहे. लोकसभा निवडणुकीत या दोन्ही शहरातुन महाविकास आघाडीचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना मोठे मताधिक्य मिळाले होते. हे मताधिक्य विधानसभा निवडणुकीत ॲड. धीरज पाटील यांना टिकविता आले नाही. त्याचबरोबर तुळजापुर तालुक्यातील जळकोट, नंदगाव, शहापुर, इटकळ, लोहगाव, या गावांमधुनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना मोठे मताधिक्य मिळाले आहे. त्याचबरोबर २०१९ च्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे अशोक जगदाळे यांनी ३७ हजार मते घेतले होते. मात्र या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या डॉ. स्नेहा सोनकाटे यांना अवघ्या ७ हजार ९०८ मतावरच समाधान मानावे लागले आहे. डॉ. स्नेहा सोनकाटे यांनी अतिशय चांगला प्रचार केला होता मात्र अपेक्षेप्रमाणे त्यांना मतदान मिळाले नाही. प्रहार जनशक्तीकडुन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत लढलेले महेंद्र धुरगुडे यांना त्यावेळी ७ हजार ४५८ मते मिळाली होती.

मात्र यावेळी अण्णासाहेब दराडे यांना १ हजार ४३८ मतावरच समाधान मानावे लागले आहे याचा फार मोठा परिणाम या निवडणुकीच्या निकालावर झाला असल्याचे दिसुन येत आहे.

या दोन्ही उमेदवारांनी २०१९ च्या निवडणुकीचे सातत्य ठेवले असते तर या निवडणुकीचे चित्र वेगळे दिसले असते.

# ऑनलाईन आर्थिक फसवणुकीतील साडे चार लाख रुपये फिर्यादीस परत

## धाराशिव सायबर पोलीसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

क्रेडिट कार्ड ऍक्टिव्हेट करण्याच्या बहाण्याने धाराशिव शहरातील एकाची ४ लाख ४९ हजार ऑनलाईन फसवणूक झाली होती. या फसवणुकीतील रक्कम परत मिळवून देण्यास सायबर पोलिसांना यश आले असून सायबर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, धाराशिव शहरातील सुलतान पटेल यांना ऑक्टोबर रोजी म ोबाईलवर एका अनोळखी इसमाने फोन करुन तो खउखउख या बँकेतुन बोलतो असे सांगून क्रेडीट कार्ड क्टीवेट करण्यासाठी मोबाईलवर आलेला ओटीपी विचारून घेवून तीन वेगवेगळ्या ओटीपी द्वारे रक्कम काढून घेतली. यामध्ये क्रेडीट कार्डवर अनुक्रमे ९६ हजार ९२ रूपये, ८८ हजार २९० रूपये व २ लाख ६४ हजार ८७० रूपये असे तीन ट्रान्झक्शन झाल्याचे मेसेज आले.



असे मेसेज आले ते पाहून तक्रारदार यांनी ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या व्यक्तीस पैसे कट झाल्याची विचारणा केली. मात्र त्याने उडवाडवीची उत्तरे दिल्याने पटेल यांना संशय आल्याने त्यांनी तात्काळ सायबर पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. यानंतर सायबर पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत ऑनलाईन तक्रार नोंदवून तांत्रिक विश्लेषण केले. तक्रारदार यांच्या क्रेडीट कार्डद्वारे मेझॉनवर खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तात्काळ मेझॉन कंपनीला इमेल करुन नोडल अधिकारी यांचेशी संपूर्क करुन यातील तक्रारदाराच्या क्रेडीट कार्डवर केलेली खरेदीचा ऑर्डर रद्द करुन तक्रारदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम ४ लाख ४९ लाख २५२ रूपये परत करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश कासुळे, पोलीस हावलदार हालसे, नाईकवाडी, महिला पोलीस नाईक पौळ, पोलीस अमंलदार जाधवर,भोसले, मोरे, भोसले, तिळगुळे, कदम, काझी, सुर्यवंशी, महिला पोलीस अमंलदार खांडेकर, शेख यांच्या पथक या प्रकरणात काम करत होते.

# हॅलो मेडिकल फाउंडेशनकडून जळकोटवाडीत जागर अभियान



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२८ नोव्हेंबर -**

युवा पिढीनी अपयशाने निराश न होता ध्येय साध्य करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे मत प्रा. ज्योतिका चव्हाण यांनी केले.

हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या वतीने जळकोटवाडी (नळ) येथे हिंसामुक्तीसाठी युवा जागर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. हे अभियान हॅलोकडून जिल्हाभरात राबविण्यात येत आहे. यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील किशोरवयीन मुला-मुलीमधील व्यसनमुक्ती, छेडछाड प्रतिबंध, युवा जागर या विषयावर जनजागरण चालू आहे. या विषयावर चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, यशस्वी कोण होतो. जो योग्य निर्णय घेतो. तो नव्हे तर घेतलेला निर्णय योग्य कसा आहे. हे सिद्ध करतो. तो खरा युवक, निर्भयता, विवेकता, चतुराईने पुढे जाणारा युवकांची आज देशाला गरज आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंदिरा काळे प्रशालेचे मुख्याध्यापक गहिनीनाथ काळे हे उपस्थित होते. तर हॅलो मेडिकलच्या तालुका समन्वयक नागिनी सुरवसे, सम पुदेशिका वासंती मुळे, पर्यवेक्षक इंदूबाई कबाडे, प्रणिता भोसले, ललीता राठोड, डावरे, स्वामी, कागे, राऊत, जगन्नाथ काळे, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# राणाजगजितसिंह पाटील मंत्री, पालकमंत्री होण्यासाठी श्री संत गोरोबाकाकाला साकडे



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२८ नोव्हेंबर -**

तेर गावचे भुमिपुत्र तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांची महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद मि ळावे म्हणून तेर येथील ग्रामस्थांनी संत गोरोबाकाका यांच्या समाधीस अभिषेक आरती मंत्रोच्चार पुजा करण्यात आली.

आमदार राणाजगजितसिंह पाटील हे भाजपचे एकमेव जिल्ह्यातील आमदार आहेत. त्याचा माध्यमातून दोन वेळा जिल्हात भारतीय जनता पक्षाला आमदार दिला आहे.



त्यामुळे आ. राणाजगजिसिंह पाटील यांना राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री व्हावे म्हणून तेर येथे ग्रामदैवत श्री संत गोरोबाकाका मंदिरात अभिषेक व आरती पूजा केली.

यावेळी हभप. शिवाजी म हाराज रोंगे, उपसरपंच श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, पद्माकर फंड, बालाजी पांढरे, भुजंग खांडेकर, विलास रसाळ, तानाजी बंडे, अर्शाद मुलांनी, अमित कोळपे, नाना गायके, सुभाष कुलकर्णी, बिभीषण लोम टे, सतीश कदम, गुरुनाथ बंडे, विवेकानंद नाईकवाडी, अतुल इंगळे, नारायण लोमटे, जयदेवी शिराळ, लतिका पेठे, नशिम मुलानी, पोर्णिमा झाडे, ममताज तांबोळी, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ पसारे, संजय लोमटे, रामभाऊ कोळी, किशोर काळे, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा फुलेंनी संपूर्ण आयुष्य समाज सुधारण्यासाठी खर्ची घातले : प्राचार्य कोळगे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

समाजाविषयी असणारी तळमळ ही त्यांच्या कार्यातून आपल्याला समजून येते. समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला महत्त्व दिले एवढेच नाही तर दुर्लक्षित समाजासाठी, स्त्री सन्मानासाठी, बालविवाह विरोधासाठी मशाल पेटून क्रांती घडवणारे, समानता व सत्यासाठी ध्येय झिजवणारे क्रांतीसुर्य महात्मा फुले होते. त्यांनी शेतकऱ्यांसाठी ही कार्य केले. महात्मा फुलेंनी संपूर्ण आयुष्य समाज सुधारण्यासाठी खर्ची घातले असे उद्गार जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्मृतिदिन साजरा करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य जयप्रकाश कोळगे बोलत होते.



विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन व वेळेचे महत्व समजून व वेळेचा सदुपयोग करून जीवन उज्वल बनवावे अशी अपेक्षा ही याप्रसंगी व्यक्त केली.

विद्यालयातील सहशिक्षक श्री प्रसन्न धम ाधिकारी यांनीही क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्याची सखोल माहिती देऊन विद्यार्थ्यांनी समाजासाठी काहीतरी कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, डोंगरे के.ए., जविकास क्षिरसागर, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत घोळवे यांनी तर उपस्थितांचे आभार सुरेश रायजादे यांनी मानले.

# श्री काळभैरवनाथाच्या मंदिराच्या मुख्यमार्गावर दिशादर्शक फलक लावण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२८ नोव्हेंबर -**

सोनारी येथील श्री काळभैरवनाथाच्या दर्शनासाठी राज्यसह परराज्यातील भविकभक्त येतात परंड्यात मुख्यमार्गावर दिशादर्शक फलक नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. बांधकाम विभागाने परंड्याहुन सोनारीकडे जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी मुख्यरस्त्यांवर दिशादर्शक फलक लावण्यात यावे, अशी मागणी श्री काळभैरवनाथ देवस्थानचे विश्वस्त समीर संजय पुजारी यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग परंडा यांच्याकडे गुरूवार दि.२८ रोजी केली आहे.

मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता टोंपे यांच्याकडे श्री काळभैरवनाथ देवस्थाचे विश्वस्त समीर पुजारी, मयुर पुजारी यांनी दिले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता शिंदे यांना या बाबत माहिती दिली आहे. सोनारी येथील श्री काळभैरवनाथ देवस्थानच्या दर्शनासाठी महाराष्ट्र राज्यासह पर राज्यातील भाविक भक्तांचा नेहमीच ओढा असतो. परंड्यात या मार्गावर दिशादर्शक फलक नसल्याने हजारो भावीक जुन्या गुगल मॅप प्रमाणे परंडा शहरातील अरूंद असलेल्या गल्ली बोळातुन वाहणे घेऊन ये-जा करताना म ोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे भाविकांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक महिला भाविकांची मोठी गैरसोय होत आहे. परंडा शहरातील डॉ. आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, करमाळा चौक, खासापूरी चौक, कुर्डूवाडी नाका, कुर्डूवाडी, बार्शी, करमाळा म



ार्गावरून सोनारीस जाणाऱ्या भाविकांसाठी रस्ता सहज लक्षात यावा यासाठी दिशादर्शक फलक लावणे अत्यंत गरजेचे आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याने तात्काळ लावुन सोनारीस जाणाऱ्या नवीन रस्त्याचे गुगल मॅपवरती अपडेट करण्यात यावे. यामुळे भाविक भक्तांची गैरसोय दुर होण्यास मोठी मदत होईल. असे निवेदनात समीर पुजारी यांनी म्हटले आहे.

# डाळ वर्गीय पीक विकास परिषदेच्या चेअरमनपदी नारायण नन्नवरे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ नोव्हेंबर -**

आंतरराष्ट्रीय पातळी वरील इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशनच्या डाळ वर्गीय पीक विकास परिषदेच्या चेअरमनपदी नारायण नन्नवरे यांची निवड करण्यात आली.



ग्रँट थोर्टन प्रभादेवी मुंबई या ठिकाणी २५ नोव्हेंबर रोजी परिषदेच्या संचालक मंडळाची बैठक झाली या बैठकीस कॅनडा येथील प्रतिनिधी स्कॉट मॅथिस तसेच महाराष्ट्रातील स्मार्टचे नोडल अधिकारी चंद्रकांत माळी, विनायक पाटील, शरद म्हेत्रे, सीईओ डॉ. शुभ्रा देशपांडे, रावसाहेब बेंद्रे, चंचल पाल्हाल, सुभजीत बॅनर्जी, श्रेया झा यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सर्वानुमते परिषदेच्या चेअरम नपदी नारायण नन्नवरे तसेच सचिव पदी विनायक पाटील यांची निवड करण्यात आली. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्य व महाराष्ट्र शासनाच्या (स्मार्ट) बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प अंतर्गत आंतरराष्ट्रीय पातळीवर या परिषदेचे कार्य सुरू असणार आहे. ३१ जुलै २०२४ रोजी इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशनच्या नावाने देशातील पहिल्या डाळ वर्गीय पीक विकास परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देशांमध्ये अशा पीक विकास परिषदा पूर्वीपासून कार्यरत आहेत पण इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशन ही भारतातील डाळवर्गीय पिकातील पहिली पीक विकास परिषद आहे.

या परिषदेच्या माध्यमातून डाळ वर्गीय पीक उत्पादक शेतकरी, खरेदीदार, कृषी निविष्ठा उद्योग, साठवण उद्योग, वाहतूक उद्योग, प्रक्रिया उद्योग इत्यादींसह डाळ वर्गीय पीक मूल्य साखळीतील सर्व घटकांना एका व्यासपीठावर आणून डाळ वर्गीय पीक उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य केले जाणार आहे.

# तुळजाई नगरीत श्री काळभैरवनाथ जन्माष्टमी उत्साहात साजरी

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सपत्नीक केला महारुद्राभिषेक....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ नोव्हेंबर -**

श्री काळभैरवनाथ जन्म ाष्टमीनिमित्ताने काळभैरवनाथ मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले होते, प्रारंभ काळभैरवाष्टक, भैरवचंडी आणि बटुकभैरव स्त्रोत हवन, भैरव अनुष्ठान करण्यात यावेळी आले. महारतीने काळभैरवनाथ जन्माष्टमी उत्सवाची सांगता झाली.



यावेळी कालभैरवनाथाच्या कड्यावर शेकडो दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला, कड्यावर आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. जन्माष्टमीनिमित्त आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सौभाग्यवती अर्चना पाटील यांच्या समवेत कालभैरवनाथस महारुद्राभिषेक पूजा केली.

याप्रसंगी महंत इच्छागिरी महाराज, महंत तुकोजीबुवा, कालभैरवनाथाचे मुख्य पुजारी सोमनाथ पुजारी, पुरोहित माणिक कांबळे, दादा ढोले, सर्वोत्तम जेवळीकर, विशाल रोचकरी, निलेश अमृतराव, ॲड. जनक पाटील, प्रेम पुजारी, सुनील पुजारी, वैजनाथ पुजारी, गणेश पुजारी उपस्थित होते. कालभैरवनाथ मंदिर समितीतर्फे आ. पाटील यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. काळभैरव जन्माष्टमी उत्सवासाठी श्री काळभैरवनाथ भिंडोळी उत्सव समिती व श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या सेवकांसह भाविकांनी परिश्रम घेतले.

यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

# संविधान अमृत महोत्सवी दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२८ नोव्हेंबर -**

२६ नोव्हेंबर भारतीय संविधान अमृत म होत्सवी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा बालोद्यान कळंब येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समिती कळंबच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समितीचे अध्यक्ष सुनील गायकवाड, सत्पाल बनसोडे, माधवसिंग राजपूत, बंडू ताटे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी राजाभाऊ गायकवाड, सुमित रणदिवे, विलास करंजकर माणिक गायकवाड, बालासाहेब हौसलमल, भाउसाहेब कुचेकर, रम ेश भोसले, किशोर वाघमारे, अभय गायकवाड, सुधाकर वनकळस, प्रमोद ताटे, महावीर गायकवाड यांनी यात सहभाग घेतला.

भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाली असून २०२४-२५ हे संविधान अमृत महोत्सवी वर्ष म्हणून देशात मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहे. यावेळी संविधान प्रेमी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग**

**ई-निविदा सुचना क्र. ०३ २०२४-२०२५**

नळदुर्ग नगर परिषद अंतर्गत रस्ते साफ करणे, सार्वजनिक ठिकाणे साफ करणे, गटार-नाली साफ करणे तसेच दैनदिंन विलगीकृत कचऱ्याचे घरोघरी जाऊन संकलन करून QR कोड स्कॅन करणे, घनकचरा प्रक्रिया केंद्र चालविणे या कामाकरिता अनुभवी व पात्र निविदाधारकामार्फत निविदा मागविण्यात येत आहे.

या कामाचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. निविदा भरण्याची मुदत दि. ०६/१२/२०२४ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत आहे.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी,**
नळदुर्ग नगर परिषद

**नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग**
ता. तुळजापुर जि. धाराशिव

दुरध्वनीक्र.- ०२४७१२४६०१४ इमेल-naldurgmc@gmail.com
जावक क्रं./ /नपन/बांध-३/२०२४ दिनांक २८/११/२०२४

**जाहिर आवाहन**

नळदुर्ग नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरीकांना जाहीर आवाहन करण्यात येते की,मा. उच्च न्यायालय, मंबई यांच्या न्यायालयात दाखल झालेल्या जनहित यांचिका क्र. ७१/२०२३ व अवमान याचिका ६/२०१९ मधील दिलेल्या निर्देशानुसार नगर परिषद हद्दीतील, नगर परिषद अखत्यारीतील/मालकीचे मुख्य रस्ते व इतर रस्ते यावरील खडडे, मॅनहोल्स व रस्ते खुदाईबाबतच्या तक्रारी naldurgmc@gmail.com या इमेलवर तसेच नगर परिषद प्रशासन संचालयनालय, नवी मुंबई यांचेमार्फत विकसित करण्यात आलेल्या https:mahaulb.in या Intergrated web Based Portal (IWBP) प्रणालीवरील तक्रार मोडयुलचा वापर करुन तसेच फोटोसह तक्रार नोंदविण्यासाठी नगर परिषद इमेल- naldurgmc@gmail.com व ऑफिस लॅडलाईन क्रं.०२४७१२४६०२५ / मो.क्रमांक ८३९०४०२७६७ याव्दारे नगर परिषदकडे तक्रार दाखल करता येईल तरी नळदुर्ग शहरातील सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर अभियंता | मुख्याधिकारी | प्रशासक |
| नगर परिषद नळदुर्ग | नगर परिषद नळदुर्ग | नगर परिषद नळदुर्ग |

# निवडणुकीत जातीवाद झाला; तरीही सर्वांची साथ मिळाली : आ. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २८ नोव्हेंबर**

विधानसभेच्या निवडणूकीत जातीवाद झाला..पण हे अतिशय धोकादायक आहे. राजकारणात ज्यांनी जातीवर केले ते पुढे यशस्वी झाले नाहीत पण कधी नव्हे इतका त्रास कार्यकर्त्यांना सुद्धा झाला. पण मला सर्व माहिती आहे कोण काय केले आहे ते दूध का दूध... पाणी का पाणी होईल आता विरोधात काम करणाऱ्यांना पुन्हा घेणे नाही. तुम्ही संयम ठेवा सर्व जाती धर्माच्या मतदारांनी तसेच बाहेरील मित्रपरिवारानी माझ्यासाठी एकजुटीने प्रयत्न केले हा एकजुटीचा सर्व जाती धर्मच्या लोकांचा विजय असून जातीवाद करणाऱ्यानी या मतदारसंघाने नाकारले ही आपला सदैव ऋणी आहे. अशी कृतज्ञता नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केली आहे.

नवनिर्वाचित आमदार प्रतापराव विजयी झाल्या नंतर पहिल्यांदा लोह्यात आले त्याचे उत्स्फूर्त उत्साहात ..अभूतपूर्व स्वागत लोहा शहर वासीयांनी केले. व्यंकटेश गार्डन येथे मतदारांचे जाहीर आभार सोहळा आयोजित करण्यात आला होता.व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष दिलीप धर्माधिकारी ,माजी नगराध्यक्षा कल्याणराव सूर्यवंशीसंध्याताई राठोड , माणिकराव मुकदम किरण वट्टमवार, प्राणिताताई देवरे चिखलीकर, प्रवीण पाटील, आनंदराव पाटील, हंसराज पाटील बोरगावकर, मनोहर पाटील , केशवराव मुकदम ,छत्रपती धुतमल , नाना तिडके, करीम शेख, सचिन पाटील चिखलीकर, शोभाताई बगडे, जफारोद्दीन बहोद्दीन, हरिभाऊ चव्हाण, दता वाले, नरेंद्र गायकवाड, दीपक पाटील, अविनाश




सूर्यवंशी, भगवान हाके , सचिन मुकदम, हरिभाऊ चव्हाण यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी कार्यकर्त्यांचे मतदारांचे आभार मानताना त्याचा कंठ दाटून आला होता.जातीवाद मोठ्या प्रमाणात झाला सर्व उमेदवारानी माझ्या वाट्टेल ते बोलले ज्याची लायकी नव्हती तेही बोलले पण मी संयम ठेवला शांत होतो.आता येणाऱ्या काळात माझ्ट निवडणूकीत ज्यांनी मला मदत केली माझ्या साठी ज्यांनी प्रामाणिकपणे काम केले त्याना मी दूर करणार नाही. केंद्रात राज्यात आपली सत्ता आहे. प्रामाणिक कार्यकर्ता माझ्यासाठी गावात प्रयत्नशील राहिला.जातीवाद प्रचंड झाला पण एका जातीवाद निवडणूक होत नाही आणि ज्यांनी जातीवर मते मागितली त्यांना इतर जातीच्या लोकांनी नेहमीच धडा शिकवला आहे.ज्यांनी ज्यांनी सोबत राहून दगा दिला त्याची माझ्याकडे नोंद आहे.माझ्या सारख्या कार्यकर्त्यांना तुम्ही नेहमीच साथ दिली आडचणीच्या काळात एकजुटीने राहिलात आणि हा विजय सर्व जातीधर्मचा लोकांचा आहे मतदारांचा आहे मतदारसंघात एखादाउद्योग आणण्याचा माझ्या प्रयत्न राहणार आहे.आपले सर्वांचे आभार मानतो असा शब्द प्रतापरावांनी कृतज्ञता व्यक्त केली संचालन व आभार बी डी जाधव, भास्कर पाटील यांनी केले.

**प्रचंड उत्साह..... अभूतपूर्व स्वागत**

कंधार मार्गे लोह्यात आगमन झाल्या नंतर नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर याच्यावर सहा जेसीबी मधून फुलांची उधळण करण्यात आली .छत्रपती शिवाजी महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर ,पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवाद केले पुण्यश्लोक अहिल्यादेवी चौक यास त्यांनी पुष्पहार अर्पण केला

शहरात अभूतपूर्व . उत्साहात स्वागत करण्यात आले कोण आला रे..कोण आला..मन्याड चा वाघ आला ..असा घोषणानी परिसर दुमदुमला

**प्रतापराव पाटील चिखलीकर गहिरवले**

जातिवादात ही निवडणूक झाली पण जनतेनी माझ्यावर प्रेम केले आणि एकजुटीने विजय मिळवून दिला हे मी कधी विसरणार नाही असे मतदारांचे आभार व्यक्त करताना प्रतापरावांचा कंठ दाटून आला. ते गहिरवले.विरोधात काम करणाऱ्याना माफी नाही असा शब्दात त्यांनी संकेत दिले.

## मंत्रीमंडळात आ. डॉ. तुषार राठोड यांची वर्णी लागण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. २८ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मंत्रीमंडळ गठीत होणार असल्याने. आलेल्या माहिती नूसार राज्य मंत्री मंडळात जेष्ठ नेत्यांचा पत्ता कट होणार असल्याने मंत्री मंडळात मूखेड चे तरुण आ.डॉ. तूषार राठोड यांचा समावेश होण्याची दावेदारी मजबूत झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता सर्वांना वेध लागले ते मंत्रीमंडळाचे.मूखेड येथील जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मतदारांना आवाहन करतांना म्हणाले होते की,आ.डॉ. तूषार राठोड यांना आमदार करा मि 'नामदार 'करतो.त्या प्रमाणे निवडणुकीत विजयाची हॅट्रिक करत दिमाखदार विजय मिळवला.सोबत महायूतीला बंपर यश मिळाले असल्याने मंत्री पदाचे अनेकांना वेध लागले असल्याने रस्सीखेच सूरु झाली. मिळालेल्या माहितीनुसार मंत्रीमंडळात



जेष्ठ नेत्यांचा पत्ता कट होणार असल्याने तरुण आमदारांचा मंत्रीमंडळात समावेश होण्याची शक्यता बळावली आहे. मूखेड चे आ.डॉ. तूषार राठोड यांना जाहीर सभेत दिलेल्या मंत्री पदाच्या आश्वसनाची पूर्ती करण्याची मागणी जोर धरत आहे.आ.तूषार राठोड यांना मंत्री पद दिल्यास जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष अधिक मजबूत होईल व बंजारा समाज हा भाजपच्या पाठिशी अधिक मजबुतीने उभा राहील याचा फायदा येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूत होईल अशी अटकळ बांधली जात आहे. जिल्हात आ.डॉ.तूषार राठोड हे सलग तिन वेळा विजयी झाले व मंत्री मंडळ तरुण असल्याच्या शक्यतेने मंत्रीपदावर दावेदारी अधिक मजबुत झाली आहे.

## २ डिसेंबरला लोकशाही दिन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

जिल्हा प्रशासनाच्यावतीने सोमवार २ डिसेंबरला नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी लोकशाही दिनामध्ये आपल्या तक्रारीसह उपस्थित व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

दणीची सुरूवात दुपारी १२ वा. होणार आहे. त्यानंतर लगेच प्राप्त झालेल्या अर्जावर सुनावणी घेण्यात येणार आहे. नागरिकांनी दुपारी १ ते ३ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात उपस्थित रहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे.

## जंतनाशक अभियान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

राज्यात ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात येत असून याअंतर्गत १ ते १९ वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी दिली जाणार आहे. ही गोळी चावून खाणे गरजेचे आहे किंवा पाण्यात घेता येईल. या उपक्रमाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांनी केले आहे.

## नगरपालिकेच्या बचतीकडे विशेष लक्ष देणार : मुख्याधिकारी गौरव वांडेकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २८ नोव्हेंबर**

हदगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदी गौरव वांडेकर यांनी काही दिवसांपूर्वीच मुख्याधिकारी पदाचे सूत्रे हाती घेतल्यानंतर निवडणुकीच्या आलेली जबाबदारी पार पडत आपले लक्ष आता नगरपालिकेच्या बचतीकडे राहणार असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आपले मत व्यक्त केले तर पाणीपुरवठा या ठिकाणी सोलार योजना बसवून आर्थिक बचत कशी होईल याकडे पण आपले विशेष लक्ष राहणार असल्याचे



सुद्धा त्यांनी सांगितले.

काही दिवसापूर्वीच हदगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदी गौरव वांडेकर हे रुजू झाले असून ते यापूर्वी छत्रपती संभाजीनगर मनपात सह आयुक्त या महत्त्वाचे पदावर कार्यरत होते त्या ठिकाणीचा कामाचा अनुभव या ठिकाणी नक्कीच येणार असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले पुढे बोलताना म्हणाले की, हदगाव शहरातील जनतेला मूलभूत सुविधा व भौतिक सुविधा यांच्याशी संबंधित असणाऱ्या समस्यांना आपले प्राधान्य राहणार असून स्वास्थ, स्वच्छता, कचऱ्याचे प्रश्न, सुशोभीकरण, वाचनालयाचे प्रश्न असो विशेष म्हणजे पाणीपुरवठा करणाऱ्या ठिकाणी सोलार योजना राबवून महावितरणाचे येणारे बिल वाचून नगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ कशी करता येईल याची व्यवस्था करण्यात येईल. डम्पिंग ग्राउंड व हदगाव शहरातील ड्रेनेज लाईन यासाठी विशेष पाठपुरावा करून त्यासाठी निधी उपलब्ध करून या समस्यांचे कायमस्वरूपी निराकरण करण्यात येईल. नगरपालिकेतील सर्वच विभागाचे कर्मचारी यांची बैठक घेतली असून शहराच्या विकासाच्या बाबतीत अपूर्ण राहिलेल्या सर्व प्रश्नांवरती विशेष लक्ष देऊन लवकरात- लवकर मार्गी लावण्यात येतील असेही शेवटी म्हणाले.

## भाजप महायुतीला आंबेडकरी मतदारांची साथ : बापूराव गजभारे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत आंबेडकरी मतदारांनी प्रथमच भाजप शिवसेना राष्ट्रवादी रिपब्लिकन महायुतीला मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे.असा दावा पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राज्य महासचिव बापूराव गजभारे यांनी केला आहे.बहुसंख्य आंबेडकरी समाजाचे मतदार असलेली शहरी व गावखेड्यांच्या बूथवर महायुतीच्या उमेदवारांचा मतांचा टक्का वाढल्याचे दिसून येते



मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जागतिक पातळीवर उचित सन्मान आणि दलित आदिवासी बहुजन समाजाच्या आर्थिक उन्नत्तीसाठी विविध कल्याणकारी योजना लागू केल्याचा परिणाम हे एक मतदारांना आकर्षित करण्याचे कारण आहे. तसेच महाराष्ट्रात महायुती सरकारने अडीच वर्षात सर्व घटकांसाठी अनेक कल्याणकारी योजना मंजूर केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने लोकप्रिय लाडकी बहीण ,लाडका भाऊ,शेतकरी सुशिक्षित बेरोजगारनां मानधन मुख्यमंत्री कौशल्य विकास प्रशिक्षण, रुग्णांना तात्काळ अर्थसाह्य सर्व समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ,पत्रकार ते ऑटो रिक्षा चालकांसाठी आर्थिक विकास महामंडळ बार्टीच्या धर्तीवर अर्टीची स्थापना केली.

सर्व समाजाच्या महापुरुषांचे स्मारक,वारकऱ्यांसाठी आर्थिक तरतूद तीर्थ यात्रा दर्शन योजना असे निर्णय घेऊन ताबतोब अंमलात आणले. योजना लागू करतांना कुठलाही भेदभाव केला नाही.

१८ - १८ तास जनतेची सेवा करणारा मुख्यमंत्री महाराष्ट्राने पहिल्यांदाच पाहिला दोन्ही उपमुख्यमंत्री यांची योग्य साथ आणि समन्वयामुळे राज्याची भक्कम प्रगतीकडे वाटचाल पाहून आंबेडकरी समाजातील अधिकारी,कर्मचारी ,कार्यकर्ते व सुशिक्षित लोकांनी दलित मतदारांमध्ये महायुती सरकार बद्दल सकारात्मक विचाराची पेरणी केल्यामुळे हे परिवर्तन दिसून आले. सातत्याने आंबेडकरी मतांची विभागणी करणाऱ्या नेतृत्वाला शहरी आणि ग्रमीण भागातील समाजाने यावेळी नाकारले आहे.या निवडणुकीत एकूण झालेल्या मतदाना पैकी बसपाने २३७ उमेदवार उभे करून ०.४८ टक्के मते घेतली तर वंचितने २०० उमेदवार उभे करून ३.१ मते घेतली इतर आंबेडकरी संघटनांनी जवळपास ७०० उमेदवार उभे केली होती त्यांच्या मताची संख्या नग्न आहे .जातीची व्होटबँक या नितीमुळे केवळ उमेदवारांचे आर्थिक व राजकीय चांगभलं होत असून समाजाचे नुकसान होत असल्याचे बापूराव गजभारे म्हणाले.

## लाडक्या बहिणींचा आशिर्वाद यामुळेच माझा विजय : आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २८ नोव्हेंबर**

अडीच वर्षांच्या अल्पशा कालावधीत मतदारसंघात केलेल्या तब्बल २५०० कोटींच्या विविध विकासकामांमुळेच जनता जनार्दनाने माझ्यावर पुन्हा विश्वास दाखवला असून,लाडक्या बहिणींचा आपल्या जबाबदार भावाला मतदान रुपाने भरभरून मिळालेला आशीर्वाद हा सोने पे सुहागा ठरुन माझा विजय सुकर झाला असल्याचे कृतज्ञतापूर्ण मत किनवट/माहुर विधानसभा मतदारसंघात दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार भीमराव केराम यांनी आमच्या प्रतिनीधीजवळ व्यक्त केले.

किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघात लगातार तीन निवडणुकीत विजय मिळवत हॅटट्रिक रचलेले प्रदीप नाईक यांना २०१९ ला मी पराभूत करत,विजयी चौकार मारण्यापासून रोखले.परंतू, त्यानंतर कोरोना महामारीचे जागतिक संकट कोसळले, देशात लॉकडाऊनची भयंकर परिस्थिती निर्माण झाल्याने सर्व व्यवहार ठप्प होऊन आर्थिक मंदी आली.परिणामी मतदारसंघात प्रथम अडीच वर्षांच्या कालावधीत कुठलीही विकास कामे करता आली नाही.मात्र, पुढील अडीच वर्षांच्या अल्पशा कारकिर्दीत



राज्य सरकारकडून २५०० कोटी रुपयांचा भरघोस विकास निधी खेचून आणला. त्यातून, मतदारसंघात रस्ते,पुल, पैनगंगा नदी पात्रात उच्च पातळी बंधारे,लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या दत्तशिखर येथील प्रसादालयाचे बांधकाम, दत्तशिखर ते अनुसयामाता मंदिराकडे जाणारा रस्ता, अनेक गावात समाज मंदिराचे बांधकाम,यासह विविध विकास कामे करण्यात आली.

विशेषतः केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी विकास योजनांची माझ्या मतदारसंघात अंमलबजावणी करुन त्याचा जनतेला लाभ मिळवून दिला.राज्यात लोकप्रिय होऊन सुपरहिट ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मतदारसंघातील जवळपास ९५हजार लाडक्या बहिणींना लाभ मिळवून दिल्याने या निवडणुकीत लाडक्या बहीणी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या याचे करावेत तेवढे कौतुक कमीच आहे.लाडक्या बहीणींचा भक्कम आशिर्वाद आणि मतदारसंघात केलेल्या अभूतपूर्व विकासकामांची दखल घेऊन मतदारांनी मला मतदान रुपी आशीर्वाद देऊन दुसऱ्यांदा निवडुन देत मी राबविलेल्या योजना व केलेल्या विविध विकास कामांची विजयाचा ठसा मारलेली जणू पोच पावतीच दिली असल्याचे सांगतानाच त्याला भक्कम जोड मिळाली ती माझ्या महायुतीचे विशेषतः भाजपाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व समर्थक यांनी घेतलेल्या जिवापाड परीश्रमाची

त्याला भक्कम जोड मिळाल्याने माझा विजय आणखी सुकर व सुनिश्चित झाला असल्याची आमदार भीमराव यांनी महत्त्वाची पुष्टी जोडत मतदारसंघातील तमाम मतदारांचे आभार मानले.मतदारांच्या या विश्वासाला मी कदापी तडा जाऊ देणार नसल्याचे सांगत निश्चितच या संधीचे सोने करीन !अशी ग्वाही देखील यावेळी आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधतांना दिली.

## देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तर भीमराव केराम मंत्री बनावे यासाठी मारोतीरायाला महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २८ नोव्हेंबर**

भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागावी तसेच किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिमंमंडळात स्थान मिळावे यासाठी किनवट येथील भारतीय जनता पार्टीच्या शहर कार्यकारिणीने येथील पुरातन मारोती मंदिरात महाआरती करून साकडे घातले आहेत.

८३ किनवट विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे भीमराव केराम यांनी ऐतिहासिक विजय प्राप्त केला.भीमराव केराम यांनी महायुतीकडून या मतदारसंघात दुसऱ्यांदा विजयश्री खेचून आणल्याने त्यांना मंत्रिपद मिळणार



असल्याची चर्चा आहे. मागील काळात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भीमराव केराम यांनी किनवट माहूर मतदारसंघात दोन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त विकास निधी खेचून आणला. किनवट माहूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांची राज्याच्या मुख्यमंत्रीपदी वर्णी लागावी अशी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भावना आहे तर यावेळेस किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे अशी किनवट माहूर तालुका वाशीयांची मागणी आहे. दरम्यान भाजपा शहर कार्यकारणीच्या वतीने सतीश बिराजदार,प्रा. विश्वास कोह्वारीकर, माजी नगरसेवक शिवा आंधळे,जगदीश तीरमनवार, नरसिंग तक्कलवार,कृष्णा कलकुंटलावार,गजानन शिवणकर नागेश येनाबत्ती,गणेश कोल्हे, शंकर कोल्हे, विशाल पाम्पटवार, रमेश शिंगेवार, हरिओम संतोष, पिंटू पांडे व जगदीश तीरमनवार यांनी दिनांक २७ नोव्हेंबर रोजी येथील पुरातन मारोती मंदिरात जाऊन महामारती केली असून यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागावी व भीमराव केराम यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे यासाठी देवाला साकडे घातले आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### कु.रागिणी चौदंते या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत निवड



**मुदखेड**-मुदखेड शहरातील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल ची विद्यार्थिनी कु.रागिणी राजरत्न चौदंते हीने शालेय स्तरावरील कराटे स्पर्धेत लातूर विभागात प्रथम आली, तसेच विभागीय कराटे स्पर्धेत ३८ ते ४२ वजन गटात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्यामुळे धुळे येथे होणाऱ्या शालेय स्तरावरील राज्य पातळीवरील कराटे स्पर्धेत कु. रागिणी चौदंते या विद्यार्थ्यानीची निवड झाली.या यशाबद्दल मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे, क्रीडाशिक्षक माधव गाडेगावकर, ज्ञानेश्वर बायेस, टि बि पवार, डी जी धनगरे, जी बी गुजरवाड, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता लाटकर, शिक्षिका हेमलता व्यास, यासह आई, वडिल, व चौदंते परिवारासह आदिंनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

### तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचा आत्मदहनाचा प्रयत्न

**नवीन नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी नांदेड येथील तासिका तत्त्वावरील कार्यरत आसलेल्या प्राध्यापकांचा कुलसचिवांच्या कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न करण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी नांदेड येथील प्रस्तुत विद्यापीठात स्त्री अध्ययन केंद्र येथे तासिका तत्वावर काम करणाऱ्या सहाय्यक प्राध्यापक गजानन इंगोले व मेघनाथ खडके यांनी चार महिने केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला वेळोवेळी मागणी करूनही न मिळाल्यामुळे संचालकाच्या त्रासाला कंटाळून कुलसचिवांच्या कार्यालयात जाऊन अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

### उमरीत सतं दासगणू महाराज यांना साईबाबा संस्था तर्फे वस्त्र अर्पण



**उमरी**-महाराष्ट्रातील संताची भुमी म्हणून गोरठा येथिल दासगणू महाराज यांचे नाव अग्रेसर असून त्यांच्या पुण्यतिथी निमित्त गुरू सद्गुरू साईबाबा संस्थानं तर्फे समाधीस वस्त्र अर्पण करण्यात आले आहे. उमरी तालुक्यातील मौजे गोरठा येथे दरवर्षीप्रमाणे संत दासगणु महाराज पुण्यतिथी निमित्य साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या वतीने श्रीसाई मंदिर प्रमुख विष्णू थोरात, पुजारी उपेंद्र पाठक , नवणाथ मते जनसंपर्क कार्यालय प्रतिनिधी, नामदेव डोमे ( चोपेदार) संत दासगणु महाराज समाधीला यांचे कडून वस्त्र अर्पण करण्यात येते यंदा ही गोरठा संस्थान कडून सर्व शिर्डी हुन आलेल्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला असून साईधर्म परमपंरा कायम ठेवली आहे. तसेच श्री संत दासगणू महाराज संस्थानं विश्वस्त विक्रम महाराज, गोविंद काका शिरूरकर, सुभाष देसाई, कवतीकवार, यांना श्विष्णू थोरात, उपेंद्र पाठक महाराज यांचे वतीने साई प्रसाद देण्यात आला. यावेळी गोविंद नलबलवार, नगरसेवक प्र .अशोक मामीडवार, विष्णू अट्टल, गोपाळ राठोड नरसिंग मुक्कावार, शिवा गोडगे व सर्व साईभक्त गण हजर होते.

### मुदखेड येथे ज्ञानेश्वर माऊली समाधी सोहळा

**मुदखेड**-मुदखेड शहरात श्री विठ्ठलेश्वर मंदिर येथे ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा व सद्गुरु संतकवी श्री दासगणू महाराज यांच्या स्मरण दिनानिमित्त हरिभक्त परायण श्री भास्कर महाराज कामारीकर यांचे कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कीर्तनकार भास्कर महाराज कामारीकर यांनी दासगणू महाराज यांच्या चरित्रातील परोपकारी संत पृथ्वीवर जे अवतार घेतात त्यामध्ये श्री ज्ञानेश्वर माऊली व दासगणू महाराज हे संत आपल्याला मार्गदर्शनासाठी वैकुंठा होऊन आले अशा सद्गुरु पुरुषांची पुण्यतिथी मुदखेड शहरात विठ्ठल मंदिरात मोठ्या भक्तिभावाने साजरी केली जाते ही परंपरा कायम आहे. या पुण्यतिथीनिमित्त मागील नऊ दिवसापासून येथील विठ्ठल मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण नंदकुमार मामीडवार यांनी वाचन केलं या पारायण सोहळात येथील असंख्य महिला भगिनींनी सहभाग घेतला. दि. २८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी व पारायण सोहळा तसेच काल्याचे किर्तन संपल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल मंदिराचे अध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, देविदास राव कवळे, हरिश्चंद्र काळे, शंकरराव आरेवाड, डॉ सुरेश मेगदे, पुजारी अरुण मानवतकर महाराज, गोविंदराव काळेकर, बालाजी काळे, गिरीश काळे, शरद कवळे, राम जोशी, आनंदा ढगे, गोविंद राठोड, दत्तात्रेय मोडवान यांच्या सह श्री दासगणू महाराज भक्त मंडळ व विठ्ठलेश्वर संस्थान तसेच युवकांनी परिश्रम घेतले.

### सोनखेड पोलीस स्टेशन तर्फे व्यसनमुक्ती आणि आरोग्य शिबिराचे आयोजन

**सोनखेड**-सोनखेड येथील बाजार मैदानावर १ डिसेंबर रोजी सकाळी ०९ वाजता भव्य असे व्यसनमुक्ती शिबिर तसेच नेत्र तपासणी शिबिर व मोफत रक्त तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिरात सोनखेड पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गावचे पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष आणि ग्रामरक्षक दलाचे सदस्य तसेच सरपंच, उपसरपंच व गावातील सामाजिक कार्यात रस असलेल्या सर्व नागरिकांना या सामाजिक कार्यात सहभाग घेण्याचे आवाहन सोनखेड पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे. सोनखेड येथे जास्तीत जास्त लोकांना हजर ठेवावे जेणेकरून व्यसनामुळे होणारे नुकसान तसेच मोफत नेत्र तपासणी आणि मोफत रक्त तपासणी व त्यावरील औषधे नागरिकांना मिळतील व त्यांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांना होईल. यादृष्टीने गावचे पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष व ग्राम रक्षक दलाचे सदस्य यांनी गावातील कमीत कमी २० लोकांना हजर ठेवायच आहे आणि त्यांनी स्वतःही सक्रिय सहभाग सदर शिबिरामध्ये नोंदवायचा आहे.


## ग्रामपंचायत कर्मचारी भरती जाहिरात

**जाहीर प्रगटन**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ६१ अन्वये ग्रामपंचात दिवशी (बु) ता. भोकर जि. नांदेड यांच्याकडून ग्रामपंचायत पंप ऑपरेटर (एकुण ०१ पद) या पदासाठी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील पात्र उमेदवाराकडून दिनांक २९/११/२०२४ ते दिनांक ०७/१२/२०२४ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहे.

हे पद हंगामी असून प्रथम ०३ महिन्याची नेमणूक दिली जाईल. त्या नंतर कामाचा आढावा घेऊन काम समाधानकारक असल्यास पुढील नेमणूक आदेश देण्यात येईल. नेमणुक पुढे चालु ठेवणे अथवा रद्द करणे हे ग्रामपंचायत ठरवील. अर्ज केलेल्या उमेदवारातून नियमानुसार पात्र उमेदवाराची निवड केली जाईल. तसेच मुलाखत घेण्यात येईल. त्या बाबत स्वतंत्र सूचना ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर लावण्यात येईल.

**अर्ज करण्यासाठी नेमणुकीच्या अटी व शर्ती**

**पदाचे आरक्षण** : मागासवर्गीय उमेदवार तसेच संबंधीत कामाचा तांत्रीक अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**शैक्षणिक पात्रता** : किमान ७ वी पास

**कामाचे स्वरुप** : ग्रामपंचायत पंप ऑपरेटर या पदासाठी शासनाने व ग्रामपंचायतीने वेळोवेळी नेमण दिलेली सर्व कामे

**मासिक मानधन** : ग्रामपंचायतीच्या नियमानुसार. (०३ महिन्याचा कालावधी समाधानकारक असल्यास पुढील नेमणुक आदेश देण्यात येईल. शासन किमान वेतन प्रमाणे व भत्ते देय राहील)

**वयोमर्यादा** : १) सर्वसाधारण (खुला) प्रवर्गातील उमेदवारासाठी-१८ ते ३८ वर्ष
२) मागासवर्गीय उमेदवारासाठी १८ ते ४३ वर्ष

**स्वाक्षरित /-**
ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय दिवशी (बु) ता. भोकर जि. नांदेड

**स्वाक्षरित /-**
सरपंच ग्रामपंचायत कार्यालय दिवशी (बु) ता. भोकर जि. नांदेड

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## डॉ. आंबेडकर पार्क येथे भारतीय संविधान दिन



**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २८ नोव्हेंबर-**

शाक्यसंघ माता भिमाई सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी संघटना लातूरच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भारतीय संविधान गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करुन डॉ आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष शाहुराज कांबळे, उपाध्यक्ष दिलीप कांबळे, सचिव शिवाजी कांबळे, कोषाध्यक्ष रोहिदास कांबळे, सदस्य शंकर शिंदे, नरसिंग गायकवाड, अंगद कांबळे, सुशीम बनसोडे, मोहन कांबळे, बाबुराव कांबळे, अशोक कांबळे, अर्जुन किंकर, त्र्यंबक कवठेकर, प्रकाश बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### शिवाजी महाविद्यालयात महात्मा फुले यांचा स्मृतिदिन साजरा

**उदगीर, दि. २८ नोव्हेंबर-**

शिवाजी महाविद्यालयामध्ये महात्मा फुले यांचा १३४ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महात्मा फुले यांच्या कार्याचे स्मरण करत असताना प्राचार्य डॉ.मांजरे म्हणाले, महात्मा फुले हे थोर शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, स्त्री शिक्षणाचे उद्धारक, शुद्रादी-शुद्रांचे कैवारी होते. त्यांनी साहित्यातून समाजप्रबोधन केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक जयंती समिती प्रमुख डॉ. सुरेश शिंदे यांनी केले तर आभार डॉ. डी. बी. मुळे यांनी मानले.



### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात महात्मा फुले यांना अभिवादन

**उदगीर, दि. २८ नोव्हेंबर-**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार प्रा. डॉ. एस. जी. अन्सारी यांच्या हस्तेअर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, दिनविशेष समितीचे प्रा. डॉ. बी. एस. भुक्तरे, स्टाफ सेक्रेटरी प्रा. डॉ. बी. डी. करंडे तसेच सर्व शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### उदगीरमध्ये आज मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**उदगीर, दि. २८ नोव्हेंबर-**

अखिल भारतीय श्री. स्वामी समर्थ गुरुपीठ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर व सद्गुरु परमपूज्य मोरेदादा चारिटेबल हॉस्पिटल अँड मेडिकल ट्रस्ट अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण शिबिराचे आज दिनांक २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते ७ या वेळेत जय वीर हनुमान मंदिर रघुकुल मंगल कार्यालयासमोर बिदर रोड उदगीर येथे हृदयविकार ,मधुमेह, सर्व प्रकारचे कॅन्सर ,रक्तदाब सांधेविकार,त्वचा विकार ,वात विकार, पोटाचे विकार,महिलांचे विकार, मुतखडा, मुळव्याध, कावीळ, लहान मुलांचे विकार, इत्यादी विकाराचे रोग निदान मोफत केले जाणार असून या आरोग्य शिबिराचा उदगीर शहर व परिसरात परिसरातील सर्व नागरिक, सेवेकरी, भाविक -भक्त यांनी लाभ घ्यावा असे आव्हान विशाल जाधव विनायक गादा ,निवृत्ती जवळे यांच्यासह समर्थ सेविकाऱ्यांनी केले आहे. शिबिराला येताना मागील काळातील व चालू काळातील आरोग्य विषयक कागदपत्राची फाईल सोबत घेऊन येणे.आरोग्य शिबिरासाठी पूर्व नाव नोंदणी आवश्यक आहे. त्यासाठी ८२०८१४२१७३, ९३५६५९२९६५, ७५८८०६३४२४,९६२३४६०९७९ या नंबरवर संपर्क साधावा.

### संजय पाटील यांना राष्ट्रीय कर्मयोगी पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**चाकूर, दि.२८ नोव्हेंबर-**


नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार चाकूर येथील पत्रकार संजय अण्णाराव पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी या पुरस्काराची घोषणा केली असून संजय अण्णाराव पाटील यांना पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेवून राष्ट्रीय कर्मयोगी पत्रकारिता पुरस्कार जाहीर केला आहे. हा राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभ रविवार दि.५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २.३० वा. रोटरी क्लब सभागृह,गंजमाळ शालिमार जवळ नाशिक येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल पाटील यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.



### पार्वतीबाई मुळे यांचे निधन

**दैठणा, दि. २८ नोव्हेंबर-**

दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथील पार्वतीबाई बापूराव मुळे यांचे वयाच्या ८५ वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दैनिक लोकमतचे पत्रकार रमेश मुळे आणि सेवानिवृत्त शिक्षक अशोक मुळे यांच्या त्या मातोश्री होत.



# तोडणीचं सोडा; पहिलं उसाच्या हप्त्याचं बोला

## पहिला हप्ता तीन हजारांचा द्या; क्रांतीकारी शेतकरी संघटना आक्रमक



**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२८ नोव्हेंबर-**

गेल्या वर्षी ऊस भरपुर असतानाही साखर कारखान्यांनी २९००ते २५०० रुपयाचा दर दिला होता. यावर्षी उसाचे क्षेत्र पाण्याअभावी फारच कमी आसून जेमतेम दोन आडीच महिने कारखाने चालतील एवढेच आहे. तरिही बायलर पेटविताना, मोळी टाकताना एकाही साखर कारखान्याने भाव जाहीर केला नाही. मात्र ऊसाची तोडणी सुरु आहे. भाव जाहीर केल्याशिवाय शेतकऱ्यांनी ऊस तोडणी करु देऊ नये, असे आवाहन करुन यंदा साखर कारखान्यांनी ऊसाचा दर जाहीर करुनच तोडणी करावी.यंदा ३000हजार रुपयांचा पहिला हप्ता द्यावा. अन्यथा क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी नेते राजेंद्र मोरे यांनी दिला आहे.

दरवर्षी बायलर पेटविताना किंवा ऊसाची मोळी टाकताना साखर कारखाने ऊसाचा दर जाहीर करतात. तर कांही कारखाने जाहीर करीत नाहीत. मात्र इतर कारखान्याच्या तुलनेत दर देतात यामुळे शेतकऱ्यांना वर्षभर पोसलेल्या ऊसाचे चार पैसे कमी आधिक प्रमाणात का होईना मिळतात. गेल्या वर्षी औसा तालुक्यालगतच्या लातूर व धाराशिव जिल्ह्यातील कांही साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची ४०० रुपये टनाप्रमाणे नुकसान केली आहे. लोकमंगलने २९०० रुपये, आशिव येथील गुळपिटीने २८००, किल्लारी, आंबेडाकर, भाऊसाहेब बिराजदार, साई शुगर, मांजरा, विकास या कारखान्यांनी औसा तालुक्यातील शेतकऱ्यांचा उस नेऊन २७०० रुपये भाव दिला तर तालुक्यातील व शेतकऱ्यांच्या हक्काच्या मारुती महाराज साखर कारखान्याने सर्वात कमी २५०० रुपयांचा दर देऊन टनाला ४०० रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान केले आहे.

या वर्षीच्या हंगामासाठी सर्वच साखर कारखाने जवळपास सुरु झाले आहेत.या कारखान्यानी गव्हाणीत मोळी टाकून थाटामाटात शुभारंभ केला आहे. प्रत्येक वर्षी मोळी गव्हाणित टाकल्यानंतर लगेच उसाचा पहिला हप्ता किंवा उसाचा दिला जाणारा दर जाहीर करण्यात येत होता. त्याउलट यावर्षी शेतकऱ्यांच्या कडे ५० टक्के सुद्धा ऊस उपलब्ध नाही.अशा बिकट परस्थितीत कारखानदारांनी यावर्षी सर्वाधिक दर देण्याची स्पर्धा लागायला हवी होती. एवढी भयानक परिस्थिती आहे. परंतू एकाही कारखान्याने अद्याप उसाचा दर जाहीर केला नाही. उसाची कमतरता असल्यामुळे कारखाने दोन-तीन महिन्यापेक्षा जास्ती चालणार नाहीत.

शेतकऱ्यांनी ऊस घालविण्यासाठी गडबड न करता कारखान्याकडून भाव जाहीर झाल्याशिवाय ऊसाला तोडी घेऊ नयेत. कारखान्याचे कर्मचारी फडावर आल्यानंतर शेतकऱ्यांनी ऊस दराचे बाबत खुलासा करून घ्यावा. स्वतःचे नुकसान करुन घेऊ नये. यावर्षीच्या गळीत हंगामामध्ये उसाच्या कांडीला सोन्याचा भाव येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे असताना जवळपास सर्वच कारखानदारांनी तेरी भी चूप मेरी भी चुप असे धोरण अवलंबले आहे. एक डिसेंबरपर्यंत कारखानदारांनी आपल्या कारखान्याकडून दिला जाणारा भाव जाहीर करावा अन्यथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र असे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

बैठकीस सत्तार पटेल, अरुण दादा कुलकर्णी, नवनाथ शिंदे, राजीव कसबे, अशोक दहिफळे, माधव कवठाळे, प्रज्योत हुडे, अमर हैबतपुर, श्रीराम चव्हाण, शितल तमलवाड, नारायण नरखेडकर, दगडू बर्डे, दगडू पडिले, अमित सूर्यवंशी, सिदाजी जगताप, राम बिराजदार, मुस्तशीन मुंजेवार, धनाजी बरगाले, धनाजी जाधव, धनाजी धानोरे,हनुमंत कातळे, रौप शेख, बशीर पठाण, हिराचंद जैन. संतोष गायकवाड, संगमेश्वर जावळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिक्षक, विद्यार्थ्यांनी उभारला वनराई बंधारा



### विठ्ठलराव पाटील विद्यालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २८ नोव्हेंबर-**

निलंगा तालुक्यातील गौर येथील विठ्ठलराव पाटील मेमोरियल हायस्कूलचे मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन वनराई बंधारा उभा केला आहे. शाळेने केलेल्या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गौर येथील विठ्ठलराव पाटील मेमोरियल हायस्कूलच्या समोरून एक पाण्याचा नाला वाहत आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांना पर्यावरणानाची माहिती व्हावी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक केशव पाटील यांनी स्वतः पुढाकार घेत आपल्या शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना घेऊन आपल्या शाळेसमोरूनच वाहत असलेल्या नाल्यावरती परिश्रम करत एक वनराई बंधारा गेल्या काही दिवसापूर्वी उभा केला आहे. विशेष म्हणजे या वनराई बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात वाया जात असलेले पाणी आता या बंधाऱ्यात साठल्याने शाळेचे पाण्याने सौंदर्य वाढले असून हा बंधारा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बनला आहे. मुख्याध्यापक केशव पाटील, राजू लामतुरे, बळवंत बुग्गे, चिखलीकर राजकुमार, श्रीकांत पाटील, दैतकर किशन, बालाजी कदम यांनी परिश्रम घेतले.



## मासप केंद्रीय कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी रामचंद्र तिरुके

### विविध संस्था, संघटनांच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २८ नोव्हेंबर-**

तालुक्यातील सताळा येथील रहिवाशी व लातूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके यांची मराठवाडा साहित्य परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. याबद्दल विविध संस्था व संघटनाच्या वतीने तिरुके यांचा सत्कार करण्यात आला.

दोन आठवड्यापूर्वी झालेल्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या निवडणूकीत प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने भरघोष मतांनी विजय मिळवत सर्व उमेदवार निवडून आल्याने छ. संभाजीनगर येथे पहिली बैठक पार पडली. यावेळी नवीन कार्यकारिणी उदगीरचे रामचंद्र तिरुके यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल उदगीरात मसाप, जिवाळा ग्रुप, अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संस्था, जेष्ठ नागरिक संघ आदींनी सत्कार केला.

यावेळी रामचंद्र तिरुके यांनी मागच्या मागील कार्यकारिणीतही सदस्य म्हणून काम केले आहे. उदगीर शाखेचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत. ४० वे मराठवाडा साहित्य संमेलन व ९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उदगीरला घेत देशाच्या नकाशावर मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. भविष्य काळातही अनेक साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रम राबवून उदगीर, जळकोट, देवणी परिसरातील जनतेची साहित्यिक व सांस्कृतिक भूक भागवण्यासाठी या माध्यमातून प्रयत्नशील राहणार असल्याचे रामचंद्र तिरुके यांनी सांगितले. त्यांच्या या निवडीबद्दल ना. संजय बनसोडे, माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर नीटुरे, बसवराज बागबंदे, प्रा. पंडित सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, प्रा. डॉ. गौरव जेवळीकर, राज्य सांस्कृतिक धोरण समिती सदस्या अनिता यलमटे, धनंजय गुडसुरकर, प्रा. चंद्रशेखर मलकमपट्टे, रामदास केदार, रसूल पठाण, लक्ष्मण बेंबडे आदींनी अभिनंदन केले.

## वेताळेश्वर शिक्षण संकुलात संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२८ नोव्हेंबर-**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेअंतर्गत लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर कॉलेज ऑफ सायन्स, लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग (जी एन एम) लातूर कॉलेज ऑफ आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमानाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त संविधानाच्या मूल्याची जनजागृती व्हावी. यासाठी हर घर संविधान अभियान मोहीम राबविण्यात आली.

भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय राज्यघटने बाबत जागरूकता महाविद्यालय विद्यार्थी तसेच देशाची भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहोचावीत. यासाठी राज्यातील महाविद्यालय शैक्षणिक संकुले यामध्ये जनजागृती केली आहे. तसेच महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व संविधान प्रस्ताविकेचे वाचन करून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली आहे.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे,प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्या योगिता बावगे, क्षितिजा माळी, प्रा. माधुरी पोळकर, प्रा. शुभम वैरागकर, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून संविधानाचे वाचन करण्यात आले.

## आचारसंहिता उठली तरीही शासकीय कार्यालय ओस

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि.२८ नोव्हेंबर-**

निवडणुकीचा निकाल लागून व कार्यालयाचे दैनंदिन कामकाज सुरू होऊनही निलंगा शहरातील बहुतांश कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिसत नाही. त्यामुळे निवडणूकीच्या कामातून अजूनही अधिकारी सावरेनात असे म्हणण्याची वेळ तालुक्यातील नागरिकाकडून म्हणण्याची आली आहे.

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होऊन दोन-तीन दिवस झाले आहेत मतदान प्रक्रिया पूर्ण करून घेण्यासाठी येथील निवडणूक निर्णय अधिकारी यानी हजारो कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती मतदान शांततेत पार पडले शनिवारी ता. २३ रोजी निकालही जाहीर झाला त्यामुळे सोमवार पासून सुरळीतपणे शासकीय कामकाज सुरू झाले शिवाय आदर्श आचारसंहिताही उठवण्यात आली मात्र निलंगा शहरात डझनभरापेक्षा जास्त मोठे कार्यालय आहेत त्या कार्यालयामध्ये अजूनही अधिकारी व कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसत आहे. गेल्या दीड महिन्यापासून विधानसभा निवडणुकीचा धुमधाम सुरू होता विविध विभागातील कर्मचाऱ्याची मोठ्या प्रमाणात प्रतिनियुक्ती निवडणूक कामासाठी करण्यातत आली होती. शिक्षण, आरोग्य, पंचायत समिती, तहसील, जिल्हा परिषद याससह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी या कामावर होते विविध कार्यालयामध्ये सामान्य नागरिकाचे काम या निवडणूक काळात प्रलंबित राहिले मात्र सध्या कार्यालयाचे कामकाज सुरू झाले असून बहुतांश कार्यालयात कार्यालय प्रमुखच उपस्थित नाहीत त्यामुळे कर्मचाऱ्यांना विचारणार कोण असा सवाल उपस्थित केला जात आहे.

ग्रामीण भागातील शेत रस्ते, विद्यार्थ्यांचे विविध प्रमाणपत्र, मोजणी कार्यालयातील कामकाज, पंचायत समितीच्या विविध विभागांतर्गत असणारी कामकाज यासाठी नागरिकाची सतत कामासाठी कार्यालयात वर्दळ असते परंतु आता निवडणुका झाल्या त्यामुळे अधिकारी व कर्मचारी आपल्या खुर्चीवर मिळतील अशा अपेक्षेने ग्रामीण भागातील नागरिक शासकीय कार्यालयात हेलपाट्या घालत आहेत मात्र अजूनही निवडणुकीच्या कामाचा ताण अधिकारी व कर्मचाऱ्यात दिसत आहे.

कार्यकर्ते तर थकले परंतु आधी खरी कर्मचारीही थकले का ते कामावर का येत नाहीत अशी विचारणा ग्रामीण भागातील नागरिक करत आहेत.

## राठोडा येथे शॉटसर्कीटमुळे तीन एकर उस जळून खाक

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि.२८ नोव्हेंबर-.**

तालुक्यातील राठोडा येथील शेतकरी अंगद सोमवंशी व सुग्रीव सोमवंशी यांच्या शेतात विद्युत तारांमध्ये शॉटसर्कीट होऊन तीन एकर ऊस जळून खाक झाल्याची मंगळवारी (दि २६) रोजी दुपारी घडली. निलंगा तालुक्यातील राठोडा येथील शेतकरी अंगद धोंडीबा सोमवंशी, व त्यांचे बंधू सुग्रीव धोंडीबा सोमवंशी दोघा भावांचे गट क्रमांक २८३ मध्ये पाच एकर ऊस असून मंगळवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास आचानक विद्युत तारांमध्ये शॉटसर्कीट होऊन ऊसाला आग लागली. बघता बघता जवळपास तीन एकर ऊस जळून खाक झाला.

वर्षभर काबाडकष्ट करून पिकवलेला ऊस कांही वेळातच जळुन खाक झाल्याने शेतकरी निराश झाले असून त्यांचे लाखो रुपयेचे नुकसान झाले. तात्काळ महावितरण विभागाने पंचनामा करून संबंधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी व कारखान्यांनी ऊस घेऊन जावा अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.